

REFBK-0008219

विषय [illegible]

सं. नं. [illegible]

# बाबूराव पेंटर

## व्यक्ति आणि कला

नां. दि

किमत रु. २–८–०

अंजलि प्रकाशन लि.

# बाबूराव पेंटर

## व्यक्ति आणि कला

[ ना. सी. फडके, ना. ह. आपटे, शं. वा. किर्लोस्कर,
माधवराव बागल इत्यादि नामांकित साहित्यिकांनीं,
व चित्रपट व्यवसायांतील अग्रेसर कलावंतांनीं
व नटनटींनीं केलेलें बाबूरावांच्या कलेचें
मूल्यमापन आणि हृदयस्पर्शी आठवणी]

१७४०२
REFBK-0008219
विभाग २१-५
क्रमांक ५२
नों. दि. २६।७।५४
ग्रंथ संग्रहालय
८२१९

किंमत रु. २-८

अंजलि प्रकाशन लिमिटेड

प्रकाशक : ना. सी. फडके
अंजलि प्रकाशन लिमिटेड,
३७ वेस्टर्न इंडिया हाऊस,
सर फेरोजशा मेथा रोड,
मुंबई १.

मुखपृष्ठावरील रंगीत चित्र
ग. ना. जाधव

आवृत्ति दुसरी
ऑक्टोबर १९५४

मुद्रक :
वि. ग. माटे
'विश्वकर्मा मुद्रणालय'
टिळक रोड, पुणें २.





फॅक्टरी व हेड ऑफिस : चेंबूर (मुंबई)

शाखा : मुंबई–ठाकुरद्वार, परळ, दादर, काळबादेवी
शिवाय अकोला, उमरावति, हुबळी.

मुंबई चीफ डिस्ट्रिब्यूटर्स : प्रामाणिक स्टोअर्स
मोगल बिल्डिंग, डिलाईल रोड, मुंबई ११

# आमचीं लोकप्रिय प्रकाशनें

प्रो. ना. सी. फडकेकृत

१. प्रतिभासाधन ५-०-०

२. लघुकथा लेखन
मंत्र आणि तंत्र ७-०-०

३. माझ्या साहित्य-
सेवेंतील स्मृती
भाग दुसरा ३-०-०

४. भरतीची लाट
(कादंबरी) ४-०-०

५. शाकुंतल
(पूर्वी जप्त झालेली
कादंबरी) ४-०-०

६. सरितासागर
(कादंबरी) ४-०-०

७. सितारामंझिल
(हैद्राबाद पोलिस-
ॲक्शनवरील
कादंबरी) ४-०-०

प्रो. ना. सी. फडकेकृत

८. सोबत
(कथासंग्रह) २-०-०

९. महात्मा गांधी
(चरित्र) १-८-०

१०. महात्मा गांधी
(हिंदी) १-८-०

११. टेरेन्स मॅक्स्विनी
(चरित्र) १-८-०

India vs. M. C. C. Tests
2-8-0

ना. सी. फडके-कमला फडकेकृत

१३. किशोरकथा
(कथासंग्रह) १-८-०

शि. न. कोल्हटकरकृत

१४. विमा विक्रीच्या
सुरस सत्यकथा २-०-०

प्रो. रा. धों. कर्वेकृत

१५. पॅरिसच्या परी ३-०-०

अंजलि प्रकाशन लिमिटेड.

८३१९
अनुक्रमांक १७४० २
नां. दि. २५।७।५

# कै. बाबूराव पेंटर यांच्या चरित्रांतील ठळक गोष्टी

(जन्म : ३-६-१८९०; मृत्यु : १६-१-१९५४)

श्री. बाबूराव यांचं संपूर्ण नांव बाबूराव कृष्णराव मेस्त्री असं होतं. बी. के. मेस्त्री अशी सही ते करीत. कोणत्याही चित्रावर मात्र त्यांनीं कधींच सही केली नाहीं. त्यांचा जन्म १८९० मध्यें जून महिन्याच्या ३ तारखेस झाला. त्यांचं पहिलं लग्न वयाच्या सतराव्या वर्षीं १९०७ सालीं झालं. त्यांचं कुटुंब म्हणजे त्यांच्या सख्या मामाची मुलगी होती. त्यांचे मामा गडहिंगलज पेट्यांतील बड्याची वाडी या गांवीं रहात असत. पहिली बायको वारल्यावर कांहीं दिवसांनीं १९२७ सालीं बाबुरावांनीं दुसरं लग्न केलं ही मुलगी सारवडे गांवाजवळील कासारपुतळी येथील होती. त्यांच्या पहिल्या बायकोची एक मोठी झालेली मुलगी आहे. दुसऱ्या कुटुंबापासून बाबुरावांना २ मुलगे व ७ मुली आहेत. थोरल्या मुलाचं नांव रवींद्र असं असून तो सुमारे २४ वर्षांचा आहे, आणि उत्तम चित्रकार म्हणून तो नांव कमावील अशी आशा करण्या-इतका तो आज चित्रकलेंत पारंगत आहे.

१९१७ सालीं बाबुरावांनीं कोल्हापुरास " महाराष्ट्र फिल्म कंपनी " ची स्थापना केली. 'सैरंध्री' हा त्यांनीं काढलेला पहिला चित्रपट पुणें येथें 'आर्यन' सिनेमांत १९१९ सालीं दाखविला गेला. त्यानंतर 'वत्सलाहरण', 'भक्त दामाजी', व 'मार्कंडेय' (अपूर्ण) असे चित्रपट त्यांनीं काढले. १९२० सालच्या अखेरीस एके दिवशीं भर दुपारीं महाराष्ट्र फिल्म कंपनीच्या स्टुडिओला आग लागली, व आगींत हे सर्व चित्रपट जळाले.

कांहीं दिवस कंपनीचं काम बंद राहिलं, पण १९२१ सालीं बाबूरावांनीं कामास पुन्हा प्रारंभ केला, व प्रथम 'सिंहगड' हा चित्रपट काढला. इलेक्ट्रिक लाइटवर घेतलेला हा भारतांतील पहिला चित्रपट होय. त्यानंतर बाबूरावांनीं 'सावकारी पाश', 'मायाबाजार', 'गज गौरी', 'कृष्णावतार', 'सती पद्मिनी', 'सावित्री' 'शहाला शह', 'कल्याण - खजीना', 'राणा हमीर', 'नेताजी पालकर', 'महारथी कर्ण', 'बाजी प्रभू देशपांडे', 'मुरलीवाला', 'लंका' असे (एकंदर पंधरा) चित्रपट काढले.

यांपैकीं 'सति पद्मिनी' व 'कल्याण–खजिना' हे चित्रपट लंडन येथें भरलेल्या जागतिक प्रदर्शनांत (वेंब्ले एक्झिबिशनमध्यें) दाखविले गेले, व त्यांची फार प्रशंसा झाली.

१९३० सालीं बाबूरावांनीं महाराष्ट्र फिल्म कंपनी सोडली.

श्री. आक्कासाहेब महाराज यांनीं काढलेल्या 'शालिनी सिनेटोन' मध्यें १९३३ सालापासून ते चित्रपट काढूं लागले. त्यांचे पूर्वींचे सर्व चित्रपट मुके होते. यापुढचे सर्व बोलके होते. 'उषा' 'सावकारी पाश' व 'प्रतिभा' हे तीनच चित्रपट काढल्यानंतर बाबूरावांनीं शालिनी सिनेटोनचा संबंध १९३६ सालीं सोडला.

१९४५ सालीं 'प्रदीप पिक्चर्स'च्या 'रुक्मिणी–स्वयंवर' या चित्रपटाचं त्यांनीं दिग्दर्शन केलं, आणि १९४७ सालीं 'राजकमल'च्या 'रामजोशी' या चित्रपटाचेंही दिग्दर्शन केलं. मध्यंतरीं कोल्हापूरचे श्री. रुईकर यांनीं श्री. बालगंधर्व यांना मुख्य स्त्री भूमिका देऊन काढलेल्या (वसंत शांताराम देसाई यांच्या नाटकावरून तयार केलेल्या) 'मीराबाई' या चित्रपटाचंही दिग्दर्शन त्यांनीं केलं.

१९५१ सालीं 'बी. एम्. आर्ट' नांवाची चित्रसंस्था स्थापून 'विश्वामित्र' नांवाचा चित्रपट त्यांनीं काढला. हाच त्यांचा शेवटचा चित्रपट होय! जुना 'सावकारी पाश' हा अत्यंत नांवाजला गेलेला चित्रपट हिंदींत काढण्याची त्यांची इच्छा होती. श्री. बाळ गजबर यांच्या 'बी. जी. प्रॉडक्शन' तर्फे तो काढला

जाणार होता, व त्याचं नेतृत्व बाबूरावांच्याकडेच राहणार होतं. या हिंदी चित्रपटाचं नांव 'महाजन' असं निश्चित झालं होतं. १९५३ च्या दिवाळींत त्याची घोषणाही झाली होती.

महाराष्ट्र फिल्म कंपनी सोडल्यानंतर बाबूरावांचं लक्ष शिल्पकलेकडे विशेष वळलं असावं. त्याच्या आधीं मूर्तिकाम ते करीत असत. (त्यांच्या घरांतच तो धंदा होता.) परंतु शिल्पकार म्हणून ते ओळखले जात नव्हते. सार्वजनिक ठिकाणीं बसविण्यासाठीं त्यांनीं पहिला पुतळा तयार केला तो १९३१ सालीं. हा पुतळा शिव छत्रपतींचा होता. त्याचं ओतकाम त्यांनीं स्वतः चार वेळां प्रयोग करून केलं होतं. तो त्यांनीं सांगलीच्या एका जहागीरदारांना फक्त ३०० रुपयांस विकला. त्या जहागीरदारांनीं तो आपल्या शेतांत बसविला आहे. त्यानंतर कोल्हापूरचे राजपुत्र शिवाजी यांचा पुतळा बाबूरावांनीं तयार केला. तो कुंभोज गांवीं बसविला आहे. श्री. भालजी पेंढारकर यांनीं बाबूरावांकडून शिवाजीचा उभा पुतळा करून घेतला. त्याचं ओतकाम बाबूरावांनींच स्वतः केलं. हा पुतळा कोल्हापुरांतील मार्केटजवळच्या चौकांत आहे. बाबूरावांच्या हातचा शिवाजी महाराजांचा एक बस्ट पुतळा वाळवे गांवीं बसविलेला आहे; आणि तसलाच दुसरा बस्ट पुतळा १९४७ सालीं 'शिवाजी तरुण मंडळा' मार्फत कोल्हापुरांतील वरुणतीर्थ वेस चौकांत बसविला गेला. बाबूरावांनीं तयार केलेला व स्वतःच्या भट्टींत ओतलेला महात्मा गांधींचा उभा पुतळा लवकरच कोल्हापुरांत बसविला जाणार आहे. हा ब्रॉंझचा पुतळा बारा फूट उंच आहे. भारतांतील हा सर्वांत उंच पुतळा आहे म्हणतात.

बाबूरावांच्या चित्रांपैकीं पुढील 'पोर्ट्रेट पेंटिंग्ज' त्या त्या व्यक्तीला समोर बसवून रोज तीन तासांप्रमाणें तीन तीन दिवसांत पूर्ण केलेलीं आहेत. श्री. माधवराव बागल, मंजीखांसाहेब, गोविंदराव टेंबे, प्रो. ना. सी. फडके, कर्नल हार्वे व त्यांचा मुलगा, श्री. नंजाप्पा, मिसेस नंजाप्पा, बडोदा महाराजांचे सासरे श्रीमंत हसूरकर! करवीर-संस्थापक ताराबाई यांचं आश्वारूढ पोर्ट्रेट बाबूरावांनीं

कल्पनेनं काढलं. हें चित्र आणि छत्रपती राजाराम महाराज यांचं पोर्ट्रेट शहाजी महाराजांच्या संग्रहीं आहे. शाहू महाराज व राजाराम महाराज यांचीं पोर्टेट पेंटिंग्ज बाबूरावांनीं 'कोल्हापूर इलाखा पंचायती' साठीं केलीं. शालिनी पॅलेसमधील हॉलमध्यें लावण्या-साठीं शालिनी राजे यांचं पेंटिंग बाबूरावांनीं फक्त आठ दिवसांत पूर्ण केलं, परंतु त्यांच्या कामाचा हा सर्वोत्कृष्ट नमुना म्हणावा लागेल. 'शहानवाझ' नांवाचा राजाराम महाराजांचा आवडता रेसचा घोडा होता. त्यावर बसलेले राजाराम महाराज ज्यांत दाख-विले आहेत असं जें भव्य चित्र बाबूरावांनीं तयार केलं तेंही अत्यंत सुंदर झालेलं आहे.


ज्यांना 'डिझाइन्स' म्हणतां येईल अशा बाबूरावांच्या चित्रां-पैकीं 'दत्त', 'सरस्वति', 'राधाकृष्ण', 'रंगपंचमी खेळणारे राधा कृष्ण', 'वटपूजा', 'जलवाहिनी', 'शोभा', व 'लक्ष्मी' हीं प्रमुख म्हणतां येतील. यांतलीं बहुतेक चित्रं औंधच्या महाराजांच्या संग्रहांत आहेत. 'लक्ष्मी' हें चित्र मुंबईचे श्री. डहाणूकर यांनीं तयार करून घेतलं. यांपैकीं कित्येक चित्रांच्या प्रतिकृती अनेक ठिकाणीं दिलेल्या आहेत.

प्रो. फडके यांच्या 'दौलत', 'अटकेपार', 'समरभूमि', 'गुजगोष्टी', 'काश्मिरी गुलाब' व सौ. कमला फडके यांच्या 'निष्कलंक' या पुस्तकांसाठीं बाबूरावांनीं तयार केलेलीं कव्हर डिझाइन्स अत्यंत सुंदर होतीं.

महाराष्ट्र फिल्म कंपनीच्या प्रत्येक चित्रपटासाठीं बाबूराव मोठ-मोठीं भव्य पोस्टर्स तयार करीत असत. त्यांच्या हातचीं छोटीं छोटीं 'लॅंडस्केप्स' त्यांच्या अनेक मित्रांना त्यांनीं दिलीं. त्यांनीं 'पेन्सिल स्केचेस' किती केलीं त्याला तर गणतिच नाहीं!

# बाबूरावांच्या ग्रहयोगांचें दिग्दर्शन

(लेखक — र. कृ. फडके, शिल्पकार)




श्री. बाबूराव पेंटर यांची सायन रविकुंडली.

जन्म ता. ३ जून १८९०.

बाबूरावांची जन्म पत्रिका केलेली नव्हती. तोंडी माहितीवरून त्यांचा जन्म दिवस काढावा लागला. जन्मकाल समजण्यास मार्ग नव्हता. सूक्ष्म आणि अचूक जन्मकालाच्या अभावीं जन्म दिवशींच्या सूर्योदयाच्या वेळची कुंडली स्थूलमानानें उपयुक्त होते. ही रविकुडली— "Sun Rise Horoscope" आयुष्यांतील ठळक गोष्टींशीं पडताळून पहावी लागते. तसेंच कांहीं शास्त्रीय आडाख्यांच्या आधारें तिची उपयुक्तता अजमावतां येते. हा प्रयत्न सन १९३१—

३२ मध्यें मी कोल्हापूरला असतांना केला होता. पुढील विवेचन वाचकांना विचारणीय वाटावें अन् ज्योतिष जिज्ञासूंना तें थोडें फार उपयुक्त व्हावें असें मला सहाजिकच वाटतें.

कुंडलीचा दर्जा : प्रथम कुंडलीचा दर्जा विचारांत घ्यावा लागतो. उदित गोलार्धातील ग्रह उत्कर्षकारक असतात. या कुंडलींत रवि, बुध, नेप्च्यून, राहू, शुक्र मिळून निम्म्याहून अधिक ग्रह उदित भागांत आहेत. दक्षिण गोलार्धातील ग्रह विशेष बलवान मानतात. गुरुसारखा शुभ श्रेष्ठ ग्रह दक्षिण गोलार्धात असून तो जीवन-प्रकाशक रविचंद्राला महत्वाचा शुभयोग करीत आहे. ही स्थिति सकृत् दर्शनींच कुंडलीचा श्रेष्ठपणा दिग्दर्शित करते.

शरीरलक्षण, व्यक्तिमत्व, प्रकृतिविशेष : मिथुन लग्नाचीं लक्षणें अशीं आहेतः—

"Tall, slender, and erect figure. Long face, nose and chin; arms and fingers long; dark hair; quick sight; quick and active walk. Inclination for music, drawing, painting; good disposition, sometimes shy and retiring."

मिथुनेचा रवि व धनुराशीचा चंद्र हा ग्रहसंयोग पुढीलप्रमाणें व्यक्तिमत्व आणि प्रकृतिविशेष दिग्दर्शित करतोः—

"It would appear from this combination that you are far too active, both mentally and physically, also overdoing all things. If rest, calm and quiet are not at times enforced there will be serious danger to the life. You are inclined to be mentally although not physically combative. etc."

द्विस्वभाव राशींतील ग्रहाधिक्य अस्थिरताकारक होय. याचा प्रत्यय केव्हां केव्हां नुकसानदायकहि झाल्यावांचून राहिला नाहीं! वायुतत्त्व राशींतील ग्रहाधिक्य विशेषतः कलाभिरुचि निदर्शक असतें. तें व्यवहारीपणाला कांहींसें प्रतिकूल असून व्यवहार निष्ठ पृथ्वीतत्त्व

राशींत एकहि ग्रह नसल्यानें बाबूरावांच्या वाट्यास अव्यवहारीपणा आला व तो हानिकारकहि झाला !

कलाद्योतक योगः कलाकारक निर्दोष शुक्र धनस्थानांत, कर्क या महत्त्वाकांक्षादर्शक चर राशींत उदित आहे. ज्या अंशांत शुक्र आहे त्या कर्क राशीच्या अंशाचें वर्णन असें आहेः—

"A Painter at his easel in a graceful forest glade. It is the hour of sunset and strange shadows of unearthly grandeur are falling."

"Denotes one of much perseverance and artistic power, to whom the poetry of form and colour appeal most magically. He has a love of quiet and rustic life will help to draw to his Soul a wealth of inspiration and calm. It is a symbol of sublimity."

शुक्र चंद्राच्या घरांत आहे अन् चंद्र धनु राशीच्या ज्या अंशांत आहे त्याचें वर्णनेहि वरील वर्णनाला अगदीं जुळतें असें आहेः—

"A Painter at his easel in a forest up-land observing not the heavy black clouds which betray an approaching storm."

"Denotes one of a refined and sensitive spirit capable of becoming so absorbed in his studies that he detaches himself from the world and its peoples. The love of nature and the beautiful is very great and may sever his sympathy from the ordinary routine of earthly desires and ambitions. He may obtain excellence in his sphere and some degree of honour, but there is a fatality connected with this degree which will claim him sooner or later."

याबाबत आणखी एक सांगण्याजोगा ज्योतिष चमत्कार हा कीं, प्रस्तुत लेखाविषयींचें प्रो. फडक्यांचें मागणीपत्र मला ता. २६

मार्च १९५४ रोजीं मिळालें. या दिवशीं चंद्र व मंगळही धनुराशींतच होता. ही चंद्रमंगळाची युति मूळ कुंडलींतही आहे ! ज्योतिष विषयाच्या अभ्यासांत असे विस्मयकारक व उपयुक्त प्रत्यय वरचेवर येतात. ते काकतालीय न्यायांत ढकलण्याचें साहस ज्योतिष जिज्ञासू करूं शकत नाहींत.

बाबूरावांच्या वयाच्या २७ व्या वर्षीं दिनवर्ष रवि व मूळ शुक्र यांची शुभकारक युति झाली. ती बाबूरावांच्या उदयास कारण होऊन, तेव्हांपासून त्यांचा अधिकाधिक उत्कर्ष होत गेला. याच सुमारास महाराष्ट्र फिल्म कंपनीची स्थापना झाली. लो. टिळकांच्या हस्तें बाबूरावांना सुवर्ण पदकाचा बहुमान मिळाला.

**कांहीं ठळक गोष्टी :** रवि चंद्र हे जीवनप्रकाश ग्रह अशुभ ग्रह संयोगांनीं दूषित झालेले आहेत. ही स्थिति आयुष्यक्रमांत चढउतार दर्शविते. आरोग्याच्या दृष्टीनेंहि ती बाधकच होय. " प्लेग "सारखी प्राणघातक दुखणीं बाबूरावांना भोगावीं लागलीं. प्लेगच्या विकारानें बाबूरावांच्या वाणींत दोष उत्पन्न झाला. रविचंद्र प्रतियोग डोळ्यांना बाधक होण्याचा संभव असतो. कांहीं वर्षांपूर्वीं एका दुर्धर आजारांत याचा अनुभव आला. एकंदर ग्रहमानाला गुरुसारख्या शुभ श्रेष्ठ ग्रहाचा स्पृहणीय आधार असल्यामुळें कोणतीहि अनिष्ट गोष्ट फारशी विकोपाला न जातां अडचणींतून व आजारांतून मुक्तता होत गेली.

सन १९३१–३२ च्या सुमारास दिनवर्ष रवि मूळ हर्शलशी अशुभ केंद्रयोग करीत होता. यावेळीं बाबूरावांच्या चित्रपट व्यवसायांत अनिष्ट उलटापालट झाली. हा दशाकाल अनपेक्षित व अटळ अशी संकटपरंपरा निर्माण करतो.

चंद्रमंगळ युति अग्नीपासून भय निर्माण करते. बाबूरावांचा चित्रपट कारखाना आगीच्या खाईत नष्ट होण्यास हीच युति कारण झाली. सप्तम स्थानांतील ( जायाभुवन ) या युतिमुळेंच द्विभार्यायोग आला. गुरुच्या शुभसंबंधामुळें द्वितीय संसारसुख लाभलें.

निधनकारक–दशाकाल : मरणसमयीं बाबूरावांचे ६४ वें वर्ष चालू होतें. या वर्षी रविगुरु प्रतियोग व शनि, मंगळ, नेपच्यून केंद्र योग हे दिनवर्ष पद्धतीचे अनिष्ट दशाकाल निधनकारक झाले असें स्थूल मानानें म्हणतां येईल. दिन वर्ष रवि गुरुच्या प्रतियोगांत येऊन गुरुसारख्या शुभग्रहाचा बलवान आधार थोडा बहुत क्षीण होतांच मूळ अनिष्ट योग व अशुभ दशाकाल विघातक झाले.

बुध लग्नेश, शनि रोगस्थानाचा मालक, व मंगळ मृत्युस्थानाचा अधिपति यांचे मूळ अंशांतरानें झालेले अशुभ योग दिनवर्ष पद्धतीनें पूर्णपणें अंशात्मक योगांत येऊन त्यांनीं आपला दुष्ट परिणाम घडवून आणला. या सुमारासच चलित चंद्र हर्शलच्या प्रतियोगांत आला होता. दूषित हर्शल आकस्मिकपणें प्रक्षोभक बनतो. रवि, सिंह राशी व पंचमस्थान पीडित झालें असतां हृदयक्रिया बंद पडून आकस्मिक मरण ओढवतें. गोचर शनिमंगळाची मृत्युनिदर्शक वृश्चिक राशींतील अनिष्ट युति रोगस्थानांत बसली होती.

जन्मानंतर पंधरा दिवसांनीं–ता. १७ जून १८९० रोजीचें सूर्यग्रहण जन्मलग्नीं पडलें, आणि मरणानंतर तिसऱ्याच दिवशीं–ता. १९ जानेवारी १९५४ रोजीचें चंद्रग्रहण कुंडलीच्या मृत्युस्थानीं पडलें ! हें ग्रहण हर्शलच्या अशुभ संयोगानें अधिक प्रक्षोभक झालें ! वरील दोन ग्रहणांच्या तारखांमधली ता. १६–१–५४ मृत्यूनें गांठली ! ग्रहणाचे परिणाम तीव्र असून ते आगामी अथवा नंतर घडून येतात. अनिष्ट दशाकालांत ग्रहणयोगाची अशुभ भर पडली !

आरंभीं म्हटल्याप्रमाणें सूक्ष्म व अचूक जन्मकालाच्या अभावीं स्थूलमानानें एवढेंच दिग्दर्शित करतां येण्याजोगें आहे.

# श्रद्धांजलि

## १ ना. सी. फडके

एखाद्या मोठ्या कलावंताचं अकालीं निधन झालं कीं आपल्याला दुःखाचा मोठाच तडाखा बसतो. त्या मानानं तें निधन अकालीं नसेल तर दुःखाची तीव्रता कमी असते. पण तरीसुद्धां मृत्यु या गोष्टीचा अर्थ कायमची ताटातूट असाच असतो. जो मृत्यु पावला त्याची इहलोकांतली यात्रा संपली, त्याचा आणि आपला संबंध संपला, कलेच्या इतिहासांतलं एक प्रकरण कायमचं मिटलं, परंपरेच्या सांखळींतला एक दुवा तुटला असाच असतो. आणि हा अर्थ मनांत आला कीं अंतःकरण शोकानं विव्हल झाल्याखेरीज राहत नाहीं. श्री. बाबूराव पेंटर यांच्या निधनाची बातमी ऐकून महाराष्ट्रांतील अक्षरशः हजारों स्त्री-पुरुषांना अत्यंत दुःख झालं असेल याविषयीं मला शंका नाहीं. कारण बाबूराव पेंटर यांच्या विविध कर्तृत्वाचा तपशील ज्यांना माहीत नाहीं त्यांनादेखील एवढं ठाऊक आहे कीं बाबूराव पेंटर यांचं आपल्यावर फार मोठं ऋण आहे, बाबूराव पेंटर ही केवळ एक व्यक्ति नव्हती तर एक संस्था होती. या संस्थेचा मृत्युलोकांतला कारभार कायमचा संपुष्टांत आला ही एक शोककारक घटना आहे.

श्री. बाबूराव पेंटर हे गेल्या दहा वर्षांत लोकांच्या नजरेसमोर फारसे नव्हते. त्यांच्या उद्योगांची जाहिरात थोडीशी पुसट झाली होती. त्यांची उद्योगशीलता किंवा महत्वाकांक्षा कमी झाली होती असं नव्हे. सतत उद्योग आणि कांहीं तरी मोठं करून दाखविण्याची सतत धडपड हे बाबूराव पेंटरांच्या स्वभावांतील प्रमुख गुण होते. कोल्हापुरास जाणाऱ्या प्रत्येक रसिक माणसानं ज्या व्यक्तीला एकदां पाहिलंच पाहिजे अशीच व्यक्ति बाबूराव अजूनही होते. आणि ज्या घराला कलासक्त यात्रिकानं एकदां भेट दिलीच पाहिजे असंच कलेच्या प्रांतांतलं एक पुण्यक्षेत्र बाबूरावांचं घर अजूनही होतं. परंतु आजच्या जाहिरातबाजीच्या जगांत बाबूरावांच्या उद्योगांना अग्रेसर

स्थान आतांशा राहिलं नव्हतं. सिनेमाच्या क्षेत्रांत चढणं आणि पडणं या दोन क्रिया फार झपाट्यानं घडत असतात. कालचा सम्राट आणि साम्राज्ञी आज शिल्लक रहात नाहींत. लोकांची अभिरुचि वेगानं बदलत आहे. भांडवल आणि जाहिरात या दोन गोष्टींना विपरीत महत्व आलेलं आहे. केवळ गुणाला आणि कर्तृत्वाला मान मिळेलच अशी खात्री राहिलेली नाहीं. अशा या आजच्या मायेच्या बाजारांत चालू दैवतांच्या पूजेसाठीं वाजविल्या जाणाऱ्या नगाऱ्यांच्या आवाजांत बाबूरावांच्या उद्योगांचा आणि गुणांचा बोलबाला क्षीण झाला होता ही कांहीं आश्चर्याची गोष्ट नाहीं. खेदाची गोष्ट असंही मी म्हणणार नाहीं.

कारण बाबूराव पेंटर यांचा जनतेला संपूर्ण विसर पडला नव्हता. पडणं शक्यचं नव्हतं. जे महाराष्ट्रीय कलावंत आज सिनेमाक्षेत्रांतल्या आघाडीवर आहेत त्यांच्या तोंडचं एक वाक्य आजच्या तरुण पिढीच्या कानांवर सतत पडत आहे. "बाबूराव पेंटर हे आमचे गुरु होते" हें तें वाक्य होय. हें वाक्य मोठ्या अभिमानानं उच्चारणारीं कमींत कमी चार पांचशें माणसं चालू घटकेला सिनेमा क्षेत्रांत सहज आढळतील. बाबूरावांच्या थोरवीचं हें एक मोठं गमक आहे. सिनेमासृष्टींत बाबूराव पेंटर अग्रभागी नव्हते. परंतु जे महाराष्ट्रीय कलावंत किंवा कारागीर आज अग्रभागीं आहेत त्यांनीं कलेचे आणि कसबाचे पहिले धडे कुठें घेतले, तर बाबूरावांकडे! किंवा त्यांच्या एखाद्या शिष्याकडे! 'महर्षि' हा किताब बाबूरावांना कोणी आणि केव्हां दिला मला माहीत नाहीं. असल्या किताबांची तारीख बहुधा नोंदलेली नसतेच. बाबूरावांच्या शुभ्र दाट ऐटबाज टागोरछाप दाढीमुळें त्यांना हा किताब शोभत होता खासच. परंतु त्या किताबांत तेवढाच अर्थ नव्हता, अधिक खोल अर्थ होता. एखाद्या ऋषीप्रमाणें त्यांनीं कलावंताचं 'कुल' निर्माण केलं होतं. आजचे शेंकडों कलावंत त्यांचंच कुल किंवा गोत्र सांगतात. महाराष्ट्रीय चित्रपटाची कला आज पुष्कळच बदलली आहे, पुढें गेलेली आहे. परंतु नीट निरीक्षण करणाराला त्या कलेवरन्‌ा बाबूरावांचा ठसा अजूनदेखील स्पष्ट दिसतो.

गाणारे लोक ज्याप्रमाणें मी अमक्या घराण्याचा म्हणून सांगतात त्याप्रमाणें महाराष्ट्रीय चित्रपटकलेनं अजूनही बाबूरावांचंच घराणं सांगायला हवं. सासरीं जाऊन लेकुरवाळी झालेली स्त्री कितीही वैभवांत असली तरी ज्याप्रमाणें माहेर कधीं विसरत नाहीं त्याप्रमाणेंच महाराष्ट्रांतील चित्रपटकला कितीही वाढली तरी 'माझं माहेर' म्हणून बाबूरावांच्या पहिल्या चित्रपट संस्थेचाच उल्लेख तिला करावा लागेल. या माहेरघरांत कमी अधिक नांदून जीं माणसं बाहेर पडलीं त्यांनीं यशाची आणि कीर्तीची वाटचाल केली. बाबूराव ही एक व्यक्ति नव्हती. संस्था होती. मराठी चित्रपटांचा लौकिक देशभर पसरविण्याचं महत्कार्य करणारा पहिला कलावंत म्हणून बाबूराव पेंटर यांचाच उल्लेख करावा लागेल.

बाबूरावांची महाराष्ट्र फिल्म कंपनी १९१७ सालीं स्थापन झाली. त्याच्या आधीं महाराष्ट्रांत चित्रपटांचा जन्म झाला होता. आद्य चित्रपटनिर्माते म्हणून दादासाहेब फाळके यांचंच नांव घ्यायला हवं. परंतु फाळक्यांच्या या पदवीला धक्का न लावतां असं म्हटलंच पाहिजे कीं मराठी चित्रपटांच्या कीर्तीचं युग सुरू करण्याचा मान बाबूरावांचा आहे.

अण्णासाहेब किर्लोस्करांच्या पूर्वी मराठी नाटकांचा जन्म झाला होता. पहिले मराठी नाटककार असं अण्णासाहेबांचं वर्णन करतां येणार नाहीं. परंतु संगीत मराठी नाटकांची देदीप्यमान सृष्टि निर्माण करणारे म्हणून अण्णासाहेब किर्लोस्करांचंच नांव इतिहासांत नमूद केलं पाहिजे. बाबूराव पेंटर यांची चित्रपटसृष्टींतील कामगिरी किर्लोस्करांच्या नाट्यसृष्टींतल्या कामगिरीसारखीच आहे. किर्लोस्करांच्या नाटकांपुढें ज्याप्रमाणें इतरांचीं नाटकं भरारा पडलीं व त्यांच्या नाटकांनीं ज्याप्रमाणें साऱ्या महाराष्ट्राला वेड लावलं, त्याप्रमाणेंच बाबूरावांचा पहिला चित्रपट 'सैरंध्री' प्रकाशित झाल्याबरोबर महाराष्ट्राच्या कलाक्षेत्रांत एका नवीन युगाचा प्रारंभ झाला असं साऱ्यांना वाटलं; आणि अण्णांच्या एकेका नवीन नाटकाची लोक चातकासारखी वाट बघत असत त्याचप्रमाणें बाबूरावांच्या एकेका

नवीन चित्रपटाकडे लोकांचे डोळे लागलेले असत. ' सिंहगड ' चित्रपटानं तर प्रेक्षकांच्या गर्दीचे उच्चांक सर्व ठिकाणीं गाठले, आणि त्या चित्रपटांत तानाजीची भूमिका करणाऱ्या बाळासाहेब यादवांना बघण्यासाठीं लोकांच्या झुंडीच्या झुंडी प्रत्येक सत्कारप्रसंगीं लोटूं लागल्या. शिवाजी महाराजांच्या काळांत रणझुंजार मराठ्यांनीं केलेले पराक्रम पडद्यावर पाहतांना प्रेक्षकांच्या वृत्ति कशा उचंबळून येत असत तें शब्दांनीं वर्णन करून सांगणं शक्य नाहीं. खाडीलकरांचं ' कीचकवध ' नाटक ज्या कारणांनीं आणि जितकं लोकप्रिय झालं होतं, त्याच कारणांनीं बाबूरावांचा ' सिंहगड ' चित्रपट महाराष्ट्रभर तितकाच गाजला. तो चित्रपट पाहणं म्हणजे एक स्फूर्तिदायक अविस्मरणीय अनुभव होता. गेल्या पंचवीस वर्षांत प्रेक्षकांना असा रोमांचकारी अनुभव देणारा दुसरा चित्रपट झाल्याचं मला माहीत नाहीं. ' शाकुंतल ' या पहिल्या नाटकानं महाराष्ट्राला अण्णासाहेब किर्लोस्करांची ओळख झाली, परंतु नंतरच्या ' सौभद्र ' नाटकानं अण्णासाहेब रसिकांच्या गळ्यांतले ताईत बनले, त्याचप्रमाणें 'सैरंध्री' या पहिल्या चित्रपटानं सव्वीसाव्या वर्षींच दाढी राखणारा कोल्हापूरचा एक कल्पक कलावंत महाराष्ट्राला माहीत झाला व लोकमान्य टिळकांच्या हस्तें सुवर्णपदकहि त्याला मिळालं, परंतु त्या वेळच्या चित्रपटशौकिनांच्या गळ्यांतले ताईत बाबूराव बनले ते ' सिंहगड ' या चित्रपटामुळें ! चित्रपटांच्या वैभवसंपन्न युगाचा प्रारंभ करणारे बाबूराव पेंटर ठरले तें ' सिंहगडा ' मुळें !

चित्रपटांत पैसा मिळविण्यासारखा आहे हें कळल्याबरोबर मुंबईच्या धनिकांचं लक्ष त्यांकडे गेलं नसतं तर नवल होतं. त्यांचं लक्ष गेल्याबरोबर चित्रपटनिर्मिति मुंबईस सुरू झाली बाबूरावांच्या हातांत जिची सुरवात कला म्हणून झाली होती तिचा या लोकांना व्यापार सुरू केला. चित्रपटाच्या उद्योगाकडे धनिकांची दृष्टि वळली असं म्हणण्यापेक्षां त्या उद्योगाला त्याची ' दृष्ट लागली ' असं म्हणणंच अधिक यथार्थ होईल. राज्यकर्त्यां व पराक्रमी मराठ्यांचं वैभव ज्या ठिकाणीं अजूनहि थोडंसं रेंगाळत होतं अशा निसर्गरम्य

कोल्हापुरांत चित्रपटांची जी नदी १९१७ सालीं उगम पावली, ती हळूंहळूं व्यापारा मुंबइच्या समुद्राला येऊन मिळाली, आणि शुद्ध कलात्मकतेच्या पाण्याची गोड चव नाहींशी होऊन द्रव्यदृष्टीच्या खाऱ्या पाण्याचं रूप तिला आलं.

मुंबई चित्रपटनिर्मितीचं मोठं केन्द्र बनायला अवकाश लागला नाहीं. थोड्याच दिवसांत हुगळी नदीवरच कलकत्ता शहरहि या चढाओढींत सामील झालं. तथापि बाबूराव पेंटर यांचं अद्वितीय स्थान अढळ राहिलं. बाबूरावांच्या महाराष्ट्र फिल्म कंपनीच्या चित्रपटाची सर इतर कुणाच्याहि चित्रपटांना नाहीं याबद्दल साऱ्या रसिकांची एकवाक्यता सुमारें बारा वर्षं अढळ राहिली. हीं बारा वर्षं म्हणजे बाबूरावांच्या वाढत्या लोकप्रियतेचं उज्ज्वल युग होतं. कोल्हापूर हीच चित्रपटांची राजधानी होती. बाबूराव हेच चित्रपटनिर्मितीच्या क्षेत्रांतले अजिंक्य सम्राट होते. भारतीय चित्रपटांचा इतिहास लिहिणाराला बाबूरावांचं आणि कोल्हापुराचं वर्णन या शब्दांत करावंच लागेल.

१९३० च्या सुमारास चित्रपट बोलके झाले. चित्रपटांना वाचा फुटल्याबरोबर त्यांवर भाषेची मर्यादा पडली. चित्रपटांत साहित्याला व संगीताला एकदम प्रमुख स्थान मिळालं. एक नवाच जमाना सुरू झाला. आणि या नव्या जमान्यानं बाबूरावांच्या कर्तृत्वावर मोठाच आघात केला.

या आघातांतून स्वतःला पूर्णतः सावरण्यांत बाबूरावांना अखेरपर्यंत विशेष यश मिळालं नाहीं. ते एकदां मागें पडले ते पुढें आघाडीवर येऊं शकले नाहींत. एके काळीं ज्यानं मैदानं गाजविलीं परंतु आतां ज्याची कुस्ती पहाण्यांत राम नाहीं अशा कुस्तीगीरासारखी त्यांची अवस्था झाली. बोलक्या चित्रपटांच्या काळांतहि बाबूरावांनीं चित्रपटनिर्मिति केली. 'सावकारी पाश' हा त्यांचा बोलका चित्रपट 'सिंहगड'प्रमाणें गल्लाभरू ठरला नाहीं, परंतु तो आदर्श चित्रपट होता याविषयीं कुणाचं दुमत नाहीं. तथापि गेल्या चोवीस वर्षांत 'सावकारी पाश' हें एकच एक मोलाचं लेणं



बाबुरावांनीं तयार केलेला "दख्खन दिमाख" मध्यें मांडलेला गांधीजींचा प्रचंड बस्ट.

मराठी चित्रपटांच्या अधिष्ठात्री देवतेला बाबूराव घालूं शकले. १९१८ ते १९३० हें सबंध तप ज्यांच्या जयजयकारानं घुमलं होतं त्या बाबूराव पेंटरांची पुढच्या दोन तपांतली उल्लेखनीय कामगिरी म्हणजे फक्त 'सावकारी पाश' हा सुंदर हृदयस्पर्शी बोलका चित्रपट !

असं कां झालं? या प्रश्नाचा विचार करण्यासारखा आहे. आणि साऱ्या गोष्टी दिलखुलासपणानं सांगण्याचं जरी हें स्थळ नसलं तरी उत्तराची दिशा दाखवितां येण्यासारखी आहे. वास्तविक कोल्हापुरच्या राजघराण्याच्या कृपेनं 'शालिनी सिनेटोन' ही नवी संस्था बाबूरावांच्या हातीं आली तेव्हां आपलं पहिलं मानाचं अग्रस्थान बोलक्या चित्रपटांच्या जमान्यांतही टिकाविण्याची सुवर्णसंधि बाबूरावांना मिळाली होती. त्यांच्या शिष्यांनीं काढलेली 'प्रभात फिल्म कंपनी' कीर्तीच्या वाटेनं घोडदौड करांत चालली होती. प्रेक्षकांजवळ भरपूर पैसा होता. चढाओढ तीव्र नव्हती. परंतु अशी सर्व बाजूंनीं अनुकूल परिस्थिति असतांना देखील 'सावकारी पाश'-खेरीज एकही गाजणारा चित्रपट बाबूराव काढूं शकले नाहींत. शालिनी सिनेटोनचं तारूच हळूं हळूं नुकसानीच्या पाण्यांत बुडालं. बाबूराव दूर झाले. आणि दूर झाल्यावर चित्रपटसृष्टीपासून अखेरपर्यंत दूरच राहिले. रसिकांच्या अंतःकरणावर ते आपली पकड पुन्हां बसवूं शकले नाहींत. संस्था चालविणं आणि टिकाविणं यासाठीं जे गुण आवश्यक असतात ते या थोर कलावंतांच्या ठिकाणीं नव्हते, हें एक कारण झालं. दुसरं कारण मला वाटतं तें हें कीं बाबूरावांच्या बुद्धिमत्तेला कांही विशिष्ट मर्यादा पहिल्यापासूनच होत्या. या मर्यादा घातक ठरूं नयेत असं जोंपर्यंत चित्रपटांचं स्वरूप होतं तोंपर्यंत त्या उघड झाल्या नाहींत, आणि बाबूराव महत्कार्य करूं शकले. परंतु चित्रपटांच स्वरूप बदलल्याबरोबर— म्हणजे चित्रपट बोलके झाल्याबरोबर— या मर्यादा उघड्या पडल्या आणि बाबूरावांच्या कर्तृत्वाचा कोंडमारा झाला. साहित्य आणि संगीत हीं चित्रपटांचीं प्रमुख आकर्षणं बनलीं. आणि, या दोन बाबतींत तर

बाबूरावांची गति फार थोडी होती. साहित्याचं विशिष्ट स्वतंत्र मूल्य बाबूरावांच्या आकलनशक्तिपलीकडचं होतं; आणि तीच गोष्ट संगीताची! चित्रपट मुके होते तोंपर्यंत चित्रपटनिर्मितीचा संसार फार सुटसुटीत होता. केवळ चित्रकार असलेले बाबूराव तो संसार सुंदर रीतीनं थाटूं शकत होते. परंतु साहित्य आणि संगीत यांचा प्रवेश झाल्यावर निर्मितीचा संसार भलताच वाढला. साधनांची अनेकता निर्माण झाली. एकटे चित्रकार बाबूराव या नव्या जबाबदारीला पुरे पडण्यासारखे नव्हते. निर्माता आणि दिग्दर्शक केवळ चित्रकार आणि कॅमेरामन असून आतां भागण्यासारखं नव्हतं.

साहित्याची आणि संगीताची मूल्यं त्याला कळायला हवीं, कळत नसतील तर ज्यांना तीं कळतात त्यांचा सल्ला त्यानं मानायला हवा अशी नवी गरज उत्पन्न झाली. या दोन्ही गोष्टी बाबूरावांच्या अंगीं दुर्दैवानं नव्हत्या. बाबूराव मागं पडले ते कायमचे मागं पडले याचं कारण बऱ्याच अंशानं हें आहे असं मला वाटतं. बाबूराव अत्यंत कल्पक यंत्रविशारद होते, आणि त्यांची प्रतिभा चित्रकलेंत रंगणारी होती. म्हणूनच त्यांनीं एक सबंध तप चित्रपटसृष्टींत गाजविलं! परंतु ते फक्त चित्रकार होते, चित्रपटाकडे फक्त चित्रकाराच्या दृष्टीनं ते बघूं शकत होते, साहित्याच्या व संगीताच्या दृष्टीनं बघतां येऊं नये इतका त्या दृष्टीचा पगडा त्यांच्यावर होता, म्हणूनच ते नंतरच्या दोन तपांत अस्तंगत झाले!

चित्रपटनिर्मितीच्या क्षेत्रांत बाबूरावांच्या पराक्रमाला त्यांच्या जीविताच्या उत्तरार्धांत अवकाश राहिला नाहीं. परंतु कलेचं दुसरं एक क्षेत्र असं होतं कीं ज्यांत सहकाऱ्यांची आवश्यकता नव्हती, बाबूराव एकहाती पराक्रम दाखवूं शकत होते.

तें क्षेत्र चित्रकलेचं क्षेत्र होय. या कलेंत बाबूरावांचं स्थान मानाचं आहे. बाबूरावांचा आत्मा चित्रकाराचा. त्यांची सौंदर्यदृष्टि अलौकिक. त्यांचा हात विलक्षण गोड. आणि त्यांचं कुंचल्याचं कसब इतकं बारकाव्याचं कीं कुठली रंगछटा कुठें सुरू झाली तें

पाहणाराला कळूं नये. या गुणांमुळें त्यांच्या चित्रांत एक अवर्णनीय मोहिनी असे. आज साहित्याप्रमाणेंच चित्रकलेच्याहि प्रांतांत नाना प्रयोग चालले आहेत. नाना संप्रदाय निर्माण झाले आहेत नवे जुन्यांना नांवं ठेवीत आहेत. नवकाव्य आणि नवकथा यांच्याप्रमाणेंच नव्या चित्रकलेचे ढोल वाजत आहेत. चित्रांचे अर्थ समजून घेण्याची वेळ आली आहे. आणि अर्थ सांगणारे टीकाकारही बाजारांत पुष्कळ आहेत. या नव्या दंगलींत बाबूरावांच्या चित्रांचं काय मूल्यमापन होईल तें सांगणं कठीण आहे. पण मीं इतकं खचित म्हणू शकतों कीं आजच्या मोठमोठ्या नवचित्रकारांना बाबूरावांच्या चित्रासारखं चित्र काढणं कठीण जाईल. त्यांनीं काढलेली ‘सरस्वति’ त्यांनीं काढलेला ‘दत्त’ इत्यादि चित्रं महाराष्ट्रांत घरोघरीं मला दिसतात. साधनांची अनुकूलता त्यांना लाभली असती तर रविवर्म्याप्रमाणें त्यांनीं चित्रांमागून चित्रं काढलीं असतीं. परंतु त्यांच्या हातच्या चित्रांची संख्या मर्यादित असली तरी गेल्या चाळीस वर्षांत होऊन गेलेल्या महाराष्ट्रीय चित्रकारांत त्यांना फार वरचं स्थान द्यावं लागेलच. “जादूगार,” “दौलत,” “अटकेपार,” “गुजगोष्टी” इत्यादि माझ्या पुस्तकांसाठीं त्यांनीं तयार केलेलीं मुखपृष्ठ म्हणजे साहित्याच्या प्रांतांतला एक नवा उपक्रम तर होताच. परंतु शिवाय तीं चित्रं म्हणजे बाबूरावांच्या चित्रकलेचे नमुने होते. त्या काळांतले माझे टीकाकार म्हणत बाबूराव पेंटरांच्या चित्रांमुळें फडक्यांचीं पुस्तकं खपतात. या टीकेंत बाबूरावांचा जो गौरव होता त्याचा मला मोठा आनंद होत असे.

आज सिनेमाच्या पोस्टर्सची कला खूप पुढें गेली आहे. खूप मोठाल्या भव्य पोस्टर्सची आतषबाजी थिएटरावर करणं ही नित्याची गोष्ट झाली आहे. या प्रथेचे आद्य जनक बाबूराव होते हें विसरतां येणार नाहीं. १९२८ते१९३० या कालखंडांत बाबूरावांच्या चित्रपटांप्रमाणें त्यांनीं तयार केलेली मोठालीं भव्य पोस्टर्स हा रसिकांच्या कौतुकाचा आणि आदराचा मोठा विषय होता. चित्रपटाच्या आधीं आठ दहा दिवस बाबूरावांची पोस्टर्स मुंबईच्या मॅजेस्टिक

सिनेमाच्या प्रवेशद्वारावर लागत, आणि एखादं महत्त्वाचं प्रदर्शन बघायला यावं त्याप्रमाणें मुंबईतले सारे मोठमोठे चित्रकार हीं पोस्टर्स बघावयासाठीं येत. कोणत्याही चित्राखालीं बाबूरावांनीं कधीं सही केली नाहीं. चित्र हीच त्यांची सही होती. दुसऱ्या कुणाही चित्रकाराचा हात तसं चित्र काढूं शकत नव्हता. आकृतीच्या रेखेचा जोमदारपणा व प्रमाणबद्धता आणि रंगछटांचा नाजूक खेळ हे त्यांच्या चित्रांचे विशेष होते. त्यांचं एकेक पोस्टर असं होतं कीं तें मुंबईच्या वार्षिक प्रदर्शनांत मांडलं असतं तर सुवर्णपदक घेऊन गेलं असतं. चित्रकलेच्या सर्व शाखांत बाबूरावांचा कुंचला चालत असे. लँडस्केप, डिझाइन, पोर्ट्रेट हे सर्व चित्रप्रकार ते सारख्याच कौशल्यानं रंगवीत, व त्यांच्या विशिष्ट जोमदार रेषेचा आणि नाजुक रंगक्रीडेचा ठसा सर्वांवर असे.

कोल्हापूरच्या राजघराण्याकडून त्यांना पुष्कळ पोर्ट्रेट्सचीं कामं मिळालीं. या चित्रांपैकीं अश्वारूढ राजाराम महाराजांचा भव्य पोर्ट्रेट विशेष उल्लेखनीय आहे.

सुमारें १९३१ सालीं बाबूराव शिल्पकलेकडे वळले आणि तेव्हापासून त्यांनीं शिल्पकलेची पुष्कळ मोठालीं कामं केलीं. त्यांच्या रंगचित्रांप्रमाणेंच शिल्पकृतीचेही विशेष गुण रेषेचा जोमदारपणा, आकृतीची प्रमाणबद्धता, आणि एकंदर शिल्पांत प्रत्ययास येणारा शिल्पकाराच्या हाताचा नाजुक गोडवा हेच होते. आठ आठ नऊ नऊ फुटांचे भव्य पुतळे करणारे बाबूराव शिवराईएवढ्या हस्तिदंतांत पोर्ट्रेट कोरण्याचं कामही उत्कृष्ट करीत असत. त्यांचा आत्माच चित्रकाराचा होता. ज्या प्रकाराला ते हात लावतील त्याचं सोनं व्हाव अशी त्यांना देणगी होती. त्यांनीं जेव्हां शिल्पकाराचा उद्योग सुरू केला तेव्हां त्यांनीं हें ओळखलं कीं पुतळे बनविणाराला पुतळ्यांचं ओतकाम करणाऱ्यावर फार अवलंबून राहवं लागतं, आणि ओतकामाची स्वतःची भट्टी उभी करण्याचं त्यांनीं ठरविलं. त्यांच्याकडे जाणाऱ्या प्रत्येक पाहुण्याला चालू पुतळ्याप्रमाणेंच ही भट्टीही ते दाखवित असत. परोपरीचे प्रयोग करून



" दख्खन दिमाख " प्रदर्शनांत मांडण्यासाठीं गांधीजींचा प्रचंड बस्ट तयार करतांना बाबुराव.

त्यांनीं एक अत्यंत सुंदर ओतकामाची भट्टी बनविली होती. आपल्या सर्व पुतळ्यांचं ओतकाम त्यांनीं स्वतःच्या भट्टींत केलं होतं. पुतळे घडविण्यांत बाबूरावांच्या ठिकाणचा चित्रकार जितका रमत असे तितकाच त्यांच्या ठिकाणचा यंत्रविशारद या भट्टीच्या कामांत रमत असे. सामान्य लोकांना माहीत नाहीं, परंतु बाबूराव पेंटर जितके मोठे कलावंत होते तितकेच मोठे यंत्रविशारद होते. त्यांनीं आपल्या पहिल्या चित्रपटासाठीं स्वतः कॅमेरा बनविला होता. पुढें परदेशी कॅमेरा विकत घेण्याइतकी सांपत्तिक स्थिति सुधारल्यावरही महाराष्ट्र फिल्म कंपनींत प्रारंभींचा हा कॅमेरा प्रदर्शनासाठीं मांडून ठेवलेला होता. चित्र रंगविण्यापेक्षांहि यंत्राची खटपट करण्यांत ते अधिक गर्क होऊन जात. एकदां पनवेलच्या माझ्या एका मित्रांकडे मी बाबूरावांना घेऊन गेलों असतांना त्यांनीं आपली नादुरुस्त मोटार बाबूरावांना बक्षीस दिली. नवी गाडी मिळाली असती तर बाबूरावांना इतका आनंद झाला नसता. रात्रभर खटपट करून त्यांनीं ती जुनी मोटार चालूं केली, व त्या गाडींत बसूनच आम्हीं पुण्यास आलों! बाबूरावांच्या हातांत एखादं सुंदर विलायती खेळणं आलं कीं तें उचकून आंतली यांत्रिक रचना बघितल्याखेरीज त्यांचं समाधान होत नसे. मुलांचं नवं खेळणं आपण मोडून टाकीत आहोंत याचं भान त्यांना रहात नसे. त्यांना यंत्रांचं इतकं वेड होतं कीं निराळ्या परिस्थितींत ते मोठे यंत्रशोधक झाले असते.

बाबूरावांनीं सिनेमाचं, चित्रकलेचं, किंवा शिल्पकलेचं शिक्षण कुठेंही घेतलं नव्हतं. ते स्वतःच स्वतःचे गुरु होते आणि शिष्यहि होते! या कारणानंच कीं काय कोण जाणे, त्यांनीं कोणत्याहि कलेचं प्रत्यक्ष शिक्षण कुणालाच फारसं दिलं नाहीं. त्यांच्या घरीं नित्य किती तरी तरुण मुलं शिकायसाठीं म्हणून येत. परंतु त्यांनीं शिकवलं नाहीं कुणालाच! स्वतःच्या मुलालादेखील! आणि तरीसुद्धां केवळ बाबूरावांच्या घरीं जाऊन जाऊन कित्येक मुलं चित्रकार झालीं. जीं माणसं स्वयंसिद्ध मोठीं होतात

महाराष्ट्र फिल्म कंपनींतील शिष्यांसह



फत्तेलाल, धायबर, कुळकर्णी,
शांताराम, बाबुराव, रवींद्र, दामले

त्यांना बहुधा असं वाटतं कीं आम्हांला कधीं कुणी शिकवलं ? आणि हेंहि खरं कीं कोणतीही कला शिकवितां येत नाहीं ! शिकतां मात्र येते ! बाबूरावांच्या विशिष्ट पद्धतीनं चित्र काढणारे चित्रकार आहेत. ते स्वतःला बाबूरावांचे शिष्य म्हणवितात. परंतु बाबूरावांनीं कुणालाहि प्रत्यक्ष शिकविलं नाहीं. त्यांचं काम आणि त्यांचा उद्योग हीच एक मोठी संस्था होती ! त्यांचा सहवास हीच एक मोठी शाळा होती !

चित्रपट काढण्याच्या बाबतींत बाबूरावांची एक विशिष्ट दृष्टि होती, आणि एक विशिष्ट घाटणी होती. त्यांच्याकडून चित्रपट-सृष्टीला कायमचा वारसा मिळाला आहे तो याच दोन गोष्टींचा. चित्रपटासाठीं विषय निवडण्यापासून तों अखेरच्या संकलनापर्यंत प्रत्येक गोष्टीवर या दृष्टीचा आणि घाटणीचा ठसा बाबूराव उमटवीत असत. सुमारें चोवीस वर्षांपूर्वीं लंडन येथील एका जागतिक प्रदर्शनांत बाबूरावांचा 'सिंहगड' चित्रपट दाखविला गेला त्या वेळेस परीक्षकांनीं दिलेल्या प्रशस्तिपत्रांत पुढील वाक्य होतं. "This picture is an outstanding example of sincerity of direction." म्हणजे बाबूरावांच्या दिग्दर्शनांतील आत्यंतिक जिव्हाळ्यावर ते परीक्षक खूष झाले होते. ग्रामीण जीवनाचे चित्रपट अलीकडेच निघूं लागले असं आपण समजतों. परंतु तें चुकीचं आहे. बाबूरावांच्या ऐतिहासिक चित्रपटांनीं महाराष्ट्राच्या अंतःकरणाची पकड एकदम घेतली याचं कारण ग्रामीण जीवनांतील साधेपणा, दणकटपणा, साहस, पराक्रम, वीराला साजेसा शृंगार, इत्यादि महाराष्ट्रीय ग्रामीण जीवनाच्या विशेषांचं दर्शन लोकांना त्या चित्रपटांत घडलं हेंच होतं ! आणि याच्या भरीला दिग्दर्शनांतला जिव्हाळा होता !

या गुणांचा वारसा बाबूरावांनीं आपल्या शिष्यांना दिला. त्या शिष्यांनीं आपल्या शिष्यांना दिला. 'जय मल्हार', 'जिवाचा सखा', 'रामजोशी', 'मीठभाकर' इत्यादि यशस्वी ठरलेल्या चित्रपटांचं वळण बाबूरावांच्या संप्रदायाचं होतं. 'दो बिघा जमीन'चा

थाट बाबूरारावांच्या ‘ सावकारी पाश ’ चा होता.

या थाटाच्या चांगल्या चित्रपटांना अजूनही लोकप्रियता मिळेल. मुंबईच्या व्यापारी सिनेमा कंपन्यांनीं ग्रामीण जीवनावर कांहीं थोडे चित्रपट काढले नाहींत. परंतु पाण्यासारखा पैसा खर्च करूनही ते चित्रपट यशस्वी झाले नाहींत. कारण त्यांत बाबूरावांची जी दृष्टि आणि जी धाटणी मी म्हणतों ती नव्हती. चित्रपटनिर्मितीच्या कलेची बाबूरावांची विशिष्ट तऱ्हा ज्यांनीं उचलली-- प्रत्यक्ष बाबूरावांपासून किंवा त्यांच्या शिष्यांपासून उचलली-- ज्यांच्या चित्रपटांचं वळण बाबूरावांच्या कित्त्याचं आहे, असे आज घटकेच्या चित्रपटसृष्टींत कित्येक दिग्दर्शक आहेत, आर्ट डायरेक्टर आहेत, कॅमेरामन आहेत, संकलनकार आहेत ! या सर्व माणसांच्या गुणांचा आणि मोठेपणाचा उगम बाबूरावांच्या उद्योगांतून झाला आहे. ‘ निर्माते ’ म्हणून बाबूरावांनीं फक्त बारा वर्षांचीच कारकीर्द गाजविली. परंतु ‘ निर्मात्यांचे निर्माते ’ ही त्यांची पदवी त्रिकालाबाधित आहे.

आज घटकेस चित्रपटनिर्मिति करणाऱ्या माणसांना अनुभवाची शिदोरी आयती तयार मिळते. इंग्रजी, अमेरिकन चित्रपट हवे तेवढे पाहून त्यांचा अभ्यास करतां येतो. चित्रपटनिर्मितीच्या वेगवेगळ्या शाखांवरील उत्तमोत्तम इंग्रजी ग्रंथ वाचण्याची सोय आहे. प्रत्यक्ष निर्मितीचं काम जिथें पहातां येईल व शिकतां येईल असे हवे तितके स्टुडिओ आहेत. परंतु यांपैकीं एकही साधन ज्या वेळीं उपलब्ध नव्हतं त्या काळांत बाबूरावांनीं चित्रपटनिर्मितीस आरंभ केला ! त्यांचे पहिले तीन चित्रपट तर सर्वस्वी सूर्यप्रकाशाच्या मदतीनं घेतलेले होते. चकचकणारे पत्र्यांचे तुकडे म्हणजे बाबूरावांचे रिफ्लेक्टर्स होते ! चित्रपट काढायचा म्हणजे पहिल्यांदा काय करायचं, नंतर काय करायचं, याची माहिती देणारं कुणी नव्हतं. ‘ लाँग शॉट ’ ‘ क्लोज--अप ’ असले शब्द आज घटकेला कोणत्याही स्टूडिओंतला चहावाला पोऱ्यासुद्धां बोलतो. परंतु सुमारें ४० वर्षांपूर्वीं —ज्या वेळेस ह्या शब्दांचा अर्थदेखील धड कुणास माहीत नव्हता त्या

वेळेस बाबूरावांनीं सुरुवात केली ! विलायती कॅमेरा घ्यायला पैसे नव्हते म्हणून स्वतः कॅमेरा बनविला. चित्रपट कथा कशा लिहाव्या त्याचं शास्त्र स्वतःच ठरवून त्या त्यांनीं लिहिल्या. बायकांचीं कामं बायकांनींच केलीं पाहिजेत असा आग्रह धरला आणि पुरा केला ! कोल्हापुरांतलींच माणसं नट–नटी म्हणून गोळा केलीं,आणि अत्यंत यशस्वी पंधरा चित्रपट काढून दाखविले ! हें सारं लक्षांत घेतल्यावर मावळे गोळा करून त्यांच्या साहाय्यानं स्वराज्याचं तोरण बांधणाऱ्या शिवाजीचीच उपमा सिनेमाच्या क्षेत्रांत बाबूरावांना दिली पाहिजे असं मला वाटतं !

फारसं कुणाला माहीत नसेल म्हणून सांगतों कीं व्ही. शांताराम यांच्या घरांत फक्त एकच तसबीर आहे. ती जयश्रीची नाहीं. कुणा भांडवलवाल्याची नाहीं. कुणा देशभक्ताची नाहीं. देवाची नाहीं. बाबूराव पेंटर यांची ती तसबीर आहे !

या गोष्टींत जो मोठा आशय आहे तो ध्यानांत घेतला कीं बाबूरावांच्या थोरवीचं आणखी वर्णन करण्याचं कारण नाहीं. महाराष्ट्रीय चित्रपटांच्या आजच्या सर्व पसाऱ्याचं उगमस्थान बाबूरावच आहेत. शांताराम, फत्तेलाल, दामले, धायबर, नंतरच्या पिढींतले राजा नेने, शांताराम आठवले, चालू पिढीतले दत्ता धर्माधिकारी, राजा परांजपे, बाळ गजबर, वसंत पेंटर, गुणे व नाईक यांच्यापासून तों बापटांपर्यंतचे कॅमेरामन, चंद्रकांत मांढरेसारखे नट, एका अर्थानं कथालेखक माडगूळकरसुद्धां, हीं सारी मंडळी बाबूराव पेंटर यांचा वारसा घेतलेली आहेत.

मुलाला आपण 'चिरंजीव' म्हणतों. त्या शब्दाचा अर्थ मी असा समजतों कीं ज्याच्या रूपानं बाप चिरंजीव होतो तो चिरंजीव. वर निर्दिष्ट केलेली सारी मंडळी बाबूरावांचं नांव चिरंजीव करणारी आहेत. जोंपर्यंत 'मराठी नाटक' ही संस्था आहे तोंपर्यंत अण्णासाहेब किर्लोस्करांचं स्मरण ताजंच राहील. आणि त्याचप्रमाणें जोंपर्यंत मराठी चित्रपटांच्या निर्मितीसाठीं कॅमेऱ्याची लयबद्ध घरघर ऐकूं येत राहील तोंपर्यंत बाबूराव पेंटर यांची आठवण लोक करीत

राहतील, अशी माझी पूर्ण खात्री आहे. बाबूराव काळाच्या पडद्याआड अंतर्धान पावले. परंतु उद्योगाचा, महत्त्वाकांक्षेचा, आणि कलात्मकतेचा जो आदर्श त्यांनी निर्माण केला तो सदैव महाराष्ट्रीय कलावंतांच्या पुढें असेल. हा आदर्श हेंच बाबूरावांचं सर्वांत मोठं आणि सर्वांत उचित स्मारक होय !

## २. श्री. बाबा गजबर

[ कोल्हापुरांतील एक नामांकित चित्रकार
व बाबूरावांचे बंधुतुल्य स्नेही ]

सन १९१५ मध्यें कै. बाबूराव पेन्टर व माझी ओळख श्री. श्रीपतराव काकडे यांच्या टेलरिंग दुकानीं झाली. मी त्या वेळीं गु. कारखानीस मास्तर यांचेकडे ड्रॉइंग शिकत होतो. त्यामुळें श्रीपतराव यांच्या दुकानाकरतां फॅशन प्लेटचीं कांहीं पेंटिंग्ज करून दिलीं. तीं पाहून बाबूरावांनीं माझी ओळख करून घेण्याची इच्छा प्रकट केली आणि त्याप्रमाणें एके दिवशीं त्यांची ओळख झाली.

बाबूरावांचे आतेभाऊ श्री. आनंदराव पेंटर, व दामले, फत्तेलाल ही मंडळी नाटक कंपनीचे पडदे करीत. त्याबद्दल केशवराव भोसले, नारायणराव बालगंधर्व, आणि अनंत संगीत नाटक मंडळीचे वीरकर यांनीं बाबूराव व आनंदाराव यांना चित्रपटसंस्था काढणेस प्रत्येक गांवच्या एका खेळाचे उत्पन्न देण्याचें ठरवलें होतें. पण आनंदराव यांच्या अचानक मृत्यूनें साऱ्या कल्पना तिथेंच विरल्या.

बाबूरावांनीं आपल्यावरील जबाबदारी ओळखून सिनेमा कंपनी काढण्यासाठीं व त्याची पूर्वतयारी करण्यासाठीं महाराष्ट्र सिनेमा श्री. बाबूराव रुईकर यांच्या आर्थिक मदतीनें सुरू केला. त्या वेळीं आपल्या आतेभावाच्या स्मरणार्थ त्यांनीं दाढी राखली. त्या वेळचें सिनेमा थिएटर पण आजच्यासारखें आधुनिक पद्धतीचें केलें होतें. इंग्रजी व फाळके यांचे चित्रपट तिथें लागत. बाबूरावांना फाळके यांचे चित्रपट पाहून आपण चांगले चित्रपट काढावे अशी सारखी तळमळ लागली. त्याप्रमाणें फिल्म कंपनीच्या भांडवलासाठीं बाबूराव



जलवाहिनी

भांडवलदार शोधत होते. त्यांना श्रीमती तानीबाई कागलकर यांनीं १५,००० रु. दिले आणि त्या बाबूरावांच्या भागीदार झाल्या. श्री. विनायकराव घोरपडे तानीबाईच्या तर्फे पहात असत.

बाबूरावांनीं सीतास्वयंवर हा चित्रपट घेण्याचें ठरवलें. रामाची भूमिका विनायकराव घोरपडे करीत. मी दशरथाची भूमिका करी. अर्थात् फक्त तालमीच चालत. पण पुढें सैरंध्री चित्रपट घेण्याचें नक्की ठरले. १९१७ सालीं या चित्रपटाचा मुहूर्त शिवाजी थिएटरमधें झाला. हीच महाराष्ट्र फिल्म कंपनीची स्थापना होय. या चित्रपटाच्या जमवाजमवीसाठीं अहोरात्र बाबूरावांच्याबरोबर श्री. दामले, फत्तेलाल, केशवराव धायबर, झुंझारराव पोवार आणि बाळासाहेब यादव या सर्व मंडळींनीं कष्ट घेतले. श्री. बाबूराव पेन्ढारकर हे बाबूरावांचे मित्र, आणि त्यांना इंग्रजी ज्ञान असल्यानें ते कंपनीचे मॅनेजर होते. चित्रपट मुंबईस प्रकाशित करणें, धंद्याचे पत्रव्यवहार करणें, वगैरे कामें तेच करीत व चित्रपटांत भूमिकाही करीत. सैरंध्रीची प्रमुख भूमिका गुलाब या स्त्रीनें केली. त्याचप्रमाणें सुदेष्णाची भूमिका अनुसया या सुशिक्षित स्त्रीनें केली. हिंदुस्थानांतील सिनेमांत काम करणाऱ्या ह्या पहिल्या दोन स्त्रिया होत. कीचकाचें काम माझे मित्र झुंझारराव पोवार यांनीं केलें, व भीमाचें काम बाळासाहेब यादव यांनीं केलें.

१९१८ किंवा १९१९ सालीं कॉंग्रेसच्या अधिवेशनाचें न्यूज रील प्रथम बाबूरावनींच घेतलें. चित्रपटाची पोस्टर्स करण्याची प्रथा प्रथम बाबूरावानींच अमलांत आणली. स्वत: बाबूराव उत्तम पोस्टर्स करीत. महाराष्ट्र फिल्म कंपनीच्या चित्रपटांची पोस्टर्स म्हणजे मुंबईच्या लोकांना व चित्रकारांना मेजवानीच होती. जे. जे. स्कूल ऑफ आर्टचे प्रिन्सिपॉल सालोमन हे बाबूरावांचे पोस्टर्स बघण्यास मॅजेस्टिक सिनेमावर येत. आणि ते तासन् तास तीं पोस्टर्स पहात उभे रहात. बाबूराव आपल्या चित्रावर कधींच सही करीत नसत. त्यामुळें प्रि. सालोमनला चित्रकाराची ओळख करून घेण्याची इच्छा झाली. आणि बाबूरावांची ओळखही झाली. मुंबईचे कांहीं

अनु. क्र. १३३४
दि. २०/

प्रसिद्ध चित्रकार श्री. मुल्लर, श्री. त्रिनिदाद, बाबूरावांना म्हणायचे, "बाबूराव तुमचीं पोस्टर्स अशीं सिनेमा थिएटरवर लावूं नका. तीं म्यूझियममधेंच शोभतील."

वत्सलाहरण ह्या चित्रपटाच्या तीन शीटच्या लिथो पोस्टर्ससाठीं स्वतः पुण्यास जाऊन प्रेस शिळेवर त्यानीं काम केलें. हेतु येवढाच कीं छापील पोस्टर्स मूळ चित्रासारखीं व्हावींत. चित्रपटाचीं पुस्तकें व त्यांमधील आकर्षक फोटो, उत्तम मुखपृष्ठ, सर्व भाषांमधें चित्रपटाचा सारांश आणि आकर्षक थिएटर सजावट करण्याची कल्पना बाबूरावांनींच काढली. त्यांच्या चित्रपटाबद्दल मी कांहींच बोलूं शकत नाहीं. तो वेगळाच भाग आहे.

बाबूरावांना खरे बोलणारा माणूस आवडत असे. लबाडी ही गोष्ट बाबूरावांना माहित नव्हती. म्हणूनच त्यांच्या हातून धंदा झाला नाहीं. कलेशी प्रामाणिकपणानें वागायचें, ज्या प्रेक्षकांकडून आपण पैसे घेतो त्यांच्या पैशाचा पूर्ण मोबदला आपण द्यायला पाहिजे, चित्रपटानें जनतेला चांगले वळण लावलें पाहिजे असें त्या वेळीं बाबूराव म्हणत.

बाबूरावांनीं आपल्या महाराष्ट्र फिल्म कंपनीच्या कारकीर्दींत सहा ऐतिहासिक, नऊ पौराणिक व एक सामाजिक असे चित्रपट घेतले. १९२१ सालीं "सावकारी पाश" घेतलें तें हिंदुस्थानांतलें पहिलें ग्रामीण सामाजिक चित्र होय. सावकारी पाश ह्या कथेची कल्पना बाबूरावांनींच आखली. बहुतेक चित्रपटांच्या कथेची मांडणी बाबूरावच करीत. त्या वेळीं चित्रपट कसा लिहावा याची चर्चा शिवराम वाशीकर, नानासाहेब सरपोद्दार, म्हसकर मास्तर, केशवराव धायबर, व्ही. शांताराम यांच्याशीं बाबूराव करीत. चित्रपटांच्या बहुतेक सर्व टायटल्स बाबूरावांचे आवडते प्रोफेसर आप्पासाहेब फडके ह्यांनींच लिहिल्या.

चित्रपटाचें संकलन बाबूराव उत्तम करीत; आणि त्यांनीं आपल्या शिष्यांना तें शिकविलेंहि. संकलनाला बाबूराव फार महत्व देत असत. चित्रपट कुशल संकलनाच्या अभावी अयशस्वी झाल्याचें

आज लोक बोलतातच. पण बाबूरावांनीं तीस वर्षांपूर्वींच हें आपल्या शिष्यांना सांगितलें. बाबूरावांच्या चित्रपटाची ट्रायल वारंवार व्हायची आणि बाबूराव पुन्हां पुन्हां संकलन करीत. त्यांच्याबरोबर त्या वेळीं व्ही. शांताराम, केशवराव धायबर ही मंडळी प्रामुख्यानें होती. बाबूरावांचें चित्रपट कापणें, जोडणें प्रेक्षकांना दाखवेपर्यंत चाले. अशा तऱ्हेनें बाबूरावांनीं सर्वांना शिकवलें. एक दिवस मी बाबूरावांना म्हणालों, " बाबूराव चित्रकला ही तुमच्या घराण्यांत होती; आणि ती तुम्हांला साध्य झाली याबद्दल आश्चर्य वाटत नाही. पण चित्रपटकथा, फोटोग्राफी, संकलन वगैरे कला तुम्हांला कोणी शिकवल्या आणि तुमचे गुरु कोण ?" हें ऐकून बाबूराव हंसले आणि म्हणाले, ' दत्तोबा माझे गुरु तुम्ही सर्व मंडळी. प्रेक्षक हेच माझे गुरु. " बाबूराव मला दत्तोबा म्हणायचे व मी त्यांना बाबूराव म्हणायचा. बाकीचे कंपनींतील लोक त्यांना शेट म्हणायचे, व मला बाबा म्हणायचे. मी तरुण असून लोक मला बाबा म्हणायचे म्हणून मला फार वाईट वाटायचें. पण माझें नांव लोकांनीं जें ठेवलें तें माझ्या वागण्यावरून. सन १९२१ सालीं सिंहगड हा ऐतिहासिक चित्रपट प्रथमच हिंदुस्थानांत इलेक्ट्रिक लाईटवर चित्रित केला. तो चित्रपट मुंबईच्या नॉव्हेल्टी सिनेमांत गाजला. पावसाळ्याचे दिवस असतांही चित्रपटाला गर्दी झाली. ट्रॅफिक कंट्रोल करायला पोलीस व सार्जंट होते. आणि या चित्रपटापासूनच करमणूक कर सरकारनें बसवला. तानाजींची भूमिका करणारे बाळासाहेब यादव, व उदयभानूची भूमिका करणारे झुंझारराव पोवार यांचा मुंबईच्या जनतेकडून आणि वेगवेगळ्या संस्थांकडून सत्कार झाला. हा सत्कार व गौरव म्हणजेच बाबूरावांच्या कलेचें यश होय.

मुंबईला महाराष्ट्रीयन वितरण संस्था बाबूरावांनींच सुरू केली व त्याचे काम दादा तोरणे व बाबूराव पै पहात.

१९२७ सालीं बाबूरावांचें दुसरें लग्न झालें. वास्तविक बाबूरावांच्या मनांत लग्न करायचें नव्हतें. पण त्यांचे बालमित्र श्री. ज्ञानबा मेस्त्री यांनीं लग्नाची गोष्ट काढली. आणि एके दिवशीं

बाबूराव, ज्ञानबा मेस्त्री व मी असे मिळून कोल्हापूरपासून तीस मैलांवर असणाऱ्या सरवडे गांवाजवळील कासारपुतळा गांवीं गेलों. तिथें मुलीला पाहिली. बाबूरावांच्या पसंतीला आल्याचें दिसलें. आणि अचानक लग्नही झालें. सर्वांना आश्चर्य वाटलें. कारण बाबूराव प्रपंच करण्यास अयोग्य. त्या वेळीं मी नवीन घर बांधलें होतें. नुकतीच वास्तु शांती झाली होती. बाबूरावांनीं माझें घर रहाणेस मागितलें. मी तें आनंदानें दिलें. बाबूरावांच्या कुटुंबाला माई म्हणत. मीच तें नांव ठेवलें होतें. एका खेड्यांतील हें बाबूरावांचें कुटुंब. एका वर्षानें बाबूरावांच्या सहवासानें मराठी चार यत्ता शिकल्या. नवऱ्याच्या कलेमधील कांहींच कल्पना त्यांना प्रथम नव्हती. पण कांहीं तरी मोठी कामं करतां आहेत हें मात्र त्यांना कळायचें. मोटार असून कधीं फिरायची हौस नाहीं. मालकीण म्हणून त्यांनीं कधीं नोकरावर अधिकार गाजवला नाहीं. बाबूरावांचे अडखळत बोलणें त्यांना समजत नव्हतें. मारूती गडी हाच बाबूरावांची सर्व व्यवस्था पहात असे. १९३१ सालीं बाबूराव टायफाईडनें आजारी पडले. शुश्रुषा हेंच त्या आजाराचें औषध. मी त्यांचें अंग स्पंज करीत असे. त्यांना एनिमा देई, व त्यांचे अंग धूत असे. एके दिवशीं बाबूराव म्हणाले, "दत्तोबा तुम्ही किती दिवस हें करतां ? घरांतल्या मंडळीना सांगा" या वेळीं त्यांना आपल्या कुटुंबाची आठवण झाली. बाबूरावांना पत्र लिहिण्याची सवंय नव्हती. त्यामुळें त्यांच्या पत्राची कुणीच अपेक्षा करीत नसे. मात्र एक गोष्ट लक्षांत रहाण्यासारखी झाली.

दिनांक १०-३-४२ रोजीं बाबूरावांचें हातचे. पत्र मुंबईहून आलें होतें. हें पत्र माझ्या आयुष्यांतील बाबूरावांनीं पाठविलेलें पहिलेंच पत्र होय. त्या वेळीं माझा मुलगा चि. बाळ टायफाईडनें आजारी पडला होता. मला धीर देण्यासाठींच त्यांनीं तें पत्र लिहिलें होतें. पत्रासोबत १०० रु. पाठवले होते. बाबूरावांचें पत्र पाहून चि. बाळला रडूं आलें. कारण त्याचें माझ्यापेक्षांही बाबूरावांच्यावर जास्त प्रेम होतें. मग बाबूराव व्यवहारी नव्हते असें तरी कसें

म्हणतां येईल ?

बाबूरावांनीं ज्याप्रमाणें कलाज्ञान शिकवलें त्याचप्रमाणें वेदांत विषयही आम्हांला शिकवला. बाबूराव कधीं रागावलेले आम्हीं पाहिले नाहींत, ओरडलेले पाहिले नाहींत, डोळे वटारलेले पाहिले नाहींत. धीर गंभीर महात्माच होता तो. बाबूरावांनीं आपल्या कांहीं गोष्टी नियमित केल्या त्यांपैकीं कोल्हापुरांत असणाऱ्या कुंभारगल्लींतील दत्त मंदिरांत दर्शन घ्यावयास रोज संध्याकाळीं पायीं जाणें. पण बाबूरावांनीं कधीं देवपूजा केली नाहीं.

सन १९३३ सालीं त्यांनीं माझ्या घरांतून स्वतंत्र बिऱ्हाड केलें, कारण माझ्या मोठ्या मुलाचें लग्न झालें होतें. त्यांनीं घर सोडतांना मला दुःख झालें. बाबूरावांच्या गाठी भेटी कमी होऊं लागल्या. कारण ते शालिनी सिनेटोनच्या कामांत असत. पण त्यांच्या माझ्या प्रेमात कमीपणा आला नाहीं. पूर्वी महाराष्ट्र फिल्म कंपनींत असतांना बाबूरावांच्यासाठीं घर बांधणेस मी जागा घेतली होती. त्याच जागेवर त्यांनीं १९३६ किंवा ३७ सालीं घर बांधलें आणि तिथें जेव्हां बाबूराव रहाण्यास गेले तेव्हां मला आनंद झाला.

बाबूरावांनीं लाखो रुपये मिळवले. पण व्यवहाराची दूरदृष्टी नसल्यानें त्यांचा पैसा त्यांच्याजवळ राहिला नाहीं. बाबूराव निर्व्यसनी होते. प्रयोगांतच त्यांचा पैसा गेला. बाबूरावांनीं पुष्कळ लोकांना आर्थिक मदत केली. कलेचे दान करणाऱ्याला पैशाची किंमत नसते.

एकदां औंधला चित्रकारांचे स्नेह संमेलन होते. त्यांत परदेशाहून आलेले सुप्रसिद्ध चित्रकार सातवळेकर म्हणाले, "बाबूराव आपल्या देशांत जन्माला आले हेंच त्यांचें दुर्भाग्य आहे. पाश्चात्य देशांत लोक यांना डोक्यावर घेऊन नाचले असते."

बाबूरावांच्या वयाबरोबर त्यांची दाढीही शुभ्र झाली होती. माझ्यापेक्षां ते लहान असून थकलेले दिसत होते. पण बारा बारा, अठरा अठरा तास काम करायचे. वास्तविक या वयांत त्यांना

विश्रांति हवी होती. पण कलेसाठीं तळमळणाऱ्या कलावंताला जगण्यासाठीं राबावें लागत होतें.

या ध्येयवादी कलामहर्षींच्या आठवणी लिहून तरुणांना मार्गदर्शन होईल. पण ज्यांनीं त्यांच्या मार्गदर्शनानें आज सुयश गांठलें अशा त्यांच्या शिष्यांनीं आज पुढाकार घेऊन बाबूरावांच्या स्मरणार्थ चित्रकलेसाठीं व चित्रपट—कलेसाठीं धडपडणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांच्या नांवे शिष्यवृत्त्या ठेवाव्या म्हणजेच त्यांनीं बाबूरावांचे कार्य पूर्ण केलें असें मी म्हणेन.

## ३. श्री. बाळ गजबर

[ सुप्रसिद्ध दिग्दर्शक–निर्माते, आर्ट डायरेक्टर. बाबूराव पेंटर यांचे जणूं ‘ पुत्र ’ च ! ]

कै. कलामहर्षि बाबूराव पेंटर यांच्या स्मरणार्थ निघणाऱ्या “ अंजलीच्या ” खास अंकासाठी त्यांच्या खाजगी आयुष्यांतील आठवणी लिहावयाच्या मी ठरवलें. गुरुवर्य बाबूरावांना अगदीं जवळून पहाण्याचें भाग्य मला लाभलें. वयाच्या चवथ्या वर्षापासून चोवीस तास माझें बालपण त्यांच्याच छायेखालीं गेलें. माझे वडील ती. बाबा बाबूरावांचे जिवलग मित्र. पुढें पुढें तर महाराष्ट्र फिल्म कंपनींत बाबूरारावांच्या खाजगी गोष्टीपासून तों कंपनीच्या कामापर्यंत तेच पहात असत. माझी आई माझ्या लहाणपणींच वारल्यानें वडील आम्हा दोघा मुलांना घेऊन महाराष्ट्र कंपनींतच रहात असत. आणि गु. बाबूराव पेंटरही तिथेच रहात. गु. बाबूरावांचे खाजगी आयुष्यसुद्धां कलेनें भरलेलें आणि मनोरंजक. बाबूरावांच्या आयुष्यांत कलेशिवाय क्षण नव्हता.

बाबूरावांना गुरु मानणारे पुष्कळ शिष्य आहेत. आणि ते खरेही आहे. पण बाबूरावांच्या ध्यानींही नव्हतें कीं आपण कोणाला काय शिकवलें. यालाच म्हणतात खरा गुरु !

दोन वर्षांपूर्वींची गोष्ट. मी बाबूरावांचा मुलगा रविंद्र याला घेऊन मोटारीनें मुंबईस जात होतों. वाटेत साताऱ्याला चहा



सरस्वति

घेण्यास आम्ही एस. टी. स्टँडवर थांबलों. चहा घेतला आणि गाडींत बसणार एवढ्यांत एस. टी. चे एक इन्स्पेक्टर आमचे समोर आले आणि मला म्हणाले, " अरे बाळ मला ओळखलंस कां ? " थोडा वेळ मी विचारांत पडलों. पण " अरे बाळ " म्हणणारा गृहस्थ फारच जवळचा असला पाहिजे, किंवा वडिलांचे स्नेही असावेत असा मी तर्क केला ! नंतर त्यांनीं आपलें नांव सांगितलें पण माझ्या लक्षांत येईना. शेवटीं ते म्हणाले, " तुला माझें नांवही स्मरणार नाहीं. आणि या पूर्वीं पाहिल्याचेंही स्मरणार नाहीं. पण तुला मी वर्तमान पत्रांतून येणाऱ्या फोटोवरून ओळखलें. मी गु. बाबूराव यांच्या कंपनींत होतो. तूं लहान होतास. बाबूरावांच्याकडेच फोटोग्राफी व चित्रकला शिकत होतो व शिकलो. तुझे वडील बाबा यानांही भेटून बरींच वर्षे झालीं." नंतर ते मला बाबूरावांच्याबद्दल विचारूं लागले, " त्यांची प्रकृति कशी आहे. त्यांना मुलं किती आहेत...वगैरे..." मी रविंद्राची बाबूरावांचा मोठा मुलगा म्हणून ओळख करून दिली. त्यांनीं रविंद्राकडे पाहिलें आणि रविंद्राच्या पायावर साष्टांग नमस्कार घातला. बिचाऱ्या रवींद्राला व मलाही चमत्कारीक वाटलें. डोळ्यांत अश्रू आणून ते म्हणाले, " बाबूराव माझे गुरु आहेत. आज त्यांच्या मुलाचें दर्शन झालें. " त्यांनी आग्रहानें परत आम्हांला चहा पाजला. रहाण्याचा खूपच आग्रह केला. पण मी माझ्या कामासाठीं मुंबईस जात आहे असें सांगितलें. मी विचार करूं लागलो कीं बाबूरावांचा शिष्य सिनेमा-क्षेत्र सोडून एस. टी.त कसा ? आणि तोंच त्यानं आपणहून आपली हकीगत चहा घेतां घेतां सांगण्यास सुरुवात केली.

" — महाराष्ट्र फिल्म कंपनींतून चित्रकला व फोटोग्राफी शिकल्यानंतर मी माझ्या गांवीं आलों. तिथें फोटोग्राफीचा स्टुडिओ काढला. चित्रं रंगवलीं.. गांवांतील घरेंही रंगवलीं. आणि त्यांत थोडा पैसा मिळाल्यानें मी मोटार सर्व्हिस सुरूं केली. कांहीं दिवसांनीं तीन गाड्या सुरूं केल्या. मला पैसा मिळाला. हलका धंदा होता पण स्वतः बाबून निर्व्यसनी राहिल्याने, शिवाय मी

सुशिक्षित असल्यानें मला त्यांत खूपच यश आलें. पुढें सरकारनें आपल्या गाड्या सुरू केल्या आणि मला त्यांत ही इन्स्पेक्टरची जागा मिळाली. हे सारं श्रेय माझे गु. बाबूराव पेंटर यांना आहे." अशा तऱ्हेचे बाबूरावांचे अनंत शिष्य हिंदुस्थानभर पसरलेत.

बाबूराव कोणतीही कला गुप्त ठेवीत नसत. चित्रकलेपासून ते चित्रपटाच्या कथानकापर्यंत त्यांच्या आजूबाजूच्या मंडळींना अगदीं जवळून पहावयास मिळे. स्वतः शिकत, शिकवत, दुसऱ्यांना पहाण्याची संधी देत. ही संधी म्हणजेच बाबुरावांचें शिकवणें.

बाबुरावांचा स्वभाव अगदीं लहान मुलासारखा होता. कोणतीही गोष्ट एकदा डोक्यांत घेतली कीं त्याचें वर्म कळल्याखेरीज ते गप्प बसायचे नाहींत. बारा हजार रुपायांचा 'बेल अँड हॉवेल' कॅमेरा त्यांनीं खोलला आणि त्या कॅमेऱ्याची रचना पाहिली व दामलेमामा व साहेबमामा यांना दाखवली.

बाबुराव चोवीस तास कंपनींत कामांत असायचे. नवीन प्रयोग करण्यांत गढलेले दिसायचे. घरदार कांहींच नव्हतें. प्रथम कुटुंब नुकतेच वारले होते. पण बाबूरावांची काळजी घेणारा त्यांचा गडी मारुती हा होता. गड्यासारखा दिसायचा नाही. वागायचा नाही. मी तर त्याला अहो जाहो बोलायचा व मामा म्हणत असे. नंतर तर बाबूरावांचीं मुलें त्याला काका म्हणायचीं. हा गडी चार वर्षां-मागे वारला. या मारुतीला सर्वजण बाबूरावांची दुसरी बायको म्हणा-यचे. रामभक्त हनुमान—मारुतीपेक्षांही त्याने बाबूरावांची सेवा केली. जेवावें कसें, नीटनेटके रहावें कसें हें बाबूरावांना त्यानें शिकविलें. बाबुरावांचा आहार अर्धी नाही तर चतकोर भाकरी, पाले भाजी आमटी आणिं ताक हे पाहिजेच. मांसाहारी होते. पण स्वतः शिकार करून आणलेली जास्त आवडे. बाबूरावांना आपला आहार घ्यायला पाऊण तास लागत असे. जेवते वेळीं चित्रपटाच्या कथानकाचा खल होत असेल तर त्यांना जेवण्याचें भानच रहात नसे. उभा असलेल्या मारुतीनें आठवण करून द्यावी कीं, "साहेब भात थंड झाला—"

जेवणानंतर बाबूराव पंधरा मिनिटे विश्रांती घ्यायचे. ही त्यांची विचार करण्याची वेळ. बाबूराव विड्या ओढीत. पण डोक्यांत कांहीं विचार आले कीं सारख्या ओढीत.

त्यांच्या वडिलांना माहीत असायचें कीं 'आपला बाबू विड्या ओढतोय.' बाबूरावांच्या वडलांना चिलीम ओढण्याचा नाद होता. केव्हां केव्हां ते बाबूरावांचेकडे काड्याची पेटी मागायचे. बाबूरावांना ते "मुका बाबू" म्हणायचे. कारण बाबूराव फार कमी बोलायचे.

बाबूराव स्वतःचे कपडे स्वतः कधींच खरेदी करीत नसत, पण चित्रपटाच्या कपड्यांची खरेदी ते करीत. माझे वडील बाबूरावांच्या कपड्याची व्यवस्था करीत, फिकट पिवळ्या अगर पांढऱ्या कांठाचे धोतर, पांढरा शर्ट आणि कोटासाठीं लाइट कलरचे सुती कापड. डोक्याला फरची टोपी. पुढें पुढें ते काश्मीर टोपी वापरूं लागले व अलीकडे त्यांनीं टोपी घालायचें सोडूनच दिलें. कांहीं वेळां ते कोल्हापुरी फेटा बांधीत.अर्थात कोल्हापूरच्या राजघराण्याची फिल्म घ्यावयास जात असतां. बाबूरावांना ब्राउन रंगाचा स्लीपर व कोल्हापुरी पातळ वहाणा आवडत असत. हा बाबूराव पेंटर यांचा पेहराव. बाबूरावांचे कपडे त्यांचे बालमित्र श्रीपतराव काकडे शिवत असत. श्रीपतराव काकडे शिवण कलेंत अद्यापही प्रसिद्ध आहेत. भारतांत शिवण कलेचें प्रथम त्यांनींच टेलरिंग कॉलेज काढले. शिवणकलेचीं मराठींतून पुस्तकें लिहिलीं. महाराष्ट्र फिल्म कंपनीच्या चित्रपटांचे कपडे यांनींच शिवले. 'रामजोशी' या राजकमलच्या चित्रपटाचे काम त्यांनींच केलें. बाबूरावांच्या बरोबर मोकळ्या मनानें बोलणाऱ्यापैकीं हे एक बाबूरावांचे कलावंत मित्र होते. दामले, फत्तेलालमामा व व्ही. शांताराम या कलावंतांचे ते चांगल्यापैकीं स्नेही आहेत.

बाबूरावांचे आणखी एक आवडते स्नेही त्यांचे केस कापणारे धोंडिबा न्हावी हे होत. त्यांना बाबूराव 'गुरुजी' म्हणत. आणि ते आपल्या कामांत गुरुजीच होते. बाबूरावांच्यापेक्षां वयानें वडील,

राहाणी स्वच्छ, वाणी शुद्ध, विचार चांगले. अशा या गुरुजींना चित्रकलेची भारी आवड. बाबूरावांच्या चित्रकलेवर आणि बाबूरावांच्यावर प्रेम करणारी ही एक व्यक्ति होती. बाबूराव आपली चित्रें त्यांना प्रथम हौसेनें दाखवत. बाबूरावांचा केस कापण्याचा प्रोग्रॅम एक तास चालायचा.समोर एखादे अर्धवट केलेले चित्र ठेवून त्यावर ते दोघे 'कलावंत' खूप चर्चा करीत. या केस कापण्याच्या एक तासांत, मारुतीनें केलेला उत्तम चहा होई. चहा पिता पिता बाबूराव गुरुजींनें सुचवलेल्या कल्पनेबद्दल चित्राकडे पाहून विचार करायचे. तर इकडे गुरुजींचे लक्ष बाबूरावांच्या डोक्याकडे असायचे. बाबूराव केव्हां केव्हां तरआपल्या चित्रपटाचे कथानकही सांगायचे. अशा तऱ्हेनें बाबूराव आपल्या जवळ येणाऱ्या प्रत्येक लहान थोर व्यक्तिकडून शिकायचे. एकदां बाबूरावांना दाढी काढण्याची लहर आली. त्यांनीं गुरुजींना दाढी काढण्यास सांगितलें. पण गुरुजींनीं "दाढीच्या एका केसांस धक्का लावणार नाहीं !" असें स्पष्ट सांगितलें. बाबूरावांचे आणखी एक गुरुजी होते. पण ते इंग्रजी शिकवणारे शाळा मास्तर होते. त्यांचे नांव श्रीखंडे मास्तर. बाबूरावांना इग्रजी येत नव्हतें. म्हणून त्यांनीं या मास्तरांची शिकवणी ठेवली. रोज सकाळीं मास्तर येत. कामांतून सवड काढून बाबूराव पहिले भाषांतरांतील शब्द पाठ करायचे. याच वेळीं कंपनींतील इतर लोकांनीं इंग्रजी शिकण्याचा सपाटा सुरू केला. कै. दामलेमामा, श्री. साहेबमामा व श्री. श्रीपतराव काकडे यांनींही एक स्वतंत्र मास्तर ठेवला. या विद्यार्थ्यांचा अभ्यास सवडीवर चालायचा. दामलेमामांना मुळांत थोडे इंग्रजी येत होतें. पण साहेबमामांना मुळींच येत नव्हतें. या शिकवणींत ते थोडे, म्हणजे अधुनमधून एखादा शब्द उच्चारण्यास शिकले. अद्याप साहेबमामांचे इंग्रजी आपणास या प्रकारचे ऐकायला मिळते. साहेबमामा यांच्या हातांखालीं शंकरराव शिंदे म्हणून एक साहेबमामांच्याच वयाचे गृहस्थ होते. माझ्या वाडिलांनींच त्यांना कंपनींत आणले होते. उत्तम पडदे करणारे होते. त्यांनींही इंग्रजी शिकण्यास सुरवात केली. पण त्यांनीं मास्तर ठेवला नाहीं. कंपनींत



वटपूजा

इंग्रजी येणाऱ्या माणसांकडून ते सवडीनें शिकत. चोवीस तास हातांत पहिले भाषांतर. ही व्यक्ति थोडी विनोदी होती. आणि भोळीही होती.

भाषांतर पाठ कुठें आणि केव्हां करावें याचा विचारही करीत नसत. एकदां कोल्हापूरला मोठमोठ्या मल्लांच्या कुस्त्या होत्या. बाबूरावांना कुस्तीचा नाद. त्याकरतां कंपनींतील बहुतेक लोक गेले होते. शंकरराव शिंदेही गेले. लोकांची चिक्कार गर्दी. शंकररावांनीं त्या तोबा गर्दींत भाषांतर उघडून दोन्ही गुडघ्यांच्या मध्यें धरून monkey "मणकी" म्हणजे माकड असे चुकीचे उच्चार करून भाषांतरांतले पुष्कळसे शब्द पाठ केले. मैदानांत लोकांची गर्दी खूपच. मधून मधून शंकररावांचे लक्ष कुस्तीकडे. याच वेळीं त्यांच्या मागून लोकांचा लोंढा आला. आणि त्यांच्या हातांतील भाषांतर जें उडाले व कुठें गर्दींत गेलें तें सांपडलें नाहीं. शंकररावांनीं दुसरें भाषांतर घेतलें. शंकरराव कंपनींत नेहमीं इंग्रजी बोलण्याचा प्रयत्न करायचे व भाषांतर पाठ केल्याप्रमाणें ते हाताखालच्या गड्यांशीं बोलायचे—व्हाईट म्हणजे पांढरा, ब्लॅक म्हणजे काळा, हे दोन्ही कलर म्हणजे रंग आण ! हें शंकररावांचे इंग्रजीं कंपनींत गाजले आणि ते बाबूरावांच्या कानीं गेलें. त्यांना तर हंसू आवरेना. श्रीखंडे मास्तरांनाही आश्चर्य वाटले. ते म्हणाले, "एवढ्या अवधींत शिकवणी नसतां चिकाटीनें अभ्यास करणाऱ्या शंकररावांना भेटूया तरी." शंकररावांची एके दिवशीं मास्तरांनीं भेट घेतली. अर्थात् हें सर्व काम बाबूरावांनींच मास्तरांना सांगितलें. मास्तरांनीं शंकररावांना प्रश्न केला कीं तुमचीं तीन भाषांतरं झालीं म्हणे. शंकरराव 'होय' म्हणाले. मास्तर म्हणाले, "एका महिन्यांत तीन भाषांतरं ! आश्चर्य आहे" त्यांवर त्या भोळ्या शंकररावांनीं उत्तर दिलं, "मास्तर तीन भाषांतरं झालीं म्हणजे पहिलें भाषांतर कुस्ती पहावयास गेलों तिथें हरवलें. म्हणून दुसरें घेतलें ते चोरीला गेलें. म्हणून तिसरें घेतलें." मास्तरांना हंसू आवरेना.

बाबूरावांना ही 'तीन' भाषांतराची गोष्ट ऐकून तर फार हंसूं आले.

बाबूराव भारी विनोदी व त्यामुळें कोणाला काय सांगतील याचा नेम नसे. चित्रपटाची कथा तर ते कोणा वाटेल त्याला लिहिण्यास सांगायचे. "इटली" हून आलेले त्या वेळचे प्रसिद्ध चित्रकार श्री. पन्नावळे आर्टीस्ट यांना त्यांनीं कथा लिहिण्यास सांगितलें. कै. सरदार बाळासाहेब यादवही कथा लिहीत. त्याप्रमाणें शंकरराव शिंदे यांनींही कथा लिहिण्यास सुरुवात केली. केशवराव धायबर यांनीं तर पुष्कळ कागद खर्च केले. कांहींचें लिहिण्यामुळें अक्षर सुधारले. शंकरावांची कथा पूर्ण झाली (?) पण त्यांना नायकाचे व नायिकेचे नांव काय ठेवावें हें सुचेना. तेव्हां त्यानीं कथेला "एक होता इसम आणि एक होती इसमी"—अशाप्रमाणें प्रारंभ केला. कथानक अशुद्ध भाषेंत वाचत व त्यांतूनही बाबूराव चांगल्या गोष्टी घेत. प्रत्येक माणूस बाबूरावांच्यावर प्रेम करी. नवीन नवीन कल्पनेचा उपयोग बाबूरावांच्या चित्रास व्हावा म्हणून प्रत्येकाची तळमळ. आणि याचमुळें बाबूरावांचे चित्रपट यशस्वी होत. बाबूरावांना टीका करणारे, आपली चूक सांगणारे लोक आवडत.

बाबूराव जेवढे गंभीर तेवढेच विनोदी होते. बाबूराव मूकपटांतील विनोद प्रसंग स्वत: लिहीत. किंवा कल्पना देत. 'बाजीप्रभू' या ऐतिहासिक मूकपटाचे शूटिंग पन्हाळ्यास होतें. बाजीप्रभूची भूमिका सरदार बाळासाहेब यादव यांनीं केली होती. शिवाजीची भूमिका स्वतः बाबूरावांनीं केली. आणि यापूर्वींसुद्धां बाबूरावांनीं सिंहगडमध्यें उत्तम भूमिका केली होती. बाजीप्रभू शिवाजीसह विशाळगडावर जाणेस निघत आहे. मागे शिद्दीजोहरचा पाठलाग आहे. पावनखिंडीत उभा राहून महाराजांना बाजी विनंती करतो आहे. असा सीन घेण्याचें काम चालू होतें. "महाराज आपण विशाळगडी निघून जा! मी इथें शत्रूशीं सामना देत आहे. आपण विशाळगडीं पोचतांच पांच तोफा करा." एवढं म्हणायचे होते. त्या वेळीं चित्रपट मूक असल्यामुळें एखादा दुसरा शब्द कमी झाला तरी चाले. पण बाळासाहेब यादवांनीं तोंडाला येईल ते बोलायला सुरुवात केली. आणि त्यांचें बोलणें कांहीं संपेना.

कॅमेरामन मोठ्यानें ओरडला फिल्म संपत आली, लवकर आटपा. शिवाजीच्या भूमिकेंतील बाबूराव दिग्दर्शक म्हणून जागे झाले. आणि बाजी प्रभुला भेटतां भेटतां बोलले, "बाळासाहेब कशाला एवढ मोठ्यानं बोंबलताय? आतां बोलू नका, फिल्म संपत आली." एवढं म्हणून शिवाजी निघून गेला. बाजीप्रभुला हे शिवाजीचे भाषण चमत्कारिक वाटले. पांच तोफा झाल्या. बाजी मेला. शेवटी बाबुराव म्हणाले, "बाळासाहेब बाजी मेला म्हणून ठीक झालं नाहीं तर तुम्ही सारखं बोलत राहिला असतां!" असे अनेक प्रसंग लिहितां येतील.

श्री. बालगंधर्व, गोविंदराव टेंबे, शंकरराव किर्लोस्कर, लक्ष्मणराव किर्लोस्कर, आप्पासाहेब तथा ना. सी. फडके, शिल्पकार फडके शिल्पकार करमरकर, विठ्ठलराव वागळे, कै. धुरंधर आर्टीस्ट, त्रिनिदादा, मुल्लर वगैरे थोर कलावंत बाबूराव यांच्या मुळेंच मला पहाण्याचा योग लाभला व माझे प्रमाणेच इतरांना ही थोर मंडळी जवळून पाहून, त्यांचे विचार ऐकावयास मिळाले. हे आमचे केवढे भाग्य!

कोल्हापूरांतील सर्व जहागिरदार बाबूरावांचे भक्त होते आणि मित्रहि होते. त्यामुळे बाबूरावाना शिकारीचा नाद लागला. श्रीमंत सेनापती कापशीकर उत्तम शिकार करणारे. ते बाबूरावांच्याकडे ड्रॉईंग शिकावयास येत. अद्याप ते उत्तम स्केचीस करतात.

बाबूरावांचे भागीदार श्रीमंत नेसरीकर व श्रीमंत कै. तानीबाई कागलकर (महाराष्ट्र कंपनीचे) ही मंडळी कलावंत होती—भांडवलदार नव्हती.

महाराष्ट्र फिल्म कंपनी हीच आमची शाळा, बाबुरावांचा सहवास हेंच आमचें शिक्षण. शिकवण्यासाठीं त्यानीं कधीं हातांत छडी घेतली नाहीं आणि पैसेही घेतले नाहींत. म्हणून ते मला नेहमी म्हणायचे कीं, "तुला जें येतं त्यापैकीं किती लोकांना तूं शिकवलेंस! आणि स्वतः तूं लोकाकडून शिकत आहेस." मी पुण्यास सरस्वती सिनेटोनमध्यें आर्ट डायरेक्टर असता मोटार घेतली. मला आनंद

वाटला आणि ही गाडी बाबूरावांना केव्हां दाखवीनसे झाले. कारण बाबूरावांना मोटारीचे वेड फार होते. तेव्हां गाडी घेऊन कोल्हापुरास आलों व गाडी बघावयास चला असें म्हणालो. त्यावर ते म्हणाले, " मोटारगाडीचे चित्र काढून आणले असतेस तर पाहिले असते !" झालं ! आमची गाडी तिथंच पंक्चर झाली—

या कलामहर्षीला कलेची नेहमी तळमळ होती. तो एक मोठा योगी होता. त्यांनीं आपल्या कुटुंबांसाठीं किंवा स्वतःकरितां कांहींच केलें नाहीं. कांहीं लोक त्यांना असे म्हणणारे आहेत कीं बाबूरावांनीं धंदा केला नाहीं. पण बाबूराव ही व्यक्ति धंदा करण्यासाठीं जन्माला आली नव्हती. कला वाढवण्यासाठीं, कलावंत निर्माण — तयार करण्यासाठीं झाली होती. आज त्यांचे शिष्य म्हणणारे आम्ही! आम्ही तरी काय केलें ? कलाही केली नाहीं आणि धंदा तर मुळींच नाहीं ! प्रभातसारखी कंपनी निघून त्यांनीं धंदा केला असें जर आपण धरून चाललो तर आज प्रभातची व त्यांच्या मालकांची काय स्थिति आहे !

## ४. श्री. रवींद्र मिस्त्री

[ बाबूराव पेंटर यांचे सर्वांत मोठे पुत्र वडिलांच्या तालमींत तयार झालेले कुशल चित्रकार. ]

आबा आपल्या गाडीचा हॉर्न एका विशिष्ट पद्धतीनी वाजवायचे. हॉर्न ऐकल्याबरोबर ' आबा आले ' असं आम्ही ओळखायचे. हॉर्न ऐकल्याबरोबर आम्ही मुलं जिथल्या तिथं अगदीं स्तब्ध व्हायची. आबा आमच्यावर रागवायचे म्हणून नव्हे तर आबा घरीं आल्यावर त्यांना घरांतली शांतता बघून बरं वाटावं म्हणून. आबा घरांत पाऊल टाकल्यापासून थेट आपल्या माडीवरच्या दिवाणखान्यांत जाईपर्यंत सर्वांची चौकशी करीत. प्रथम आमच्या आवडत्या ( पण आबांच्या दृष्टीनी बुद्दू ठरलेल्या ) टॉमची मुलाखत व्हायचे. तो दरवाजाजवळच्या खिडकीला बांधलेला असतो. त्याच्याशी दोन शब्द बोलून त्याच्या अंगावर हातबित फिरवून आबा वर जायला निघायचे.

माडीवर जातां जातां आबा दोन मिनीटं स्वयंपाकघरांत थांबायचे. तिथं मग आमटी, भाजीबद्दल विचारपूस करायचे, ते म्हणायचे अमक्या भाजीला आज अमुक घाला. तमक्या आमटीला कांद्याची फोडणी बरी लागते. आमच्या माई आबांच्या जेवणाबद्दल खूप खबरदारी घ्यायच्या. किती जरी पदार्थ चांगला झाला तरी आबा एक घाससुद्धां जास्त खात नसत. मग तुमचं कोणतंहि पक्वान्न असो. जितकं साधं जेवण तितकं त्यांना जास्त पसंत !

मग आबा माडीवर आल्यावर आम्हां मुलांचं काय काय चाललंय तें बघत. कोण लोळत पडलेय, कोण काय करतेय वगैरे अगदीं बघायचे. उगाच रिकामटेकडेपणानं वेळ घालवलेला त्यांना मुळींच आवडायचा नाहीं. आम्ही मुलांनी सुद्धां सतत कांहीं तरी उद्योगांत असावं असं त्यांना वाटे. आणि आम्ही तसं थोडं फार वागतहि असूं. त्याबद्दल आबा आमचं कौतुकहि करीत असत. पण आबांना नुसताच विलासीपणा आवडायचा नाहीं. कामाच्या वेळीं प्रत्येकानं कामं केलींच पाहिजेत.

आबांचें आणि आम्हां मुलांचें खूपच खेळीमेळीचें नातें होतें. जेवायला आम्हीं एकदमच सर्वजण बसत असूं. आमची सर्वांत लहान बहिण आशा त्यांची जरा लाडकी होती. ते तिला आपल्या-जवळ जेवायला बसवून घेत. जेवतांना आबा आम्हांला गोष्टी सांगत. त्यांत नेहमीं चार्ली चॅपलीन आणि जुने विनोदी नट असायचे. त्यांच्या गोष्टी सांगून खूप हंसवायचे आणि आपणही खूप हंसायचे.

आबा गंभीर झालेले मी एकदांच पाहिलें. आमच्याकडे एक खूप जुना आणि त्यांचा आवडता असा मारुती नांवाचा नोकर वारला तेव्हां. आबांचं माईशीं लग्न होण्यापूर्वीपासून तो होता. आबांची त्याच्यावर फार मर्जी होती. सकाळीं चहा देण्यापासून ते रात्रीं झोपतांना तेल लावीपर्यंत सगळें तोच करायचा. अत्यंत विश्वासू नि स्वामीभक्त. तो जेवत असतांना त्याला आबांची हांक ऐकायला आली तरी तो तसा ग्रांस टाकून उठायचा. त्याच्याच



शोभा

अंगाखांद्यावर मी मोठा झालों. तो वारला तेव्हा आबांना घरचा माणूस गेल्याचं दुःख झालं.

आमच्या आबांची यंत्रविशारदता प्रसिद्धच आहे. घरींसुद्धां त्यांचं एंजिनिअरिंग त्यांच्या पेंटींगच्या स्टूडिओपासून तें थेट संडासापर्यंत पोंचलं होतं. एकदां पावसाळ्यांत दमट हवेमुळं संडासाचं दार फुगलं नि घट्ट बसून राहिलं. आबांना शौचाला जायचं होतं. पण दार बंद असल्यामुळं आंत कोणी तरी गेलं असेल असं त्यांना वाटलं. खूप वेळ झाला तरी कोणी येत नाहीं हें बघून त्यांनीं 'आंत कोण आहे' म्हणून विचारलं. पण उत्तर आलं नाहीं. कारण कुणी आंत नव्हतंच. मग आबांनीं जोरांत दरवाजा ढकलून उघडला. मग आबांनी आंत बसून कांहीं तरी विचार केला आणि बाहेर आल्यावर त्या दरवाजाला एक गमतीशीर योजना केली. संडासाला आंतून कडी लावली कीं रेल्वेच्या बावट्यासारखा एक छोटासा बावटा दरवाजांतून बाहेर यायचा आणि जर बावटा उभा असला तर आंत कोणी गेलंय हे समजायचं.

तसंच एकदां त्यांनीं बघितलं कीं कपडे वाळत घालतांना त्रास होतो. तेव्हां त्यांनीं एक खूप मोठा चौकोनी हँगर करवून घेतला. आणि तो असा कीं दोरी ओढल्यावर तो वर जायचा आणि दोरी सोडल्यावर खालीं यायचा. कपडे त्यावर टाकून तो वर सेलिंगपर्यंत टांगून ठेवायचा.

अशा अनेक बारीकसारीक गोष्टी त्यांनीं केलेल्या आहेत. अशी एक खोली नाहीं कीं जिथें आबांचा मेकॅनिझम् नाहीं. त्यांनीं स्वतः बनवलेली फौंड्री तर खूपच सोयींनीं नटलेली आहे. एक हजार पौंड मेटलचा रस चार पांच माणसांना सहज ओतता येतो. आणि आबा प्रत्येकांना आपल्या या गोष्टी अगदीं आठवणीनीं दाखवायचेच.

आबांना शिकारीचा आणि ट्रिप्सना जायचा फार षोक होता. आबा मोटर ड्राइव्हींग फार फास्ट करायचे. पण मी जर मोटर-ड्राइव्हींग करीत असलों तर सारखे मला सूचना द्यायचे कीं हळूं

८२१९



चालव म्हणून. एकदां आम्हीं असेच कुठें तरी चाललों होतो. मी मोटर ड्राईव्ह करीत होतो. मला पण मोटर जोरांत चालवायचीशी वाटते. मी जोरांत चालवतोय हें बघून आबा म्हणाले कीं मीच चालवतों उठ. नाहीं तर एखादा अपघात करशील. पण आबा तरी काय हळूं चालवत होते म्हणतां. एका हातांत स्टेअरींग, दुसऱ्या हातांत सिगरेट आणि गाडींतल्या मंडळींशीं गप्पा ! नेहमीं आबा गाडी कुठें तरी ठोकरायचे आणि मग म्हणायचे, 'अरेच्या, ठोकरली वाटतं !'

आबांची काम करण्याची धमक एखाद्या तरुणाला लाजविणारी होती. जवळ जवळ ते चौदा तास काम करायचे. मला कामाचा कंटाळा आलाय असं त्यांनीं कधीं म्हटल्याचं मला आठवत नाहीं. त्या उलट माझी स्थिति. मला नेहमींच कंटाळा आलेला असायचा. तेव्हां ते थट्टेनं म्हणायचे, 'बाजीराव आहे तो, त्याला यायचाच कंटाळा !' ते कधीं स्वस्थ बसायचे नाहींत. कांहीं ना कांहीं उद्योग चाललेला असायचा. पुतळ्याचं काम, पेंटींग, निदान वाचन तरी चाललेलंच असायचं.

आबांनीं आम्हा मुलांवर फार प्रेम केलं. ते आमच्याशीं कॅरम वगैरे खेळायला येत. एकदां मी नि माझा धाकटा भाऊ अरविंद कॅरम खेळत होतों. आबा आमचा खेळ बघत उभे होते. त्या दिवशीं मला नीट खेळायला जमत नव्हतं. अरविंद सारखा माझ्यावर मात करीत होता. तेव्हां आबा मला म्हणाले, "ऊठ, तुझ्याऐवजीं मी बसतो आणि गेम देतो त्याला !" मग खेळ सुरूं झाला. अरविंदकडे डाव आल्यावर त्यानं सबंध बोर्ड फिनीश केला. आबा ताबडतोब उठले नि म्हणाले, 'छे, मी खेळत नाहीं. नाहीं तर तुझी चॅंपिअनशिप जाईल !'

एकदां आम्ही औंधला गेलों होतो तेव्हांची एक गम्मत आठवते. तिथें गेल्यावर आबांना टेनिस खेळायची हुक्की आली. औंधचे राजकुमार नि आबा खेळायला लागले. पण आबांच्या रॅकेटची आणि चेंडूची गांठ पडेना. चेंडू यायचा पण आबांची रॅकेट नुस-

तीच हवेंत फिरायची आणि चेंडू फुकट जायचा. सगळ्यांची हंसतां हंसतां पुरेवाट झाली. शेवटीं आबा म्हणाले, "या रॅकेटला गट्‌सच नाहींत कीं काय?"

त्यांना दुसरा एक नाद होता म्हणजे फिडल वाजवायचा. प्रॅक्टीससाठीं ते रेकॉर्ड अगदीं स्लो स्पीडनी लावायचे नि त्याला साथ करीत बसायचे. त्यांत ते वाकबगार होते असं नाहीं पण निव्वळ आवड म्हणून वाजवायचे. त्यांना नाहीं तरी संगीताची फार आवड होती. रात्री रेडिओ लावून बसले म्हणजे अगदीं स्टेशन क्लोजडाऊन होईपर्यंत ऐकायच. तिथें मग मराठी कार्यक्रम संपून कानडी, मद्रासी अय्याचं विव्हळणं जरी सुरूं झालं तरी चालेल. मग माईच त्रासून रेडिओ बंद करायच्या.

आबांच्या स्वतःच्या लहानपणीच्या एक एक संवयी ते कधीं कधीं आम्हांला सांगत. पूर्वीं म्हणे आबा नाटक बघायला कोल्हापूरहून रत्नागिरीला सायकलवरून जायचे. म्हणूनच मला वाटतंय आबा मला सायकलवर तीस चाळीस मैलांचा प्रवास करायला परवानगी देत असत. आबांनी माझे लहानपणीं खूप लाड केले. तरी पण मी आबांना तसा भीत होतो त्याचं कारणहि तसंच गमतीदार घडलं होतं. आम्ही गाडींतून कुठून तरी येत होतो. खेळण्याच्या दुकानाजवळ आल्यावर तिथल्या किल्लीच्या मोटरकडे लक्ष गेलं माझं. आबांकडे मी गाडी मागितली. आबा म्हणाले की उद्यां घेऊं. पण मला ते पटेना. माझी कुरबुर सुरूच होती. आबा लक्ष देईनात तिकडे. मग मी जोरांत भोकाड पसरलं. हातपाय झाडायला सुरवात केली. आरडाओरडा करून बघितला-पण आबांच्यावर त्याचा कांहींच परिणाम होईना. माईनीं समजूत घातली, मारुतीनी समजावलं. पण मी हट्टाला पेटलेला. कोणालाच दाद देईना. शेवटीं माई म्हणाल्या, 'द्या त्याला गाडी घेऊन.' मग आबा जे रागावले ते म्हणाले, "तूंच त्याला लाडावून ठेवला आहेस. अगदीं हट्टी झालाय तो. उद्यां घेईन म्हटलेलं समजत नाहीं याला!" इतकं होईपर्यंत घराजवळ येऊन पोचलों. सगळेजण

गाडींतून उतरले. पण आबा म्हणाले, 'त्याला गाडींतून उतरूं नका. गाडी पाहिजे त्याला तर गाडींतच बसूं दे.' आणि खरंच मला गाडींतच बसवून सगळेजण आंत गेले. मग माईनीं मला उतरून घेतले. माझी समजूत घालण्याचा प्रयत्न केला. पण मी कांहीं ऐकेना. मग आबांनीं माझ्या गालावर अशी चापट मारली ! बस्स्. माझा आवाज एकदम बंद झाला. तेव्हांचा आबांचा संतापलेला चेहरा मला अजून तस्सा दिसतोय. पण त्यानंतर आबांनी मला चुकूनसुद्धां बोट लावलं नाहीं. माझा हट्ट घालवण्याचा त्यांचा हट्ट मात्र बेमालून साधला !

आमच्या कुटुंबांत आम्हीं मुलं आणि आबा माई मिळून दहा माणसं होतो. आतां आबा गेल्यामुळं नऊच जण आहोंत. आमचं सदा आनंदानी भरलेलं घर कसं उदास दिसतेय आतां ! आबांच्या सदोदित हंसऱ्या आणि उत्साही वृत्तीमुळं आम्हांला दुःख कसलं तें जाणवत नव्हतं ! पण आतां आकाशच कोसळलंय आमच्यावर !

## ५. श्री. ना. ह. आपटे

[ सुप्रसिद्ध कादंबरीकार. एके काळचे बाबूरावांचे सहकारी. ]

मूक चित्रपटाचा जमाना चालू होता त्या वेळची गोष्ट. इ. स. १९२२ वा २३ साल असावें. एके दिवशीं मला कोल्हापूराहून बाबूराव पेंटर यांचें भेटून जाण्याविषयीं पत्र आलें. **लांच्छित चंद्रमा** या माझ्या ऐतिहासिक कादंबरीवरून ते **राणा हमीर** या नांवाचा एक चित्रपट घेण्याच्या विचारात होते. त्या काळापर्यंत माझा व बाबूरावांचा परिचय नसल्यामुळें मला त्या निमंत्रणाचा आनंद झालाच पण विस्मयहि वाटला. मी सवड काढून कोल्हापुरास गेलों.

त्या कालीं महाराष्ट्रांत मराठी चित्रपट निर्माण करणाऱ्या प्रमुख व नामांकित अशा संस्था दोनच. पहिली दादासाहेब फाळके यांची हिंदुस्थान फिल्म कं. आणि दुसरी बाबूराव पेंटर यांची महाराष्ट्र फिल्म कंपनी. पैकीं पहिलीचा जोम मावळला होता. तिच्या मानानें म. फि. कं. चे चित्रपट थोडे, पण कलेच्या दृष्टीनें श्रेष्ठ. यामुळें

बाबूराव पेंटर व त्यांची महाराष्ट्र फिल्म कंपनी या दोहोंचीं नांवें सर्व विश्रुत झाली होतीं.

चित्रपट निर्मिति ही एक अगदीं अभिनव अशी कलासृष्टि होती. हिंदुस्थानच्या लोकांना ती माहीत होऊन अद्याप तपहि झालें नव्हतें. आद्य निर्माते फाळके यांनीं मोठा मान पटकाविलेला होता. असें असतांहि कोल्हापुरासारख्या बाजूच्या नगरांत राहून महाराष्ट्र फिल्म कंपनीतर्फे जे मोजके चित्रपट निघाले, ते महाराष्ट्रांतच नव्हे तर साऱ्या हिंदुस्थानांत गाजले आणि दिग्दर्शक नात्यानं बाबुरावांचें नांवहि सर्वतोमुखीं झालें.

अशा कलावंताकडून पत्र आल्यामुळें मी कांहीं नवें पाहण्यास व शिकण्यास मिळणार या जिज्ञासेनें कोल्हापुरीं गेलों. हा कालपर्यंत चित्रपट निर्मितीच्या एकंदर कार्यपद्धतीविषयीं मी बराच अज्ञानी होतों. होय, यापूर्वी दादासाहेब फाळके यांच्याशीं माझा चांगला परिचय झाला असून त्यांच्या सान्निध्यांत वर्षभर राहिलों होतों. पण त्या कालीं ते होते अज्ञातवासांत. काशीसारख्या दूरच्या नगरांत. त्यांच्याकडून मिळालेली माहिती सांगोवांगीची. यामुळें तें ज्ञान सम्यक असण्यापेक्षां भ्रामक होतें म्हणण्यास हरकत नाहीं. असो.

महाराष्ट्र फिल्म कंपनीचा स्टुडिओ त्या वेळीं एका जुन्या नाटकगृहाच्या आवारांत होता. अर्थात् तेथें जातांच दर्शनीं अगदीं भव्य वा नवीन असें मला काहीं आढळलें नाहीं. मात्र त्यावेळीं माझी निराशा होण्यापेक्षां बुजण्यासारखें या स्थानीं कांहीं नाहीं, नाटक कंपनीसारखाच प्रकार आहे या जाणीवेने मी कांहीसा स्वस्थचित्त झालों. कोल्हापुरास माझी अन्यत्र कोठेंहि ओळख नसल्यामुळें मी बाबूरावांचा पाहुणा म्हणून गेलों होतों. त्यांचें राहाणें, जेवणखाण व झोपणें स्टुडिओच्या आवारांतच होतें. आमची दोघांची भेट होण्यास अवधी लागला नाहीं. माझाजम एकदम बसला.

बाबूराव पेंटर वयानें माझ्यापेक्षां एक दोन वर्षांनींच मोठे असावे. त्यांच्या भोंवतीं बडेपणाचें वा मिजाजखोरीचें कसलचें

अवडंबर नव्हतें. उंच किडकिडीत शरीरयष्टी, सावळा वर्ण, मुद्रा सौम्य व हंसरी आणि स्वभाव मनमिळाऊ असें त्यांचें रेखाचित्र आढळलें. त्यांनीं दाढी राखली होती. ती त्यांच्या चेहऱ्याला शोभण्यासारखी होती. त्यांचें नाक सरळ व तरतरीत आणि डोळ्यांत एक विशेष प्रकारची चमक होती. नव्यानें भेट घेणाऱ्या माणसाचें त्यांच्याविषयीं अनुकूल मत होण्यास या गोष्टी अनुकूल होत्या. मला त्यांच्या भेटीचा खराच आनंद वाटला.

यांत एकच गोष्ट थोडी खेदकारक होती. त्या वेळीं बाबूरावांच्या जिवावरचं एक फार मोठें दुखणें गेलें होतें. त्याचा विपरीत परिणाम त्यांच्या जिभेवर झाला होता. सफाईनें बोलणें त्यांना साधत नव्हतेंच. पण शब्दोच्चार अडखळत, अस्पष्ट होई. यांत त्यांना कष्ट फारसे होत नसावे. पण या जिव्हादोषाचा त्यांना विषाद वाटत असावा असें मला दिसून आलें. बाकी कलावंत या नात्यानें त्यांच्या स्वभावांत व आचाराविचारांत उगीच ताठा किंवा विक्षिप्तपणा माझ्या अनुभवास आला नाही. उलट वृत्तीनें ते साधे, विनोदी व खेळकर वाटले. त्यांच्या हसण्यांत एक विशेष लकब होती. तीवरून मात्र ते कांहीसे Cynic असावे असा भास होई.

हें कांहीं असो. त्या वेळचें बाबूरावांच्या भोंवतालचें वातावरण शांत, प्रसन्न व कलापूर्ण आढळलें. पुढच्या काळांत प्रभात फिल्म कंपनी काढणारे व्ही. शांताराम, दामले, फत्तेलाल, केशवराव धायबर इत्यादि तरुण मुलें त्यांच्या भोंवतीं शिष्य नात्यानें वावरत होती. व्ही. शांताराम हे सदैव त्यांच्या आजूबाजूला व सेवेंत हजर असत. तो इतिहास आज आठवला म्हणजे कालानें दाखविलेलें पुढचें कौतुक मोठें विस्मयकारक व चिंतनीय वाटतें. असो.

भेटीच्या पहिल्याच दिवशीं बाबूरावांच्या चित्रकलेचे व हस्तकौशल्याचे नमुने मला पहाण्यास मिळाले. जलरंगांत व तैलरंगांत काढलेलीं कांहीं चित्रें, संगमरवरांत खोदून तयार केलेल्या मूर्ति, शाडूंत उभारलेले पुतळे, हस्तीदंताचें कोरीव काम, असे विविध प्रकार मला दाखविण्यांत आले. अर्थात् त्यांतील एकही चित्र वा

कलेचा नमुना पूर्ण झालेला नव्हता. सारे अर्धवट, अपूर्ण, ताटकळत असलेले. पण त्या संग्रहावरून दृष्टि टाकतांच बाबूरावांची कलात्मक प्रतिभा किती श्रेष्ठप्रतीची, सर्वगामी व सौंदर्योत्कट आहे हें सहज दिसून येत होतें. माझें मन फारच प्रसन्न झाले त्या दिवशीं. आणि या अष्टपैलू कलावंताशीं आपला परिचय घडून आला म्हणून धन्यताही वाटली. पुढें मला भोंवतालच्या मंडळीकडून कळलें कीं, बाबूराव यांची ही कलासंपन्नता त्यांना कोणत्याही आर्ट स्कूलमधून किंवा कलाभुवनकडून मिळालेली नसून अबालालसारख्या चित्रकाराच्या सहज शिकवणींतून लाभलेली आहे. याचा अर्थच हा कीं, बाबूराव पेंटर यांची कलात्मक प्रतिभा जन्मजात होती. या माहितीमुळें माझा त्यांच्याविषयींचा आदरभाव आणखी वाढला व तो पुढच्या कालांत केव्हांहि कमी झाला नाहीं. उलट, एका विशेष प्रसंगानें तो फार दृढ झाला. त्यासंबंधीं थोडा खुलासा पुढें करतों.

इथें एवढें सांगतां येईल कीं, लहानपणापासून मला चित्रकले-विषयीं फार आवड आहे. तिचा अभ्यास करण्याची संधि मला मिळाली नाहीं ही गोष्ट खरी. पण चित्रकलेच्या विविध अंगांचें रसग्रहण करण्याचें वेड मला आहे. राजा रविवर्मा, आगास्कर, धुरंधर, अनंतराव माळी इत्यादि नामवंत चित्रकारांचीं चित्रें मीं चोखंदळपणें पाहिलीं व अभ्यासलीं. त्या कालीं रविवर्म्याचीं चित्रें तर घरोघरीं पसरलीं होतीं. आणि आगास्कर धुरंधरांचीं नांवेंहि सर्वतोमुखीं झालीं होतीं. मुंबईच्या मावजी शेठनीं काढलेलें सुवर्णमाला हें सर्वस्वी चित्रमय मासिक धुरंधरांच्या कुंचलींतून प्रसवत होतें. त्या कालीं खूप गाजलेंहि होतें. तेव्हां या दृष्टींतून मी बाबूरावांची चित्रकला पाहिली. आणि मला ती सर्वश्रेष्ठ वाटली. चित्रांच्या संख्येच्या दृष्टीनें विचार केल्यास वरील चित्रकारांचें साहित्य विपुल निर्माण झालें होतें. या मानानें बाबूरावांचीं दोन तीन चित्रेंच (तींहि अपूर्ण स्थितींत) मला पाहण्यास मिळालीं. पण तेवढ्या वानगीनेंहि मला फार आनंद वाटला

व त्यांची कुंचली श्रेष्ठ प्रतीची आहे असें माझें निश्चित मत झालें. असो.

यानंतर दुसऱ्या दिवसापासूनच आमच्या मुख्य कामाला सुरुवात झाली. **लांच्छित चंद्रमा** या माझ्या कादंबरीवरून **राणा हमीर** या चित्रपटाची आंखणी करण्यांत आली. मूक चित्रपटाचीच ती तयारी असल्यामुळें व बाबूरावांनीं आपल्या मनाशीं त्यासंबंधी कांहीं आराखडा तयार करून ठेवला असल्यामुळें तें काम मला कष्टाचें वाटलें नाहीं. आमचे दोघांचे मतभेद होण्याचा प्रसंग उद्भवला नाहीं. त्या विषयांत मी नवखा होतो. मला मत नव्हतें. बाबूराव घासघीस घालत बसण्याइतके आग्रही नव्हते. यामुळें त्यांनीं सुचवावें व मी लिहून काढावें असाच प्रकार झाला. त्यांत मध्यस्थ होते व्ही. शान्ताराम. वयानें ते लहान पोरगेलेसे. पण बाबूरावांचे अगदीं पट्टशिष्य. त्यांत हा चित्रपट पडद्यावर आणण्याची घाई होती. यामुळें थोडी फार घाटाघाट होतांच आमचे सीन्स लिहून तयार होत.

आतां पक्कें स्मरत नाहीं पण वाटतें सिनेरिओ तयार होत असतांच एक सेट उभारण्यांत आला व चित्रीकरणास प्रारंभ झाला. एवढें खरें कीं, या विषयासंबंधीं मी पुष्कळ नव्या गोष्टी शिकलों. बाबूरावांच्या संगतींत माझा तो काल फार मजेंत व नव्या गोष्टी शिकण्यांत गेला. कांहीं काल सहवास घडल्यानंतर मला एक गोष्ट बाबूरावांच्या स्वभावांत प्रामुख्यानें आढळली. त्यांच्या कोशांत घाई हा शब्द नव्हता व कमालीचा संथपणा हा त्यांच्या प्रकृतीचा स्थायीभाव होता ! एरव्ही ते मालक, मित्र, गुरु आणि कलावन्त या नात्यांनीं मोठ्या योग्यतेचे होते. त्यांचें वजनहि चांगलें असे. त्यांच्या भोवतालचीं सारीं माणसें त्यांना फार मानीत. नटनटींच्या मानापानाचें प्रस्थ जवल जवळ नव्हतें. मुख्य नटीला सम्राज्ञीपद मिळण्यास अद्याप फार अवकाश होता. यामुळें स्टुडिओतील सारा कारभार घरगुती वातावरणांत चालल्याचें दिसून येई. कोणत्याही मर्यादेचें अतिक्रमण होत नसावें असें वाटे. आर्थिक परिस्थिति काय होती ?—कोण जाणे ! माझ्या स्वभावाप्रमाणें त्या

विषयाकडे मीं मुळींच डोकावलों नाहीं एवढें खरें.

मात्र या संधीला एक प्रकार सहज पाहण्यास मिळाला. बाबुरावांच्या हाताखालीं काम करणाऱ्या लोकांत एक नट दृष्टाचार्य बनूं पहात होते. तसे ते सामान्यच. पण त्यांच्या वाट्याला पुण्यामुंबईकडे थोडी वर्तमानपत्री कीर्ति आली होती व कदाचित् त्याचमुळें बाबुरावांनीं त्यांना हाताशीं धरलें असावें. कांहीं असो. "आपण बाबूरावांना यापुढें अपरिहार्य आहों" अशी त्यांची समजूत झाली आणि राणा हमीर चालू होण्याच्या सुमारास त्यांनीं बाबूरावांना अडविण्याचा घाट घातला! "मी एकाएकीं सोडून गेलों तर काय होईल याचा विचार करा!" असें अंतिमोत्तर त्यांनीं बाबुरावांना दिलें. तेव्हां बाबुरावांनीं न डगमगतां त्यांच्याच शब्दांत "तुम्ही एकाएकी मेलात तर आम्हांला कांहीं नवी व्यवस्था करावी लागेलच" असें उत्तर देऊन त्यांना बाहेरची वाट दाखविली! हा प्रकार मामुलीच आहे. पण मला तो मोठा उद्‌बोधक वाटला व माझ्या जीवनांत मला त्याचा पुष्कळ उपयोगही झाला!

राणा हमीराच्या लेखनाचें कार्य साधारणपणें पंधरावीस दिवस चाललें असावें. त्याच्या चित्रीकरणास प्रारंभ झाला होताच. व्ही. शांताराम सहाय्यक व कंटिन्यूटि रायटर म्हणून काम पाहात होते. हा चित्रपट चांगला गाजेल असें सर्वांचें मत पडलें. माझ्यापुरता मी यशस्वी झालों याचें समाधान मी मानलें.

बाबूरावांना माझी कार्यप्रणाली व लेखनपद्धति रुचली असावी असें दिसलें. कारण त्यांनीं लागलीच माझ्याकडून एक नवीन कथानक लिहून घेण्याचें निश्चित केलें. तें म्हणजे त्या कालीं चालु असलेल्या निर्घृण सावकारीसंबंधीचें होय. कांहीं ठोकळ कल्पना ऐकून घेऊन मी कोरेगांवीं परतलों. सावकारी लाट या नांवाचें एक कथानक मी तयार केलें. लाट हा शब्द मी अनेक अर्थीं मनाशीं योजला होता. पण मुळांत तेल्याच्या घाण्यांत जी लाट असते त्या अर्थीं तो होता.

राणा हमीराचें काम हातावेगळें होतांच बाबूरावांनीं माझें हें नवें कथानक घेण्याचें योजलें. त्यांचें पत्र आल्यावर मी पुन्हां त्यांच्याकडे गलों. आतां आमचे संबंध स्नेहांत रूपांतर पावले होते. देण्याघेण्याचा अर्थिक व्यवहार—किरकोळ—पण सरळ झाला होता. यामुळें या नव्या कथानकाची घडण व वाटाघाट सुसूत्र होण्यास अडचण अशी कांहीं नव्हती. यावेळीं मध्यंतरींचा काळ पांच सहा महिन्यांचा तरी लोटला असावा.

नव्यानें मी पुन्हां आल्यावर एक विशेष गोष्ट चटकन् दिसून आली. ती म्हणजे बाबूरावांच्या वाणीची शुद्धि होय. त्यांच्या बोलण्यांत खूप सुधारणा झाली होती. याचा परिणाम त्यांच्या प्रकृतीवर झाल्याचें दिसून आलें. ते मोठे खेळकर, आनंदी, विनोदी व मिस्कील असल्याचा अनुभव आला. नव्या कथानकाची चर्चा मनमोकळेपणानें होण्यास आतां फारशी अडचण राहिली नाहीं.

मी रचलेल्या कथानकांत बाबूरावांना फारशी ढवळाढवळ करावी लागली नाहीं. फक्त त्यांनीं **लाट** हा शब्द अमान्य केला. आणि **सावकारी पाश** या नांवानें या नव्या सामाजिक चित्राची घोषणा झाली!

**सावकारी पाशाच्या** निमित्तानें बाबूराव नी मी पुन्हां एकदां निकटवर्ती झालों. त्यांच्या कलात्मक गुणाचा व स्वभावाचा दाट परिचय होण्यास ही संधि चांगली होती. त्यांना इंग्रजी फारसें येत नव्हतें. मराठीचा अभ्यासहि बेताचा. पण त्या मानानें त्यांचें वाचन चांगलें होतें. चित्रपट कलेसंबंधीं त्यांनीं पुष्कळ विचार केला होता व लोकशिक्षणाचें तें एक प्रभावी साधन आहे, याचीहि त्यांना जाणीव होती. या साधनाच्या द्वारें आपण फार मोठें राष्ट्रकार्य करूं शकूं असा आत्मविश्वास त्यांच्या ठायीं निर्माण झाला होता. आणि तो योग्यहि होता. चित्रपट निर्मितीस आवश्यक अशा कलांचें ज्ञान त्यांना चांगल्या प्रतीचें होतें. तोंपर्यंत त्यांनीं काढलेले चित्रपट गाजलेहि होते. यामुळें त्या कलेच्या आधारें लोकशिक्षणाचें कार्य करण्याची त्यांची महत्त्वाकांक्षा साकार होणें

कांहींच अशक्य नव्हतें. 'सावकारी-पाश' काढण्यांत त्यांचा तो प्रमुख हेतु होता.

त्यांच्या या विचारांचा व ध्येयाचा परिणाम पुष्कळच झाला आणि त्यांचें व्यक्तिमत्व मला मोठें आदरार्ह वाटलें. अशांतच आणखी एक प्रसंग असा घडला कीं, ज्यामुळें चित्रकार नात्यानें बाबूराव किती श्रेष्ठ आहेत हें माझ्या निदर्शनास आलें.

तो प्रसंग असा : माझ्या विनंतीवरून एका सुटीच्या दिवशीं बाबूरावांनीं पन्हाळगडची सहल काढली. निवडक अशी आठ दहा मंडळी निघालों. दिवसभर तिकडेच राहण्याची तयारी बरोबर होती. एवढेंच नव्हे बाबूरावांनीं चित्रें काढण्याचें सामानहि घेण्यास एका शिष्यास बजावलें होतें.

प्रभातकालीं निघालों. गडावर थोडा वेळ इकडे तिकडे भटकलों आणि नंतर भोजन विश्रांतिकारितां छायेचें स्थान पाहून मुक्काम ठोकला. डोंगरसपाटीवर सहज आढळणारें असेंच तें एक सामान्य स्थान होतें. पण बाबूरावांनीं चित्रांकण करण्याचें सामान मागतांच आम्हांला तेथील सौंदर्य विशेष आकर्षक वाटूं लागलें. दक्षिण दिशा आमच्या पाठीशीं असावी. समोर व आजूबाजूला वनश्रीनें डवरलेला भूभाग पसरलेला होता. डाव्या-उजव्या अंगाला असलेल्या लहान मोठ्या वृक्षांनीं एक फार मोठी मेहरप आमच्या डोक्यावर बनविली होती आणि तिच्यांतून निळ्या नभोवितानाखालीं असलेलं व सूर्य-प्रकाशानें उज्ज्वल झालेलें एक भूखंड Landscape आमच्या दृष्टिपथांत येत होतें. बाबूरावांनीं हा देखावा चित्रित करण्यास घेतला. साध्या जलरंगांत. विशेष नवलाची गोष्ट ही कीं, त्यांनीं रेखाचित्र ( Sketch ) काढण्याची भानगड केलीच नाहीं. एकदम कुंचली हातांत घेतली ! कांहीं क्षण सूक्ष्म निरीक्षण केलें आणि कुंचली कागदाला लावली.

चित्रकलेसंबंधीं थोडी माहिती असलेल्या लोकांना हें माहीत आहे कीं, तेलरंगापेक्षां जलरंगाचा वापर करून चित्र रेखाटणें- विशेष करून वनश्रीचें- फार कठिण आहे. तेलरंग जाड असल्यामुळें

कागदावर (चित्रफलकावर) चढविलेला लेप काढतां येतो किंवा पहिला दुसऱ्या लेपानें बुजवता येतो. जलरंगांत ही सवलत जवळ जवळ नाहीं. रंगाची छटा अचूक असली पाहिजे व भिन्न भिन्न रंगाची सगतीहि चटकन् जुळत गेली पाहिजे. यांतच आणखी एक अडचण असते. मानवादि व्यक्तांचे चित्रण आणि सृष्टीच्या रूपाचें चित्रण यांतहि माठा फरक आहे. व्यक्तीच्या चित्रणांत प्रमाणबद्धता, साम्य व भावदर्शन एवढेंच साधावयाचें असतें: अर्थात् हें सोपें आहे असें मला म्हणावयाचें नाहीं. पण सृष्टिसौंदर्याचें विविध दर्शन चित्रांतून यथातथ्य घडविणें फारच कठिण आहे असें मला वाटतें. या दृष्टीनें वाचकांनीं निरनिराळ्या चित्रांचें निरीक्षण केल्यास त्या त्या चित्रांची पार्श्वभूमि तितकी यथोचित नाहीं असें आढळून येईल. मागें पडदा टाकून काम भागविल्याप्रमाणें दिसतें. क्षितिजापर्यंत पसरलेल्या अंतराळाची खोली, वातावरणाचा प्रभाव आणि छाया-प्रकाशाची वाटणी अचूक असल्याची खूण फारच थोड्या चित्रांत आढळते. यापेक्षां विशेष विवेचन मी करूं शकत नाहीं.

त्या दिवशीं बाबूरावांनीं जें लँडस्केप काढलें तें वरील दृष्टीनें मला भारी अपूर्व व अद्वितीय वाटलें. एका श्रेष्ठ कलावंतानें मोठ्या तन्मयतेनें काढलेलें तें Creation च होतें. तासा दीड तासाचा काळ कसा गेला हें माझ्या ध्यानीं आलें नाहीं. आणि बाबूरावांनाही स्वतःची ती कृति फार आवडली असावी. मी तें चित्र उपटण्याचा मनसुबा रचला तेव्हां बाबूरावांचा स्वभाव अनुदार नसतांहि "मी याची प्रतिकृति तुम्हांला देईन" असें सांगून वेळ मारून नेली. पुढें हें सुंदर चित्र कुठें गेलें कोण जाणें!—एवढें खरें कीं, बाबूराव हे श्रेष्ठ प्रतीचे चित्रकार आहेत व त्यांनीं प्रयत्न केल्यास ते रविवर्म्यापेक्षाहि दिगन्त कीर्ति आणि अमाप वैभव मिळवितील असें मला मनापासून वाटलें.

दिवंगत माणसाविषयीं कांहीं आदरानें बोलावें म्हणून वरील विधान मी केलें आहे असें कोणीच समजूं नये. दुर्दैवानें बाबूरावांच्या कुंचलींतून फारच थोडीं चित्रें निर्माण झालीं आणि त्यांत छापून

अशीं जगापुढें अगदींच थोडीं म्हणजे दोन चार आलीं असतील नसतील. पण त्यापैकींच दत्त व वटपूजनाहून परतलेली सुंदरी हीं चित्रें रसिक व गुणग्राही लोकांनीं पाहावीं आणि त्यांच्या तुलनेंत वर सांगितलेल्या चित्रकारांची प्रसिद्ध चित्रें घालावीं. बाबूरावांच्या कुंचलीचें असामान्यत्व प्रतीत झाल्यावाचून राहणार नाही. वटपूजनांतील रमणीचें अंकण तर इतकें विलोभनीय आहे कीं, तो चर्चात्मक लेखाचा एक स्वतंत्र विषय होऊं शकेल. असो.

सावकारी पाशाचें लेखन चालू असतां बाबूरावांशीं मी त्यांच्या कुंचलीच्या सामर्थ्याविषयीं वरचेवर बोललों. रविवर्मा व धुरंधर यांच्या कलेची व त्यांना मिळालेल्या प्रसिद्धीची चर्चा केली आणि या बाबतींत तुम्ही मागें वा उदासीन राहतां कामा नये असें पदोपदीं विनवलें व बजावलें. एवढेंच नव्हे तर एकश्लोकी रामायण, भागवत किंवा भारत यांच्या आधारें निवडक पौराणिक चित्रें ऑफसेट लिथोनें काढून घरोघरीं कशीं पसरवितां येतील, घरें, बंगले यांच्या सजावटींत सह्याद्री किंवा कृष्णा कावेरी यांचे कांठ यांचे सौंदर्य आणून कसें ओततां येईल आणि चित्रकला व तदनुषंगिक अवान्तर कला यांचे एखादें पीठ स्थापन करून सर्वसाधारण लोकांची अभिरुचि कशी वाढवितां येईल, यांचें मनोराज्य गायलें, आणि तुम्ही यांत श्रेष्ठ आचार्य होण्याच्या योग्यतेचे आहां असेंही सांगितलें.

माझें कळकळीचें सांगणें बाबूरावांना पटलें नाहीं असें मी कसें म्हणूं ? पण त्यांच्या संगतींत असतां त्यांच्या थंडपणाचा मला जो अनुभव येऊं लागला होता तो विषादजनक होता. तें कांहीं असो. सावकारी पाशाचें काम आम्ही उभयतांनीं समरस होऊन पार पाडलें आणि मी पुन्हां कोरेगांवीं परतलों.

यानंतर बाबूरावांचा व माझा संबंध तुटल्यासारखा झाला. पत्रव्यवहारानें तो चालू ठेवणें, माझीं ताजीं पुस्तकें त्यांना भेट म्हणून पाठविणें आणि क्वचित् गांठभेट झाल्यास गप्पागोष्टी करणें या गोष्टी मी आवश्य केल्या. पण पत्राचीं उत्तरें देणें किंवा इतर गोष्टी

स्मरणानें करून स्नेहत्वाची ज्योत टिकवणें बाबूरावांच्या कोशांत नव्हतें ! ते चढेल होते असें म्हणावयास मी तयार नाहीं. समक्ष गांठ पडल्यावर त्यांच्या मनाचा मोकळेपणा व आतिथ्य चांगलें प्रगट होई. पण बाकी उदासीनताच. सावकारी पाशाचें कार्य मात्र त्यांनीं चांगलें केलें आणि तत्कालीन मूकपटांत तो चांगला गाजलाहि.

हें सगळें ठीक झालें. पण कालप्रवाहांत महाराष्ट्र फिल्म कंपनीची नौका मात्र तग धरूं शकली नाहीं. या बाबतींत कोल्हापुरास काय काय भानगडी झाल्या, याची मला यत्किंचित्‌हि माहिती झाली नाहीं. अर्थात् मी त्यासंबंधीं काय लिहिणार ?—पण विचारान्ती वाटतें कीं, इतर कोणत्याहि गोष्टीपेक्षां बाबूरावांचा थंडपणा उर्फ आळस त्यांना भोवला असावा. धंदा म्हटला कीं, आर्थिक ओढाताण, आपसांतील हेवेदावे आणि स्वार्थलंपटता हीं आम्हा महाराष्ट्रीयांचीं प्रमुख लक्षणें दिसतात. गुण्यागोविंदानें भागीदारी वा सहकार्य करणें आम्हांला साधत नाहीं. तेव्हां यांपैकीं कोणत्या पापाचा उदय झाला हें काय सांगावें ! तरीपण बाबूरावांना आपलें नायकत्व खंबीरपणानें– विशेषतः स्वतःच्या कर्तृत्वानें– टिकवतां आलें नसावें आणि हेंच महाराष्ट्र फिल्म कंपनीच्या ऱ्हासाचें व अस्ताचें कारण असावें अशी माझी अटकळ आहे.

यानंतर बाबुरावांचा व माझा संबंध—ते दिग्दर्शक व मी लेखक या नात्याने इ. स. १९३५ च्या शेवटच्या तिमाहींत आला असावा असें वाटतें. कै. दादासाहेब फाळके यांना कोल्हापुर दरबारनें गंगावतरण या बोलपटाकरितां पाचारण केलें होतें. आणि त्याची पटकथा व संवाद लिहिण्याकरितां फाळके यांनीं मला बोलावलें होतें. अशा वेळीं बाबुरावांनीं माझी गांठ घेतली आणि हृदयाची श्रीमन्ती या माझ्या कादंबरीवरून प्रतिभा बोलपट घेण्याची इच्छा दर्शविली ! —नवा योग असा आला.

या वेळीं एक नवें मन्वन्तर सुरू झालें होतें. बोलपटाचें युग सुरू होऊन अल्पकाल लोटला असला तरी मूकपटाचा अवतार संपला

होता. बाबुरावांच्या शिष्या-मित्रांनीं स्थापन केलेली प्रभात फिल्म कंपनी आपल्या तुतारीचा जयनाद सर्वत्र करूं लागली होती. अमृत-मंथन, कुंकू या सारखे बोलपट काढून व्ही. शान्ताराम यांनीं भारत-वर्ष गाजविला होता. मुंबईच्या परिसरांतील गुर्जर बन्धूंच्या चित्रपट कंपन्यांनीं नवे वेश धारण केले होते आणि महाराष्ट्रांतही या धंद्यां-तील नवे धुमारे दिसूं लागले होते. यापैकींच कोल्हापूर दरबारनं या रंगणांत पाऊल टाकल्याची व आपला सिनेटोन काढल्याची गोष्ट होय. दैवविलास हा होता कीं, हिंदी चित्रपटाचे जनक फाळके व त्यांच्याच तोडीचे बाबुराव पेंटर हे दोघेहि यावेळीं दरबारच्या भाडोत्री दावणीला जुंपले गेले होते! अर्थस्य पुरुषो दासः! या म्हणींत सर्व आलें.

कोल्हापूरच्या दरबारी मंडळींनीं स्थापन केलेल्या चित्रपट कंप-नीचा इतिहास म्हणजे "अंधेर नगरी. बेवकूफ राजा" या प्रसिद्ध लोककथेची नवी आवृत्ति होय. तिचें वर्णन काय करावें! शिवाय इतिहासांत जमा झालेल्या सामान्य व अचरट गोष्टींची शहानिशा तरी काय करायची?—तीहि अचरटपणाच ठरायचा. परंतु बाबू-रावांच्या आठवणी सांगावयाच्या तर त्यांची ही पार्श्वभूमि लक्षांत घेतल्यावांचून गत्यन्तर नाहीं. म्हणून कारणापुरतें लिहितों.

प्रतिभा चित्रपटाच्या निमित्तानं बाबूरावांची माझी भेट झाली त्या वेळीं या दरबारी सिनेटोनमध्यें मोठ्या गमती जमती चालू होत्या. ही कंपनी कोणत्या ध्येयानें काढली होती कोण जाणे. पण स्थापना झाल्यापासूनचें तिचें कर्तृत्व पाहिल्यास तिचीं कांहीं वैशिष्ट्यें ध्यानांत घेण्यासारखीं होतीं. पैशाची वारे माप उधळपट्टी करणें, गुणी व कलावन्त लोकांचा शोध मुळींच न घेणें, आपलींच सत्तेचीं व उपयुक्त माणसें खड्यासारखी वगळून बाजूला सारणें, कोठलीं तरी उकिरडाफुंकीं गाढवं जवळ करून त्यांना अबलक घोड्याची किंमत देणें, आणि या सर्वांवर कळस म्हणजे एकापेक्षां एक निकृष्ट चित्रपट काढून कलेची विटंबना व स्वतःचें हंसें करून घेणें, असा खाक्या चालू होता.

वरील वर्णनांत अतिशयोक्ति काडीची नाहीं. एकच उदाहरण प्रेमांकुर अटार्थी व रतनबाई या जोडीचें कोल्हापुरीं आगमन होय. अटार्थी हा दिग्दर्शक म्हणे आणि रतनबाई नटी ! या जोडीनें तुप साखरेचा मलिदा खाल्ला ! स्वतःची मिजास राखून घेण्यांत दरबारी मंडळींना पुरेसें केलें ! एकापेक्षां दुसरा भिकार आणि दुसऱ्यापेक्षां तिसरा विशेष भिकार असे चढत्या भांजणीचे चित्रपट काढून खर्चाच्या बाबतींत सिनेटोनचें कंबरडें मोडलें, आणि यांतून निर्माण झालेल्या अपयशाचें खापर चालक वर्गाच्या डोक्यावर फोडीत हंसत हंसत गमन केलें !

या उल्लूपणांत सिनेटोनच्या कारभाराचें चक्र असे कांहीं उलट सुलट फिरत होतें कीं, गोविंदराव टेंब्यांसारख्या हार्मोनियम वादन पटूचें डोकेंहि फिरलें आणि राजमुकुट चित्रपटाचें दिग्दर्शन स्वतःच्या अंगावर ओढून घेऊन तावत्काल स्वतःचें पूर्ण हंसे करून घेतलें !

आतां जास्त लिहीत नाही. अशा या गोंधळांत व पडत्या काळांत दरबारी लोकांना बाबूराव पेंटर यांच्या कलापटुत्वाचें स्मरण झालें असावें ! खरें मला माहीत नाही. एवढें खरें कीं, मी स्टुडिओंत गेलों त्या वेळीं व बाबूरावांशीं बोलणें झाल्यावर एकंदर लक्षण मला ठीक दिसलें नाहीं. स्पष्ट सांगायचें म्हणजे या श्रेष्ठ कलावंताचा मनोभंग, मानभंग, व तेजोभंग पूर्ण झाला होता ! तशा अवस्थेंत बाबूरावांनीं प्रतिभा चित्रपटाची कामगिरी अंगावर घ्यायला नको होती. कोल्हापूर सोडून कुठें तरी बाहेरच्या जगांत जायला हवें होतें. त्यांच्या चित्रकला- विपुलतेने त्यांना कांहीं उणें पडलें नसतें. परंतु— ! कमालीचा संथपणा, त्यामुळें आळस व निष्क्रियता, त्यामुळें विचारमांद्य, त्यामुळें खोटा दैववाद, त्यामुळें आर्थिक ओढाताण, आणि त्यामुळें अगतिकपणा- अशी त्यांच्या जीवनाची परंपरा झाली होती.

प्रतिभा बोलपटाला हें सारें भोंवलें ! बाबुराव माझ्याच कादंबरीवरून हा चित्रपट घेणार असले तरी त्यांची कथानकाची निवड

सर्वस्वी चुकीची आहे असें माझें प्रामाणिक मत होतें व तें मी प्रारंभींच त्यांना सांगून टाकलें होतें. पण आपलें कलाकौशल्य आपल्यास तारील असा त्यांना भ्रम होता. दुसरी गोष्ट, कथानका-संबंधीं त्यांचें Conception· हेंहि मला चुकीचे वाटलें. तिसरी गोष्ट, बोलपटाचे विशिष्ट तंत्र व बाहेरच्या जगांत याविषयीं झालेली प्रगति याचाहि विचार बाबुरावांनीं केला नसावा. किंबहुना तसा अभ्यासू व कष्टाळू स्वभाव त्यांचा नव्हताच. चवथी गोष्ट नट-नटींची निवड. कथानकाचें स्वरूप लक्षांत घेतां दाते दुर्गाबाई ही नायकनायिका जोडी अगदीं बेडौल होती ! दोघेहि चांगलीं. नाम-वंत. पण निवडच चुकीची ! यामुळें प्रतिभा तयार होतांच आम्ही सर्वांनीं अथपासून इतिपर्यंत कलेचें विडम्बन केलें ! —सारेच अर्थाचे दास झालों होतों !

प्रतिभा चित्रपटाला पुढें जो लौकिक ( ! ) प्राप्त झाला, तो लक्षांत घेतला म्हणजे माझ्या वरील म्हणण्यांत किती तथ्य आहे हें कोणालाहि कळेल !

या भानगडीमुळें प्रतिभेच्या वेळीं बाबुराव व मी विसंवादीच राहिलों. दोघेहि अडलेले नारायण ! कोणी कोणाला बोधामृत पाजायचें ?

प्रतिभेचा डोळ्याला अंधेरी आणणारा उजेड पडल्यावर दरबारी मंडळी व बाबुराव यांनीं सावकारी पाशाचें बोलपटांत रूपांतर कर-ण्याचें ठरविलें! या वेळीं मूळ लेखक म्हणून माझ्याकडे तें काम द्यायला हवें होतें. परंतु सिनेटोनचें चालक मोबदला देण्यास नाखुश. तेव्हां त्यांत नट म्हणून असलेले विष्णुपंत औंधकर यांनीं तें काम पत्करलें ! या अन्यायाविरुद्ध मी ओरडणार बाबूरावांच्या जवळ ! पण त्यांना तसें कांहींच स्थानच नव्हतें ! त्यांनीं माझी कांहीं तरी समजूत केली. आणि त्यांच्याकरितां मी मूग गिळले !—पण माझ्या कथानकाचें कर्तृत्व अकारण औंधकरांकडे जावें व त्यांचें नांव लेखक म्हणून झळकावें, ही गोष्ट माझ्या मनाला फार लागली ! " जाऊं दे " असं म्हणून मी तिचा विसर पाडून घेतला !

बाबूराव पेंटर यांच्यासंबंधीं आठवणी अशा एवढ्याच. आम्हा दोघांत थोडी कटुता निर्माण झाली असली तरी आमच्या स्नेहभावांत व्यत्यय आला नाहीं. त्यांचा व माझा पुढच्या कालांत संबंध राहिला नाहीं हें खरें. पण त्यांच्याविषयींचा माझा आदरभाव या क्षणापर्यंत कमी झालेला नाहीं. पन्हाळगडीं त्यांच्या मागें अंतरावर राहून त्यांचें जें चित्रांकण मीं पाहिलें, ती स्मृति हा एक स्वानंदाचा विषय आहे. बाबूरावांची ती फार मोठी देणगी मला लाभली असें मी मानतों. एकच गोष्ट वरचेवर मनांत येते. बाबूराव प्रयत्नवादी, अभ्यासू, झटून काम करणारे, काळ ओळखणारे असते तर ?

अत्यंत कृतज्ञताभावानें त्यांचें व त्यांच्या मनोज्ञ कलेचें चिंतन करीत त्यांना श्रद्धांजलि अर्पण करतों !

## ६. माधवराव बागल

[ विख्यात चित्रकार. बाबूरावांचे
निकटवर्ती मित्र, भक्त, व टीकाकार. ]

बाबूरावांचे व माझे संबंध जवळ जवळ तीन तपांचे. माझा पेंटिंगचा कोर्स १९१८ सालीं पुरा झाला. माझी ओळख झाली ती त्यानंतरची. ते त्या वेळी सिनेमासृष्टींत पुढे आले होते. चित्रपट हा त्यावेळीं मोठ्या आश्चर्याचा व कुतुहलाचा विषय होता. महाराष्ट्रांत या वेळीं एका हातावर मोजण्याइतकेहि लोक डोळ्यासमोर नव्हते. कोल्हापुरांत तर बाबुराव ही एकच व्यक्ती. मी तरी कोल्हापुरांत चित्रपट पाहिले ते बाबुरावांचेच. कोल्हापुरच्या त्या वेळच्या लोकांना बाबुराव हेच आपलं एकुलतं एक लेणं असं वाटल्यास नवल काय ?

आनंदरावांची कीर्ति बऱ्याच जणांकडून ऐकलेली. पण माझा प्रत्यक्ष संबंध येण्यापूर्वींच ते वारले होते. पण बाबुराव पेंटर, बाबुराव रुईकर वगैरे मंडळी त्यांचे नेहमीं गुणवर्णन करीत.

बाबूरावांच्या वाढत्या कीर्तीला आड येणारी अशी एकही व्यक्ति यावेळीं कोल्हापुरांत नव्हती. अन् महाराष्ट्रांत चमकले तर एकटे फाळके तेवढेच चमकत. यामुळें महाराष्ट्र फिल्म कंपनी हें महाराष्ट्राचं एक आदराचं स्थान झालं होतं. बाबूरावांच्याकडे पाहताना त्यांच्यामागे ही पार्श्वभूमी होती. यामुळें लोकांच्या चिकित्सक बुद्धीला फारसा थारा मिळाला नाही. मीही या परिणामापासून सर्वस्वी मुक्त होतो असं म्हणता येणार नाहीं. कालांतरानें बाबुरावांच्या तंत्रांत सुधारणा होत गेली. तशी माझ्याही चिकित्सक बुद्धीची वाढ होत गेली. अंध चाहत्याचा आपोआपच डोळस होत गेलों. तितका अंध नव्हतोही पण.

मला पेंटिंगचं ज्ञान होतं ! मी शाळेतला स्कॉलरच होतो. पोर्ट्रेट चांगला कोणत्याला म्हणावं, वाईट कोणत्याला म्हणावं, याची अंगी पात्रता आली होती.

त्यावेळचे आमचे मास्तर, पूज्य आगासकर व त्रिंदाड हे पोर्ट्रेट पेंटिंगमध्यें महाराष्ट्राचेच काय अखिल भारताचे भूषण ठरतील अशा योग्यतेचे होते. या थोर कलावंतांच्या हाताखालीं शिकलों व प्रेमांत वाढलो. त्यामुळें उत्कृष्ट पोर्ट्रेटचे गुण काय याची मला त्यावेळींही कल्पना आली होती. असामान्य प्रतिभेचें मूर्तस्वरूप माधराव धुरंधर यांच्या हातांतून बाहेर पडतांना मी डोळ्यानीं पाहिलं होतं. आणि भारत भूषण शिल्पकार म्हात्रे यांचेजवळ ते गुरुजी म्हणून व नंतर मित्र म्हणून जाण्याचं भाग्य लाभलं होतं. हळदणकरांच्या खासगी मार्गदर्शनाचीही त्यांत भर पडली होती. कलावाङ्मयाची मला नवी नवी दृष्टी लाभत होती. यामुळें कलेच्या गुणदोषाची छाननी करणें सोपे होत गेले. बाबुरावांच्या कलेकडे पाहण्याच्या दृष्टींतही बदल होत गेला.

उत्कृष्ट कलेचे मोजमाप केवळ हस्तकौशल्यावर करतां येत नाहीं या ठाम मतावर आलों.

उच्च साहित्याला ज्याप्रमाणें भाषाशैली, भाषाशुद्धी, अलंकार किंवा कोट्या पुऱ्या होत नाहींत, त्याचप्रमाणें कलाकृतीही निव्वळ

हस्तकौशल्य व रंगचातुर्यानें उच्च दर्जांत मोडली जात नाहीं. निव्वळ परिश्रमानें तिला पूर्णता प्राप्त होत नाहीं. हाताच्या कारागिरीला खेळवणारं भावनामय हृदय मागं नसेल तर तंत्रशुद्ध अलंकार हा प्रेतावरचा शिणगारच ठरेल.

कलावंतांत प्रामुख्यानें कोणती गोष्ट असावयास पाहिजे तर ते भावनामय अंत:करण! जिव्हाळा! जिव्हाळा हीच त्याची प्रेरक शक्ति. बुद्धीला चालना देणारी पण तीच. हा जिव्हाळा असला तरच सभोंवतालच्या परिस्थितीचं प्रतिबिंब त्यांत पडू शकते व त्या प्रतिबिंबाचा सांठा हृदयांत होत जातो. त्यांतून विचाराला चालना मिळते. त्यांतून विचार निष्कर्ष काढूं शकतो. तो समाजाला पोषक ठरतो. समाज त्याला व तो समाजाला पुढें ढकलतो. पण जिव्हाळाच नसेल तर भवसागरांत राहूनही तो कोरडाच राहील. म्हणून तंत्र आणि तळमळीच्या संयोगाशिवाय परिणामकारक कलाकृती बाहेर पडूं शकत नाहीं.

कलावंत ज्या कालांत असतो, ज्या परिस्थितींत असतो, ज्या राष्ट्रांत असतो त्या राष्ट्राची परिस्थिती, त्या राष्ट्राचे प्रश्न आणि त्या लोकांची महत्त्वाकांक्षा तो त्या समाजाचा एक घटक असल्यामुळें त्यांच्या लेखणींतून वा कुंचल्यांतून सहजच बाहेर पडत असते. त्या कलेलाच मी राष्ट्रीय कला म्हणेन. तो ज्या देशांत किंवा समाजांत जन्मला त्या समाजाच्या सुखदु:खाशीं, आशा-आकांक्षेशीं समरस झाल्याखेरीज ती जिवंत कला त्यांच्या हातांतून बाहेर पडणार नाहीं. तशी असल्याखेरीज ती कल्याणकारक ठरणार नाहीं. पण या सर्वांचं उगमस्थान जिव्हाळा हेंच आहे

याच निकषावर कलेचा दर्जा ठरवावा लागेल.

अर्थात् तंत्रदृष्ट्या तें चित्र निर्दोष असेल तर पुढच्या गोष्टींना स्थान आहे, महत्व आहे. या खेरीज कलेच्या मंदिरांत पाऊल टाकतां येणार नाहीं. पण कलेच्या मंदिरांत निव्वळ पाऊल टाकणारा भक्त ठरत नाहीं. भक्ताच्या हृदयांतल्या जिव्हाळ्यानेंच देवी प्रसन्न होत असते. जिव्हाळाच त्याची योग्यता ठरवितो. कोणत्याही

कलावंताची कसोटी या निकषावरच लावावी लागेल. हाच निकष बाबुराव पेंटर यांच्या कलाकृतीला लावणें भाग आहे.

चित्रपट सृष्टींत 'बाबुराव पेंटर' यांच्या हातून सुरवातीला जे कांहीं चित्रपट बाहेर पडले त्यामुळें बाबुराव एकदम महाराष्ट्रापुढें आले. त्यांच्या नांवाला प्रसिद्धी मिळाली ती 'बाबुराव पेंटर' या नांवानें. लोकही बाबुराव पेंटर या नांवानेंच त्यांना ओळखूं लागले. लोकांनीं त्यांची पेंटिंग्स पाहिली मग लोक यांना 'पेंटर' म्हणून संबोधूं लागले असे नाहीं!

आनंदराव मेस्त्री यांचेबरोबर ते नाटकाचे पडदे रंगवीत. आनंद रावनाही लोक मेस्त्री ऐवजीं पेंटर म्हणत. बाबुराव त्यावेळीं त्यांच्या बरोबर तेंच काम करीत असल्यामुळें यांच्यामागेही मेस्त्री ऐवजीं पेंटर हें आडनांव लागले. पण आनंदराव हे फारच हुशार असल्या-मुळे बाबुरावांचे नांव प्रामुख्यानें पुढें येऊं शकलें नाहीं. आनंद-रावांच्या निधनानंतर बाबुराव ही एकच व्यक्ती त्या धंद्यांत चमकूं लागली.

या नंतर महाराष्ट्रांत चित्रपट कलेच्या सुरुवातीला ज्यांनीं त्या कलेच्या प्रांगणांत पदार्पण केलें त्यांत बाबुराव हे फाळक्यांचे बरोबरीचे व कोल्हापूरांतले पहिलेच चित्रनिर्माते असल्यामुळें बाबुराव सामान्यांतून एकदम असामान्यांत गेले. त्यावेळीं त्यांच्याशीं स्पर्धा करणारे किंवा बरोबरीचे असे कोणीच नव्हते. शांताराम, दामले, धायबर, फत्तेलाल, ही मंडळी बाबुरावांच्या हाता-खालीं काम करीत असलेली, त्यांच्या प्रकाशांत दबलेली होती. त्यांना स्वतंत्र अस्तित्व नव्हतें. स्वतंत्रपणें पुढें सरकण्याजोगी परि-स्थितीही नव्हती. बाबूरावांनीं त्यांच्यावर तशी जबाबदारी न टाकल्यामुळें बाबूरावांचा आश्रय सोडेपर्यंत त्यांच्या कर्तृत्वाला वाव मिळूं शकला नाहीं, व त्यांची योग्यता लोकांना कळू शकली नाहीं. पण त्यांचे श्रम बाबुरावांच्या महाराष्ट्र फिल्मच्या कीर्तींत भर घाल-ण्यास कारणीभूत झाले आहेत. ते बाबुरावांच्या कंपनीत तसेच राहिले असते तर ते जगासमोर आलेही नसते. तेथें त्यांना तसा वाव

मिळाला नसता. भांडवलशाही समाज व्यवस्थेचाच हा दोष आहे. पगारी नोकर कितीही हुषार असला तरी तो जगासमोर येत नाहीं. ते श्रेय मालकांच्याच पदरांत पडते. धनिकाने काढलेल्या दैनिकांत किती तरी साहित्यिक अहोरात्र शब्द लिहित असतात पण जगाला त्याच्या नांवाची ओळखही होऊं शकत नाहीं. ते बिचारे अज्ञातच राहतात.

पण बाबुरावांच्या हाताखालीं काम करीत असतांना कलावंतांना अनुभव मिळाला. या अनुभवानें त्यांचें जीवन उजळलें. त्यांच्या भावी उज्वल कालाची पार्श्वभूमि बाबुरावांच्या हाताखालीं काम करीत असतांना तयार झाली. ती बाबुरावनीं हेतुपुरस्सर तयार केली असें नाहीं. पण तें ज्ञान आपोआपच त्यांच्या पदरांत पडून बाबुरावांची परंपरा त्यांना न समजतांच निर्माण झाली. कलेचं तें एक वर्कशॉपच होतं. जात्या हुषार असलेला त्यांत लगेच तरबेच झाला. त्या छायेंतून सुटल्यानंतर किंवा त्यांनीं आपली सुटका करून घेतल्यानतरं ते स्वतःच्या प्रकाशानें चमकूं लागले. नांवलौकिकास आले. लोक त्यांचेकडे बाबुरावांचे शिष्य म्हणून पाहूं लागले. आणि शान्ताराम, दामले, धायबर, फत्तेलाल, बाळ गजबार, मांढरे वगैरेंनीं बाबुरावांचे गुरुत्व कधींही अवमानलें नाहीं. उलट आम्ही त्यांचे शिष्य असें म्हणवून घेण्यांतच मोठेपणा मानला. पण तंत्रदृष्ट्या तर शांताराम आतां बाबुरावांच्या पुढें गेले आहेत. बाबुरावांच्या मोठेपणांत या प्रत्येकांनी आपआपली भर टाकली आहे. ज्यांनीं प्रत्यक्ष बाबुरावांच्या हाताखालीं काम केलें नाहीं अशा तत्कालीन दिग्दर्शकांवरही बाबुरावांच्या तंत्राची छाप पडलीच आहे.

बाबुराव चित्रपट निर्माते म्हणूनच महाराष्ट्राला प्रथम माहीत झाले व त्यामुळें त्यांच्याजवळ जाणाऱ्यांना ते पेंटरही आहेत हें माहीत झालं. अशाचपैकी मीही एक होतों.

मी पेंटिंगचा कोर्स पुरा केल्यामुळें बाबुराव पेंटिंग कसे करतात हें पाहण्याच्या इराद्यानें जवळ गेलों. ते त्या वेळीं एका नटीचें पेंटिंग करीत होते. चित्रपटांतून मिळालेला मोकळा वेळ ते पेंटिंग

करण्यांत घालवीत. पेंटिंग नसल्यास कांहीं तरी कोरीव कामें करीत. किंवा एखाद्या यंत्राची दुरुस्ती करीत. फुकट वेळ कधीही घालवणार नाहींत.

पोर्ट्रेट- बाबुरावांचे पेंटिंग स्कूल ऑफ आर्टमधून शिकून बाहेर पडणाऱ्यांना आवडण्याजोगें नसे. कारण त्यांत रंगवैचित्र्य आढळून येणार नाहीं. एक रंगी असल्यासारखेच दिसे आणि असेही. याचं कारण बाबुरावांच्यावर झालेले त्याच्या वाडिलाचे संस्कार. त्यांचे वडील हे एक कसबी कारागीर होते. त्या वेळच्या चांगल्या कारागिरांत मोडत होते. पण त्यांची कला जिनगरी थाटाची. प्रत्यक्षावरून असा अभ्यास कांहींच झालेला नव्हता. त्या वेळच्या लोकांना ते माहीतच नव्हते म्हटले तरी चालेल. ' लाइफ स्टडी ' झालेला नव्हता. पोर्ट्रेट पेंटिंग म्हणजे फोटोग्राफ एनलार्जमेंट व शिल्पकृती म्हणजे केवळ मनावर विसंबून खोदलेली आकृती.

वडिलांना ऑर्डर्स मिळायच्या व बाबुरावांच्या वडिलांनीं आपल्या मुलाला समोर बसवून त्या आपल्या देखरेखीखालीं करून घ्यायच्या. फोटो घेऊन त्यावर घरे पाडायचीं व कागदावर किंवा कॅनव्हासवर त्या पाडलेल्या चौकांचे प्रमाण वाढवावयाचे. फोटोंतला रंग काळसर असायचा तो यांनी कातडीच्या रंगाचा करायचा. सारा प्रकार यांत्रिक. पण या प्रकारांत ' लाइकनेस ' चुकत नसे. या पद्धतीमुळें बाबुरावांना कामाची शिस्त व खूप मेहनत घेण्याची संवय लागली असावी. आऊटलाइन चांगली झाली. पण सारा प्रकार तांत्रिक आणि यांत्रिक! प्रतिभेला कल्पकतेला स्वैर संचाराला यांत वाव मिळाला नाहीं. उत्कृष्ट लाइकनेस आला, माणसाची ओळख पटली आणि फोटोग्राफ बरहुकूम ' डीटेल्स ' आले कीं पोर्टेट पुरा होतो ही कल्पना चिकटून बसली ती बाबूरावांच्या आयुष्यांतून नाहींशी झाली नाहीं. पुढें पुढें मॉडेलच्या अभ्यासामुळें रगांत पुष्कळ सुधारणा होत गेली पण पोर्ट्रेट फिनिशच्या कल्पनेंत फारसा फरक पडला नाहीं. रेषाप्रभुत्व आणि अचूक ओळख या दृष्टीनें त्यांचीं पोर्ट्रेटस उत्कृष्ट असत.

त्यांचें हें नैपुण्य नव्या पिढींतील स्कूल आफ आर्टच्या मुलांत अभावानेंच आढळून येईल. ' मॉडर्न आर्टच्या ' खुळसट कल्पनेमुळे झटपट रंगारी होण्याची प्रवृत्तीच त्यांच्यांत वाढली आहे व आऊटलाइनकडे जाणूनबुजून दुर्लक्ष केलें जात आहे. ही एक विकृती आहे.

नवतरुणांतील रंगाचा ताजेपणा आणि ब्रशचा स्वैरपणा बाबुरावांच्यांत मला केव्हांच दिसून आला नाहीं. पण बाबुरावांच्या हातांतून लाइकनेस मात्र कधीं जाणार नाहीं. आणि रंगाबाबत आपल्यांत उणीव आहे व ती सुधारली पाहिजे याची त्यांना जाणीव होती. तो दोष काढून टाकण्याची त्यांची धडपड सतत चालू होती.

पण मॉडर्न आर्टच्या आहारीं गेलेल्या निर्बुद्ध चित्रकारांत रेषेचा मागमूसही लागणार नाहीं. ती एक आपल्यांत उणीव आहे व ती दुरुस्त केली पाहिजे असं त्यांना वाटतही नाहीं. सत्यापासून दूर पळणं, जें समोर दिसेल त्याचा अंशही त्या चित्रांत न आणणं, मन मानेल ते चाळे करणं व ज्या चाळ्यांचा अर्थ त्यांना सांगता येणार नाही व लोकांना समजार नाही ती आर्ट म्हणजे उच्च दर्जाची मॉडर्न आर्ट अशी त्यांनी समजूत करून घेतलेली. अशाच कलेला आज विशेषे करून भांडवलशाही समाजांत प्रोत्साहन दिले जाते. अर्थात् सत्यापासून व सभोवतालच्या परिस्थितीपासून साहित्य व कला सुटल्यास भांडवलशाही समाजाला तें पाहिजेच असते. म्हणून असल्या चमत्कृतिपूर्ण अर्थ न समजणाऱ्या गूढ आणि अशक्य कलेला मुद्दाम प्रोत्साहन दिलें जातें.

बाबुरावांच्या पोर्ट्रेटची तऱ्हा याहून फार निराळी. ती दुसऱ्या एका टोकाला गेलेली. बाबुरावांच्या पोर्ट्रेटमध्यें व इतर कामामध्यें फोटोग्राफिक साहाय्यच फार. ' दिसते ते ', पेक्षां ' असते ते ' काढण्याकडेच प्रवृत्ती. यामुळें त्या माणसाची बिनचूक ओळख पटूनही ते पेंटिंग रुक्ष निर्जीव व राकट वाटे. बाबुरावांचे लक्ष कुठेंच केंद्रीभूत व्हायचे नाहीं. नाक डोळे जिवणा इकडे जेवढे लक्ष देतील

तेवढेच कोटाचे बटन त्यावरचा लाइट, खिशातले पेन किंवा घड्याळाची साखळी, स्त्रीच्या पदरावरील नक्षी, तिची नथ, त्या नथींतले मोती, या जाळ्यांत अडकून बसतील. आपण काय काढतो आहोंत व वस्तुतः काय काढायला पाहिजे, हे त्यांना समजतच नसे. त्यांचा उत्कृष्ट नमुना म्हणजे मरण्याच्या अगोदरच त्यांनीं हिंमत बहाद्दर जहागिरदार व जहागिरदारीणबाई यांचे काढलेले पोर्ट्रेट होय. मोत्याच्या कंठ्यापासून ते नाक डोळ्यापर्यंत पाहण्याची एकच दृष्टी ! महत्वाचे कोणते आणि गाळायचे कोणते हे समजणार नाहीं. याबद्दल मी बाबुरावना खूप बोललोही.

बाबुरावांच्या पोर्ट्रेटसमध्यें भावनेचे पडसाद कमी. रंगाची खुमारी, ताजेपणा, वातावरणाचे परिणाम त्यांत दिसणार नाहींत. हृदयाच्या तारा छेडलेल्या आढळणार नाहींत. माणसाच्या कातडीच्या आंत शिरून त्याचे व्यक्तित्व बाहेर खेचून काढण्याचे त्यांना जमायचे नाही. बाबुरावांचा पोर्ट्रेट म्हणजे रंगित फोटोग्राफ !

माझे गुरुजी अगासकर पोर्ट्रेट करीत असतानां पाहिलं आहे मी ! ते पाहण्याचं भाग्य लाभलं यांत किती धन्यता वाटते मला. त्या आठवणीनेंसुद्धां हृदय फुलून जातं. पेंटिंग करूं लागले कीं देवी संचारल्याप्रमाणें दिसायचे. ते मॉडेलशी एकरूप व्हायचे. जणुं कार्य प्रवेश करणार. पेंटिंग करतांना पेंटिंगची धुंदी चढे त्यांना. आजूबाजूस उभे राहणारे आम्ही विद्यार्थी त्यांना दिसायचे नाही. कामात रंगून मागं पुढं पाऊल टाकणार आणि भान न राहून आम्हा कोणाच्या अंगावर कोसळणार. ब्रश पडूं लागला कीं वाटावं तो माणूस त्या कानव्हसवर बसू लागला आहे. आमच्या बरोबर बोलूं लागला आहे. कामाच्या तंद्रीत स्वारी देहभान विसरणार. एका हातांत ऑईलचा ब्रश, दुसऱ्या हातांत रुमाल. रुमालानें रंगाचा ब्रश साफ करतां करतां त्या रंग पुसलेल्या रुमालानें आपले तोंड माकून घेणार, व आम्ही विद्यार्थी हसूं लागलो म्हणजे आपण काय मूर्खपणा केला त्याचा उमग पडणार ! मनाजोगं पेंटिंग झालं कीं असे खुषींत येतं की काय बोलूं नका, जणुं स्वर्ग दोन बोटंच

उरला त्यांना.

आणि दुसरे मास्तर त्रिंदाड. पुढें माणूस पण रंग पहायचे ते जणुं अंतरीच्या संवेदनांतून. समाधीला लागलेल्या माणसाच्या तोंडून गूढ रम्य दैवी संदेश बाहेर पडावेत त्याप्रमाणें त्यांच्या त्या ब्रशांतून रंग बाहेर पडत. त्यांचं पेंटिंग म्हणजे काव्य. जणुं सतारीच्या सर्व तारांचा गोड लय लागून त्यांतून मधुर स्वर निघावा. त्या माणसाची ओळख तर पटेल, पण त्यावर त्यांनी आपल्या कुंचल्यानं दैवी सुंदर पटल पसरलेलं! गाण्याची बैठक भरावी आणि गाणं रंगलं म्हणजे चोहोकडून वाहवा! वाहवा! असा आवाज उठावा तसे आम्हांतून आवाज उठत. एकमेकांकडं पाहून आम्ही आश्चर्य प्रगट करीत असूं. त्या वेळीं आमच्या हातांत फुलें असती तर आम्ही मास्तरांच्या-वर वर्षाव केला असता.

आगासकरांनीं केलेला प्रिन्सिपाल बर्न्सचा पोर्ट्रेट. जणुं कानव्हस फाडून त्यांनीं डोकं बाहेर काढलं आहे. आणि त्रिंदाडनीं केलेली त्यांच्या पत्नीची पोर्ट्रेट्स! रेंब्रांटप्रमाणें त्यांनीं तिला अमर केली. केवढी योग्यता दोघांची. जगाच्या अमर कलावंतांत हक्कानं जाऊन जागा घ्यावी!

बाबुरावांच्या पोर्ट्रेटसमध्यें हा असा आनंद मी क्वचितच भोगूं शकलो. याचं कारण बाबुराव भावनाप्रधान नव्हते. हृदयाचे हळवे नव्हते. बाबुराव कारागीर होते पण कलावंत नव्हते. कलावंताचं खुळं, भोळं, प्रेमळ हृदय त्यांच्यात नव्हतं. ते व्यवहारी होते. ते बाजारी दृष्टीनें कलेचं मोजमाप करीत. हें काम खपेल कां, लोकांना आवडेल कां, याला अपेक्षेप्रमाणें पैसे मिळतील कां? या बंधनांत गुरफटल्यानें बाबुरावांच्यांतला कलावंत उफाळून बाहेर पडत नव्हता! हळदणकरांचा 'पठाणाचा' पोर्ट्रेट मी पाहिला आहे. पण अशा दर्जाचा पोर्ट्रेट मी बाबुरावांचा पाहूं शकलो नाहीं.

बाबुरावांनीं केलेली बहुतेक सारी पोर्ट्रेट्स मी पाहिली आहेत. अलीकडे त्यांच्या रंगांत पुष्कळ सुधारणा झाली होती. पूर्वींची बहुतेक सारीं पोर्ट्रेट्स आतां काळी पडली आहेत. रंगांत सुधारणा

व्हावी म्हणून ते इतर कलावंतांना बोलावून घेऊन त्यांची कामें ते करीत असतांना पहात. पत्रावळे, नागेशकर, हळदणकर यांचा त्यांनीं अभ्यास केला. त्रिंदाडांची चित्रें अभ्यासलीं. त्यामुळें रंग-मिश्रणांत ते सुधारले. तथापि आगासकर त्रिंदाड हळदणकर यांच्या शेजारी बसण्याइतकी योग्यता ते मिळवूं शकले नाहींत.

काम पुरे केव्हां करावे हे समजणें चित्रकाराला अत्यंत महत्त्वाचे असते. बाबुरावांना ते समजायचे नाहीं. त्यामुळें चांगले साधलेले काम पुरे करण्याच्या चुकीच्या कल्पनेनें ते बिघडवून टाकत. माझे स्वतःचेच त्यांनीं तीन पोर्ट्रेट्स केले. एक नगरपालिकेंत आहे, एक तारामती विद्यामंदिरांत आहे, व एक माझ्या घरीं आहे. मला हवा होता तो मी अपुऱ्या स्थितींतच उचलून आणला. पण तो कलेच्या दृष्टीनें सरस आहे. श्रीमंत अप्पासाहेब हसूरकर यांचे ते पेंटिंग करूं लागले. मी पहिले दोन दिवस हजर होतो. फार सुंदर झालं होतं ते. पुढे मी दोन दिवस यायचे राहिलो. त्या दरम्यान त्यांनी ते काम पुरं करण्याच्या कल्पनेनें बिघडवून ठेवले. त्यांच्या बहूतेक पेंटिंग्सची हीच अवस्था. एकूण आढावा काढला तर कोल्हापूरांत बाबुरावांच्या इतका चांगला पोर्ट्रेटस् करणारा आज कदाचित् आढळणार नाही, पण महाराष्ट्रांतील उच्च दर्जाच्या नामवंत पोर्ट्रेट पेंटरमध्यें बाबुरावना स्थान देता येणार नाही.

याचं कारण जीवनांत तसं कलेत जिव्हाळा कमी! त्यामुळें चित्रात जिवंतपणा येत नव्हता.

बाबुरावांचे माझे दोन तीन तपांचे संबंध. या कालांत मी त्यांना लाख रुपयेपर्यंतचीं कामें मिळवून दिली. कोल्हापुरांत कलेला वाहून घेतलेली सदैव कार्यमग्न असलेली तीच एक व्यक्ती म्हणून त्यांच्याबद्दल मला आदर असे. आठवड्यांतून दोनतीन वेळां तरी मी बाबुरावांच्या भेटीस जाणार. पण मी जरी कांहीं आठवडे गेलों नाहीं तर 'कां आला नाहीं' म्हणून विचारायला येणार नाहींत. मोटार असूनही चक्कर मारण्याची बुद्धी होणार नाहीं.

खरा जिव्हाळा नाहीं हाच त्याचा अर्थ. करमणुकीसाठीं किंवा जिव्हाळ्याच्या गप्पा मारण्यासाठीं ते वेळ दवडणार नाहींत. कांहीं पैशाचं येणं असेल तर मात्र खेपा घालणार. हाच जिव्हाळ्याचा अभाव त्यांच्या कलेंत येई. म्हणून त्यांच्या कलेंत रुक्षपणा राहिला. भावनेची सजावट त्यांना चढवतां आली नाहीं. हृदयाच्या रंगडोहीं ब्रश बुडवल्याखेरीज निव्वळ हातवाऱ्यानीं भावनेचे तुषार कसे उडतील?

बाबुराव पेंटर आणि आबालाल रहिमान यांच्यांत मला जो मोठा फरक दिसला तो हाच. आबालाल कलेसाठीं जगत. बाबुराव जगण्यासाठीं कलेचा उपयोग करीत. पैसा मिळवण्यासाठीं कलेचा उपयोग करीत. दोघेही अविश्रांत व आमरण श्रम करणारे. पण प्रत्येकाचा जीवनाकडे पाहाण्याचा दृष्टिकोन निराळा. आबालाल कला हस्तगत करण्यासाठीं धडपडत तर बाबूराव सोन्याची अंडीं उबवण्यासाठीं तिच्यावर प्रेम करीत. अबालालना मीं त्यांच्या चित्राचे अपेक्षेहून जास्त पैसे मिळवून दिल्यावर ते अस्वस्थ होत. बाबुरावना कमी मिळाले म्हणजे ते अस्वस्थ होत. आबालालना जगण्यापुरता चहा पाव मिळाला कीं खुष! बाबुराव लाखो रुपये मिळवूनही सदैव गरजवंत. पैसा न मिळणाऱ्या फंदांत बाबुराव पडले नाहींत, तर पैशाच्या फंदात पडून आपली अंतरीची ओढ आणि हौस अबालालनी मारली नाही.

बाबुरावनी आपल्या साऱ्या आयुष्यांत एखाद्या भिकाऱ्याचं फेरीवाल्याचं आंधळ्याचं किंवा बैराग्याचं चित्र काढलेलं मी पाहिलं नाही. राजे रजवाडे धनिक परिवार आणि स्नेही यांबाहेर त्यांनी मर्यादा ओलांडली नाही. आणि ती पुरी करतां यावीत म्हणूनच प्रत्यक्षावरून अभ्यास केला. त्यामुळें त्यांच्या कामांत बरीच सुधारणा होत गेली.

पण भोवतालच्या समाजाचं, ज्या समाजांत ते वाढले त्याचं, त्यांनीं चित्रण केलं नाही. करण्याचा कधी प्रयत्न केला नाही. त्या हेतूनं ते कधीं घराबाहेर पडले नाहींत. पेंटिंग्स तर राहू देत पण

त्यांच्या नोटबुकमध्यें किंवा चिट्ठ्यावर तशी पेन्सील स्केचीसही काढली नाहींत. स्टुडिओबाहेर पडून समाजाचं अंतरंग पाहण्याचा व ते जगासमोर आणण्याचा प्रयत्न त्यांनीं केला नाही

अबालालनी सभोंवतालचं सारं जीवन पकडण्याचा प्रयत्न केला. कोणताही विषय सोडला नाहीं. यात्रेंत बसलेली भिकाऱ्यांची रांग, महारोगी तसे दरवेशी, गुरे राखणारी गुराख्याची पोरे, गोट्या किंवा इटिदांडू खेळणारी शाळेची पोरें, चावीवर जमा झालेल्या बायका, एकतारीवाला, गवंडी, न्हावी, कुंभार पशु पक्षी फुले, गुलाब फुले तशी निवडुंगाची बोंडे, ही सारी त्यांनीं संग्रही ठेवली. सुदैवानें त्यांतली कितीतरी आज माझ्याजवळ आहेत.

बाबुरावनी पोर्ट्रेट खेरीज फारसं कांहीं केलं नाहीं. अन् जी कामे झाली ती अखिलभारतीय कीर्तित मुळींच भर घालणारी नाहींत. किंवा आगासकर, त्रिंदाड, हळदणकर, फर्नांडिस, पिठावाला या मालिकेंत बसणार नाहींत–

डिझाइन्स, कल्पक चित्रे कांहीं केली पण ती फारच थोडी. दहा बाराच्यावर त्यांची संख्या जाणार नाहीं. रविवर्मा, माधवराव धुरंधर, माझे थोर वर्गबंधू कै. डी. रामराव, यांच्या प्रतिभेचा अंशही त्यांच्यात नव्हता. पांचसहा चित्रे केली. ती ऐतिहासिक आणि धार्मिक. याबाहेर त्यांची मजल गेली नाहीं. लक्ष्मी, सरस्वती, दत्तात्रय, राधाकृष्ण, ' ना मारो पिचकारी ', ' मंदिराकडे 'एवढीच !

माधवराव धुरंधरांच्या कुंचल्यांतून आणि पेन्सिलींतून प्रतिभा ओसंडून बाहेर पडे. मास्तरांनीं हातात पेन्सील धरून खाली मान घातली कीं ती वर करण्याच्या आंत सुंदर प्रसंग कागदावर आणावा. लेख लिहावा त्याप्रमाणें त्यांच्या पेनमधून चित्रें झरझर बाहेर पडत. असामान्य, विलक्षण प्रतिभा होती त्यांची. डी. रामरावने एखादे कांपोझिशन तयार केले की शाळेची मुलें मास्तर अन् प्रिन्सिपाल पाहून थक्क होत. त्याची चित्रे पाहून ' लॉर्ड लीटन ' या इंग्लंडच्या रॉयल अकेडमीच्या प्रेसिडेंटच्या चित्रांची आठवण व्हावी.

बाबुरावनी या कलेंत प्रगती केली नाही. म्हणून त्यांची तुलना

इतराबरोबर करणेच चुकीचे होईल. बाबुरावांची बौद्धिक उंची कमी व प्रत्यक्ष मॉडेलचा अभ्यास कमी. यामुळें अशी चित्रें पुरी करण्यास लागणारा आत्मविश्वास कमी. धुरंधर महिन्याभरांत सुंदर आकर्षक चित्र काढतील तर बाबुराव कित्येक वर्षे घालवून आपलं चित्र पुरं करूं शकणार नाहींत. 'ना मारो पिचकारी' हे चित्र कित्येक वर्षे गेली तरी त्यांना ते पुरें करतां आलें नाहीं. 'सरस्वती' हे चित्र त्या सर्वांत बरं निघालं. बाकी नांवाजण्याजोगं-धुरंधरांची सैरंध्री तशी अनेक चित्रें, आगासकरांची 'मंथरा' व इतर, हळदणकरांचे 'डेली टास्क' या आसपास बसण्याजोगेही बाबुरावांचे काम आढळणार नाहीं.

शिल्पकलेंत त्यांनीं नुकतंच पदार्पण केलं होतं. शिवाजी महाराजांचा बस्ट केला तो बरा झाला आहे. कारण बस्ट आणि पॉर्ट्रेट एका सदरांत पडते. बुद्धीपेक्षां तेथें तंत्रावर भर आहे. अचुक रेषा आणि ओळख ( लाइकनेस ) हे बाबुरावांचें वैशिष्ट्य असल्यामुळें या विषयांत ते पुढें सरकले असते.

पण शिवाजीमहाराजांचा पुरा स्टॅच्यू तयार करतांना इतर गुणांची आवश्यकता होती. त्यांच्या एकंदर चरित्राचं आकलन करतां आल्याशिवाय जीवनाचं सार सारांशानें मूर्तस्वरूपांत उभं करणं सोपं नाहीं. ते स्वराज्य संस्थापक होते. पण राज्याला स्थिरता प्राप्त झाली नव्हती. स्वसंरक्षणाकरतां त्यांना सदैव तयार राहून प्रदेशावर देखरेख करावी लागत होती. हा भाव सिंहासनावर बसवून दाखवता येणार नाही. किंवा एखाद्या साध्या सैनिकाप्रमाणें हाती तरवार धरून उभे करण्याने दाखवता येणार नाही. सदैव सज्ज असलेल्या वारूवर आरूढ झाल्याखेरीज तो हेतू साधला जाणार नाहीं. बाबुरावनी गड राखणाऱ्या एखाद्या किल्लेदाराप्रमाणे शिवाजीला हाती तरवार देऊन पेडॅस्टलवर उभं केलं आहे. म्हणून शिवाजी पेठेंतला शिवाजी महाराजांचा बस्ट कलेच्या दृष्टीने वरच्या दर्जात मोडेल तसा उभा पुतळा मोडणार नाही. आणि बाबुरावांच्यांत तशी कल्पकता नसल्यामुळे गणपतराव म्हात्रे यांची 'मंदिराकडे' 'टु दि टेंपल' करमरकरांचा 'आश्वारूढ शिवाजी' व स्टुडिओमधील 'कोळी'

'थंडीत कुडकुडणारी' 'पावसाने ओली', तालीम यांची 'एकतारीवाला' 'टकळी' 'पाणीभरण' अशा कलाकृती बाबूरावांकडून बाहेर पडल्या नाहीत व पडणे शक्यही नव्हते.

**पोस्टर्स :** बाबुरावंनी आनंदरावांच्याबरोबर नाटकाचे पडदे रंगवल्यामुळें व ही कला फोटोवर आधारली असल्यामुळें त्यांच्या कलेला आणि अनुभवाला येथें भरपूर वाव मिळाला. तें भव्य असे रंगीत एनलार्जमेंट असल्यामुळें त्यांच्या हस्तकौशल्याला येथें भरपूर वाव मिळाला व १९२०च्या दरम्यान त्यांनीं काढलेल्या सिनेमा पोस्टर्सनी मुंबईवर छाप पाडली. लोक ती नुसती पोस्टर्स पहायलाही लोटत. ती पाहून सर जे जे स्कूल ऑफ् आर्टचा त्यावेळचा प्रिन्सिपाल बाबुरावांच्यावर फार खूष झाला होता. त्यांनीं बाबुरावना शाळेंत बोलावून घेऊन त्यांची वाहवा केली. अशी आकर्षक पोस्टर्स आतां फक्त श्री. जी. कांबळेच तेवढे काढूं शकतात.

पण बाबुरावना जे अमर केलं ते त्यांनीं केलेल्या चित्रपटांतल्या कामगिरीमुळें. त्यानेच ते महाराष्ट्रीय जनतेपुढें आले. त्यामुळेंच त्यांनीं अखिल भारतीय स्थान मिळवलं. आणि महाराष्ट्रीय चित्रपट परंपरेचे एक थोर जनक म्हणूनच त्यांचं स्थान अढळ आहे.

'सावकारी पाश' सारखा खालच्या समाजाचं जीवन दाखवणारा, खालच्या समाजांतील संघर्ष पुढें आणणारा, समाजाला मार्गदर्शन करणारा, सर्वांना भाषेशिवाय समजेल असा अद्वितीय चित्रपट निर्माण करून बाबुरावनीं बहुजनसमाजावर मोठं ऋण करून ठेवलं आहे. त्या मूकपटाची आठवण झाली कीं त्या निर्मात्याच्या फोटोसमोर हात जुळतात.

तसंच 'सिंहगड', 'सैरंध्री', 'कल्याण खजिना' काढून दिग्दर्शकांसमोर तंत्रदृष्ट्या श्रेष्ठ असा आदर्श ठेवला आहे व अहर्निश कलेची निरलस सेवा करून विद्यार्थ्यांपुढें आदर्श जीवन ठेवलं आहे! हीच बाबुरावांच्या जीवनाची महती होय.

लवकरच उभारल्या जाणाऱ्या जगद्वंद्य महात्मा गांधीजींच्या भव्य पुतळ्यामुळें ते महाराष्ट्रीयांसमोर सदैव उभे राहणार आहेत.

## ७. चद्रकांत मांढरे

[ लोकप्रिय नट, चित्रकार, आणि बाबूरावांचे लाडके शिष्य. ]

त्यावेळीं शालिनी सिनेटोनमध्यें मीं पोस्टर डिपार्टमेंटमध्यें काम करीत होतो. अचानक मला आबांनीं बोलाविलें म्हणून मीं त्याचे ऑफिसमध्यें गेलो. तिथे ते पेंटिंग करीत होते व जवळच कै. विष्णूपंत औंधकर बसले होते. आबांनी माझ्याकडे पाहून मला जवळ बोलाविले व माझ्या डोकीवरील टोपी काढून केस विसकटून म्हणाले, "ठीक. उद्या ताबडतोब डोकीचे केस कापून चेहरा करून ये." मला कांहींच कळेना. कदाचीत मला मॉडेल म्हणून उभा करून त्यांना कांहींतरी पेंटिग करावयाचे असणार असा माझा समज झाला व मीं म्हणालो, केस असले तर चालणार नाहींत काय ? मीं तसे कधीच केस कापले नाहींत. मला ते बरे दिसणार नाहींत. त्यावर ते थोड्या वरच्या आवाजांत मला बजावून म्हणाले, मीं सांगतो तसेच कर. उद्यां चेहरां करून ये. मीं केस कापावयाचे नाहींत असे ठरविले व दुसरे दिवशी तसाच कंपनींत आलो. दोन प्रहरी पुन्हां मला आबांचे बोलावणे आलें म्हणून मीं ऑफिसमध्यें गेलो. माझे केस कापले गेले नसल्याचे पाहून ते जवळच लिहित बसलेल्या औंधकरांना म्हणाले– "पाहिलंत पंत, काय खुळा माणूस आहे हा ! अरे केस कापायला भितोस, मग काम कसे करणार ? थांब, अहो पंत ह्याचे केस इथेंच कापूं या." असें म्हणून त्यांनीं एका मुलाकडून कंपनींतील मेकप डिपार्टमेंटमधील न्हाव्यास बोलावून माझे तिथेंच केस कापले, चेहरा करविला आणि म्हणाले, "आतां आरशांत जाऊन बघ किती छान दिसतोस" मला त्यांचा खूप खूप राग आला. त्यांचा चेष्टेखोर स्वभाव होता व ते माझ्याकडे बघून हसत होते. मी खूपच नाराज झालों होतों. जवळ जवळ रडकुंडी-सच आलों होतों.

मी तसाच ताबडतोब जिना उतरून डिपार्टमेंटमध्यें निघून आलों. आबांचा आवाज कानीं येत होता. "अरे गोपाळ, थांब इकडे ये." आणि ते हसत होते तितकाच माझा

राग वाढत होता. पण त्यांचा दरारा माझ्यावर इतका होता कीं मी त्यांचेसमोर जास्त बोलत नसे. त्यांची मला खूपच भीती वाटत असे. सर्व कंपनींत लोक मला म्हणू लागले कीं आज गोपाळची शेठनी चांगलीच हजामत केली. मला परत थोड्या वेळानें ऑफिसमध्यें बोलाविण्यांत आले. मी थोडा रागातच होतो. पण त्या वेळीं ते पेंटिंग करीत होते. मीं त्यांचे मागे जाऊन उभा राहिलो. बाजूस एक नटी अगोदरच येऊन उभी होती. मला त्यांनीं आपल्या समोर उभा राहाण्यास सांगितले. मला वाटलें आता त्या बाईसमोर आणखी आपली काय चेष्टा हे करणार आहेत कोण जाणे. मी भीत भीत समोर जाऊन उभा राहिलो. नंतर त्या बाईस त्यानीं समोर माझ्याजवळ जाण्यास सांगितले. ती नटी असल्यामुळें झटकन माझ्याजवळ येऊन उभी राहिली. मीं थोडा घाबरलो. सर्व अंगास घाम सुटला. आबा पेंटिंग करीतच होते. मला वाटले आमचे दोघांचे मॉडेलवरून ते एखादे नवीन पेंटिंग करावयास घेतील. पण तसे कांहीं झाले नाहीं. ते त्या बाईस म्हणाले, काय वाटतोय आमचा गोपाळ. अहो इतक्या लांब काय उभा राहाता?

त्या बाई जवळ आल्यावर मीं खूपच घाबरलो व खालीं दुसरीकडे पाहूं लागलो. आबा औंधकरांना म्हणाले, सांगा पंत, ह्यांनी काय काय बोलावयाचे. बाकी गोपाळ बरा दिसतोय. अरे एवढा लाजतोस काय? वर बघ. मीं गोंधळून गेलों. मला कांहींच सुचेना. आबा माझ्याजवळ आले आणि माझी हनुवटी वर उचलून मला म्हणाले, अरे काय खुळा आहेस तूं. माणसासारखा माणूस आणि बायकासारखा लाजतोस! तुला सिनेमांत काम पाहिजे ना? मग आतां ह्यांच्याशीं बोल. ह्यांच्या खांद्यावर हात ठेव. नाहीं तर आमीनाबाई, तुम्हीं ह्यालाच हाताला धरून ओढा पाहू. त्या बाई मला ओढूं लागल्या. मी त्यांना माझा हात सोडवत अहो अहो म्हणूं लागलो. तेव्हां आबा म्हणाले— अग अग जरा थांब असें म्हण. अशा रीतीनें "सावकारी पाश" पिक्चरच्या आमच्या तालमीस सुरवात झाली! आबांचे पेंटिंग चालू असावयाचे, बाजूस औंधकर

कांहीं पेपर्स हातात घेऊन उभे असावयाचे व समोर मला आणि त्या नटीस मधून मधून आबा एखाददुसरे वाक्य बोलावयास सांगायचे व ते वाक्य औंधकर टिपून घ्यावयाचें. अशा रीतीनें आमचे डायलॉग तयार झाले. डायलॉग कसले, आबाच प्रसंगाचे वर्णन करून सांगून, आतां असे बोल आणि त्याला तुम्ही असे उत्तर द्या असे सांगावयाचे. हेच त्या पिक्चरचे वैशिष्ट्य कीं मला काम करतेवेळीं किंवा अगोदर असे कांहीं ठरावीक डायलॉग दिलेले नसत. तसेच माझे मेकपही कांहींच नव्हते. फक्त जाड खादीचे धोतर, एक अंगरखा व एक मुंडासे हीच माझी ड्रेपरी. कंपनींत आल्यावर मला माझे कपडे काढून कधीं कधीं ही वेशभूषा माझ्या अंगावर चढवून आबा मला आपल्याबरोबर हिंडवत. त्यामुळें त्या खेडवळ कपड्याचा संकोच माझ्यांतून निघून गेला. पहिले दिवशीं केसाला तर चाट दिलीच होती. आणि ह्या कपड्यांचा रोज सराव झाल्यामुळें मीं पुरेपूर खेडवळ बनून गेलों.

पुढें पुढें मीं रोज कंपनींत आल्यावर हे कपडे घालूनच पोस्टर डिपार्टमेंटमध्यें कामही करत होतो व मधूनच शूटिंगचे बोलावणें आल्यावर सेटवरही जात होतो. सेटवर ज्या प्रसंगाचे शूटिंग चालू असे त्याला अनुसरून आबा मला खुषींत किंवा रागांत आणवत असत. एकदां शेतांत मळणीच्या प्रसंगी पठाण येतो, व तो सावकारानें बोलाविलें आहे म्हणून हरीच्या वडिलास तसदी देतो. त्यावेळीं हरी चिडतो व त्या पठाणाचे आंगावर धांवतो अशा प्रसंगाचे शूटिंग कंपनीजवळील शेतांत सकाळींच चालू होते. मला शूटिंगची नोटीस लौकर असल्यामुळें मीं सकाळींच कंपनींत आलों होतो. मला सकाळीं न्याहरी करावयाची सवय असल्याचें आबांना पक्के माहीत होते व त्याप्रमाणें सकाळच्या प्रत्येक शूटिंगचे वेळीं ते माझ्या न्याहरीची चौकशी करून प्रेमानें म्हणत असत कीं अरे आज गोपाळची बाळवाटी झाली कीं नाहीं, नसल्यास त्याला द्या बघूं. पण वरील प्रसंगाचे शूटिंगचे वेळीं त्यांनी सुरवातीसच सर्व लोकास माझ्या न्याहरीबद्दल सांगून टाकले

कीं " आज गोपाळला कुणी न्याहरी द्यावयाची नाहीं, कांहींसुद्धां द्यावयाचें नाहीं. रोज रोज कुठली आणावयाची. काय काम चांगलं करीत नाहीं. त्या खळ्यांतल्या मिशादेखील त्याला सरळ करतां येत नाहींत."

आणि खरोखरच त्या दिवशीं मला न्याहरीला कुणी न दिल्यामुळें मीं रागांतच काम करीत होतों. जसजशी दुपारची वेळ होऊं लागली तसतशी माझी भूक जास्तच वाढली व मी त्यामुळें चिडका झालों आणि जो जो डायलॉग मीं बोलूं लागलो तो तो माझा हावभाव व संताप वाढूं लागला. अशा वेळीं ऐन दुपारीं त्या पठाणाबरोबर भांडण्याचा माझा सीन घेऊन नंतर जेवणाची सुट्टी दिली. पण माझा राग कांहीं कमी झाला नव्हता. तेव्हां आबा माझ्याजवळ येऊन माझ्या पाठीवर थाप मारून हंसत मला म्हणाले, " आतां कां एवढा चिडतोस ? काम संपल कीं. चल माझ्याबरोबर जेवायला. किती खातोस ते पाहातो. " आणि खरोखरच त्या दिवशीं त्यांनीं मला आपल्या बरोबर जेवावयास बसविले व आग्रहानें खूपच वाढले.

आबांच्या इतका थोरपणा व प्रेमळपणा मला इतर कुठेच अनुभवण्यास मिळाला नाहीं. ते माझ्यावर मुलाप्रमाणें प्रेम करीत होते. तें मला शब्दांत लिहितां येत नाहीं. मात्र त्यांची आठवण मला सदैव येत रहाणार.

## ८. झुंझारराव पवार.

[ महाराष्ट्र फिल्म कंपनीच्या पहिल्या संचांतील ऐटबाज 'खलपुरुष']

या थोर कलावंताचा सहवास मला सन १९१८ सालीं लाभला. कोल्हापुरांतील आत्तांचे सिटी पोष्ट जिथें आहे तिथें बाबुरावांनीं ' महाराष्ट्र सिनेमा ' या नांवाचं सिनेमा थिएटर काढलें होतें. त्याच थिएटरमागें मीं रहात असे. त्या कारणानें फक्त रोज नजरा-नजर होत असे. त्या वेळीं मी खाजगींत सरकारी कारकून होतों. श्री. बाबा गजबर यांच्या कारणानें माझा परिचय घडला व त्या

परिचयाचें जिव्हाळ्याच्या स्नेहांत रूपान्तर झालें. सिनेमा थिएटर चालवत असतां या थोर व मोठ्या मनाच्या कलावंताच्या मनांत चित्रनिर्मितीचे विचार सारखे घोळत होते, व त्या दृष्टीनें प्रयोग पण चालू होते. शेवटीं मनाचा हिय्या करून चित्रनिर्मिति करण्याचें ठरलें. थिएटर बंद करून 'कोल्हापूर पॅलेस थिएटर' मध्यें 'सीता स्वयंवर' या पौराणिक कथेच्या तालमी चालल्या व त्याचबरोबर कॅमेरा स्वतः बनविण्याचे कार्य जारीनें सुरू झालें. यावेळीं त्यांच्या आसपास दामले, फत्तेलाल, गजबर ही मंडळी सदोदित असत. बाबुरावांचा स्नेह होता म्हणून मी कचेरी सुटल्यानंतर पॅलेस थिएटरमध्यें तालीम पाहण्यास जात असे. कधीं कधीं मजेनं तालीम करण्यांत भाग घेत असे. अखेरीस अनेक लोकांच्या विरोधानें सरकारनें पॅलेस थिएटर बाबुरावांच्या कडून काढून घेतले व त्यानंतर त्यांचा सर्व संसार शिवाजी थिएटर ( मंगळवार पेठ ) महाराष्ट्र फिल्म कंपनीच्या ठिकाणीं गेला व त्या ठिकाणीं तालमी सुरू झाल्या. पण त्यावेळीं "कीचक वध" नाटक गाजलें होतें आणि त्यावर सरकारची बंदी होती. त्याला १० वर्षें पुरीं झाल्याकारणानें त्यासंबंधीं लोकांत उत्सुकता फारच होती आणि या साऱ्या गोष्टी लक्षांत घेऊन बाबुरावांच्या मनांत त्या विषयावर चित्रपट घेण्याचें आलें. पहिलाच चित्रपट "सैरंध्री" घेण्याचें ठरलें. सर्व मंडळी कल्पनेनें भारून गेली. कष्ट करण्याची सर्वांची तयारी होती. पण पैसा कुठून जमवायचा ? धंदा नवा. खात्री कमी. सारीच मंडळी नवखी. पण हा प्रश्नही सुटला. या नव्या कलाप्रवृत्तीला एका सच्चा कलावंताकडूनच पहिले आर्थिक सहाय्य लाभलें.

कोल्हापुरच्या अल्लादियाखांच्या पहिल्या शिष्या तानीबाई यांनीं आपल्या गायनकलेवर खूपच पैसा मिळवला होता. ज्या रसिकांकडून वैभव संपादन केलें त्यांनाच त्यांनीं तें सर्व देऊन टाकलें. अशा रीतीनें भांडवलाचा प्रश्न मिटला, हा एक मोठा योगायोगच होता. सर्व चित्रपटसंस्थांची जनकसंस्था महाराष्ट्र फिल्म कंपनी चालू झाली, आणि स्वतः बाबुरावांनीं तयार केलेल्या कॅमेऱ्यावर "सैरंध्री"

चित्रित केला जाऊं लागला. मला न कळतांच मी त्यांत "कीचकाची" प्रमुख भूमिका करूं लागलों. वास्तविक मी सरकारी नोकर. माझ्यांत अभिनयाचे अंग असेल हें मला माहीत नव्हतं, पण बाबुरावांची दृष्टि फार खोल.

मला कीचक केला. हीच माझी पहिली भूमिका. या चित्रपटाची मांडणी पण वेगळ्या रोखानें केली होती. निव्वळ पौराणिक चित्रपट काढून पैसे मिळवायचे नव्हते. या चित्रांत एक टायटल होती कीं "परसेवा आदमीको कितनी लाचार बनाती है." पण ती केवळ एक टायटलच नव्हती, तर सबंद चित्रपटांत तो सुर राखलेला होता. आपल्या महाराष्ट्रांत ध्येयवादी चित्रनिर्मितीची परंपरा याच पहिल्या चित्रापासून झाली. यानंतर 'वत्सला हरण', 'सावकारी पाश', 'सिंहगड', 'दामाजी' अशा ध्येयवादी कलाकृती या महान कलावंतानें निर्माण केल्या. वरीलप्रमाणें विशेष टायटल्स त्यांच्या प्रत्येक चित्रांत असत. या पाट्या पडद्यावर दिसल्या कीं प्रेक्षकांच्या टाळ्यांवर टाळ्या पडत, आणि या सर्व पाट्या काय असाव्यात हे लिहिण्याकरतां ना. सी. फडके, ना. ह. आपटे, वाशीकर ही मंडळी त्यांच्याकडे होती. "सैरंध्री"मधील 'कीचक वध' इतका परिणामकारक घेतला होता कीं तो देखावा पाहून कित्येक स्त्रिया बेशुद्ध पडल्या, आणि त्या वेळेपासून आपल्याकडे सेन्सॉर करण्याची प्रथा पडली. त्या काळीं सर्व चित्रपट पौराणिक कथेवर काढीत तर बाबुरावांनीं 'सावकारी पाश' (मूकपट) हा सामाजिक जिव्हाळ्याचा विषय प्रथम हाताळला. सामाजिक व ऐतिहासिक चित्रनिर्मितीलाही बाबुरावांनीं सुरुवात केली. चित्रपट पडद्यावर कसा दिसणार व त्याचा परिणाम काय होईल हें बाबूराव अगोदर स्केचेस करूनच दाखवीत असत. इतकी त्यांची दूरदृष्टि होती. वास्तविक बाबुरावांचे शिक्षण ४–५ यत्तेपर्यंतच झालेलें होतें. इंग्लिशचा गंधच नव्हता.

"सैरंध्री" पुरा झाला व पुण्यास आर्यन सिनेमांत लोकमान्य टिळकांच्या हस्तें सुरू झाला. महाराष्ट्र फिल्म कंपनीच्या परंपरेंत

असलेल्या ध्येयवादाला टिळकांच्या सारख्या श्रेष्ठ ध्येयवाद्याचें प्रोत्साहन लाभलें. लोकमान्यांना चित्रपट फारच आवडला. आणि त्यांना जेव्हां कळलें कीं बाबुरावांनीं स्वतः बनविलेल्या कॅमेऱ्यावर तो चित्रित केला आहे तेव्हां कॅमेरा पहाण्याची इच्छा त्यांनीं प्रगट केली. लोकमान्यांना कॅमेरा कोल्हापुराहून नेऊन दाखविला. कॅमेरा पाहतांच बाबुरावांची पाठ थोपटून लोकमान्यांनीं त्यांना "सिनमा केसरी" ही पदवी दिली, व ते म्हणाले, "तुम्ही जालियनवाला बागेंतील प्रसंगावर चित्रपट काढा. तो देशभर दाखविल्यास आमच्या शंभर लेखांनीं जें काम व्हायचें नाहीं तें तुमच्या एका चित्रपटानें होईल." आणि त्याच क्षणीं पहिली कलाकृति धन्य झाली.

बाबुराव हे हाडाचे व पिंडाचे चित्रकार होते. त्यामुळें त्यांचें दिग्दर्शन चित्रकाराच्या पद्धतीनेंच असे. आणि त्यांच्या शिष्यांचेंही अद्याप आपणांस हेंच दिसतें. ही त्यांची दृष्टि चित्रानिर्मितीपासून तों त्याचे पोस्टर्स तयार करण्यापर्यंत प्रत्येक बारीक सारीक गोष्टींत कायम असे. पोस्टर्स लावण्याची पद्धत बाबुरावांनीं सुरूं केली. मुंबईला तर पोस्टर लावलें कीं झुंडीच्या झुंडी लोटत. हें सर्व स्वतः बाबुराव करीत आणि पुढें पुढेंही त्यांनीं हौसेनें पोस्टर्स रंगविलीं. "प्रतिभा" (बोलपट) मधील सुद्धां कांहीं पोस्टर्स रंगविलीं होतीं.

बाबुरावांनीं चित्रपटकला ही अनेक कलांचा संच आहे हें पूर्ण ओळखलें होते, व त्याप्रमाणें त्यांनीं सर्व कला आत्मसात् केल्या होत्या. त्यांना काय येत नव्हते असें नाहीं. बाबुराव उत्कृष्ट पटकथा लेखकसुद्धां होते. त्यांच्याइतकी सुंदर कथा कोणीच जमवत नसे. या सर्वांमुळें त्यांच्या सभोंवार असलेले दामले, फत्तेलाल व शांताराम या कलावंतांना पण प्रत्येक खात्यांत काम करण्याची संवय लागली. आणि पुढें त्यापैकीं प्रत्येकानें आपल्या विशेष आवडीचें एक एक क्षेत्र पत्करलं. सर्वांना सर्व बाजूंची माहिती मिळे. सर्वजण नवीन प्रयोगाकरितां धडपडणारी असल्याकारणानें सर्वजण मिळून सहकार्याच्या भावनेनें काम करीत. बाबुराव चित्रपट काढीत असतांनाच फत्तेलाल,

शांताराम व कै. बाळासाहेब यादव यांना " नेताजी पालकर " व " कर्ण " हे विषय देऊन चित्रपट काढण्यास संधि दिली. त्या कारणानें अनुभव मिळून प्रत्येक जण स्वतंत्र चित्रसंस्था चालविण्याच्या कर्तबगारीचा झाला.

प्रत्येक गोष्ट निर्दोष व सुंदर व्हावी या हव्यासामुळें बाबुरावांनीं यंत्राच्या अनेक सुधारणा केल्या. या उदाहरणांपैकीं एक उदाहरण म्हणजे कंपनींत एक मोटार नवीन आणली व ती सर्व उलगडली व सर्व यंत्राची माहिती घेऊन त्यांनीं परत जोडली. अशा प्रकारचे त्यांचे प्रयोग नेहमींच असत.

नवे नट, नवे दिग्दर्शक, नवे तंत्रविशारद आणि लेखक पुढें आणण्यांत सदोदित बाबुरावांनीं प्रयत्न केला व आणले. नव्या कल्पना डोळे व कान उघडे ठेवून आत्मसात् केल्या. लक्ष्मीच्या छुम छुम आवाजानें मोहीत न होतां सरस्वतीच्या पायाशीं बसून तिची सेवा करण्यांतच त्यांनीं धन्यता मानली. कांहीं दोषांमुळें बाबुरावांनीं आपलें नुकसान करून घेतलें. पण चित्रपट कलेची त्यांनीं भरभराट स्वतःच्या पोटाला चिमटा देऊन केली. आपल्या कलेशीं, ध्येयाशीं व शुद्ध शीलाशीं त्यांनीं केव्हांही प्रतारणा केली नाहीं. आयुष्याला उतार पडला तरीसुद्धां ते पूर्वींच्या कारकीर्दीवर कसेबसे जगले नाहींत. ते सदोदित उद्योगी असत. त्यांची कर्तृत्व-शक्ति शेवटपर्यंत जागी होती. नवीन कांहीं तरी करण्याची उमेद ते नेहमी बाळगीत.

## ९. श्रीमति सरदारबाई

[ बाबुरावांचा " सावकारी पाश " गाजविणाऱ्या कुशल नटी.]

मी माझें जीवन लिहिण्याचे कधी काळीं ठरविले तर त्यांत व्यक्तिशः माझ्याविषयीं फारच कमी असेल किंवा जवळ जवळ कांहींही नसणार. कारण ज्यांच्यामुळें मी रजतपटावर दिसले त्या कै. कलामहर्षी बाबुराव पेंटर यांच्याबद्दलच पानें आडविली जातील. त्यांत माझे असे कांहींच असणार नाहीं. त्यांच्यावरील

फाजलि गुरुप्रेमानें किंवा मानलेल्या पितृप्रेमामुळें हे म्हणत असेन असें कोणाला वाटण्याची शक्यता आहे. पण मला इतरांच्या अभिप्रायाची पर्वा करण्याचे कारण काय ? त्यांच्याविषयीं लिहिलें म्हणजे कागारूच्या पिलाप्रमाणें त्या लिखाणाच्या पोटांत मी आलेच.

सन १९३३–३४ कडे मला वळलं पाहिजे. मूकपट जमान्याच्या अगदीं शेवटीं कै. बाबुराव पेंटर व श्री. बाळ गजबर एका लहान मुलीच्या शोधांत होते. योगायोगानें माझी भेट झाली. मला स्टुडिओंत घेऊन गेले. तेथील सर्व वातावरण पाहून मी गांगरूनच गेले. त्या वेळीं माझे वय १६–१७ असेल. तोंडाला रंग लावून श्री. बाळ गजबर यांनीं माझा फोटो घेतला. त्या वेळीं तर खूपच घाबरले. मला सर्व गोष्टी नवीन होत्या. कारण मी नुकतीच जोगुळ या खेड्यांतून कोल्हापूर शहरांत आले होते. घरीं परतले तर सिनेमांत काम करणें हें त्या काळीं मोठे पाप समजले जाई. मला अनेक लोकांनीं भीति घातली कीं, "सिनेमांत काम केल्यानंतर घरीं कोणी घेत नाहीं बोलत नाहीं." त्या वेळीं माझ्या बालवयाला तें सर्व खरे वाटलें, व रात्रीच्या रात्रीं न सांगता गांवीं निघून गेले. पण परत दोन तीन महिन्यांनीं सिनेमांत काम करण्याच्या तीव्र इच्छेने मी परत कोल्हापूरला आले, व बाबुरावांना भेटले. पूर्वीच्या प्रकारामुळें भीतभीतच मी त्यांची भेट घरीं घेतली व इच्छा प्रगट केली. त्या वेळीं विनोदानें ते म्हणाले, "आम्हांला तुमची गरज होती त्या वेळीं पळून गेलांत, आणि आतां परत तुम्ही गरजू म्हणून आलांत." या वेळीं बाबुराव "प्रतिभा" या बोलपटाच्या निर्मितींत गुंतले होते. आणि माझ्या दैवयोगानें म्हणा अगर कोणत्याही कारणाने या 'प्रतिभा' बरोबर दुसरा एक बोलपट निर्माण करण्याचे ठरले. तो बोलपट म्हणजे महाराष्ट्राचे वस्तुनिष्ठ शेतकरी जीवन दर्शन घडविणारा "सावकारी पाश" हा ग्रामीण बोलपट होय. याच बोलपटांत मला 'तारा' या नायकिणीची पहिली भूमिका मिळाली. या बोलपटानें मी विख्यात झाले. ही घटना अतिशय महत्त्वाची

आहे व माझ्या जीवनांत या घटनेमुळें एक प्रचंड कालखंड निर्माण झाला. चित्रपटसृष्टी शकुंतला मानली व तिचा जन्मदाता विश्वामित्र कै. फाळके असले तरी तिला लहानाची मोठी करणारे कण्वऋषी कै. बाबुराव पेंटर हेच होत! अशा या महान कलावंताकडे मला पहिली भूमिका करण्याचे भाग्य लाभले व जे कांहीं मी यश संपादन केले ते त्यांच्यामुळेंच.

या नंतर मी त्यांच्या प्रतिभा या सौंदर्यप्रधान चित्रांत भूमिका केली. पहिल्या भूमिकेच्या मानानें ही अगदींच लहान होती. त्यांत फक्त एकच नृत्य होते. पण तें कायम प्रेक्षकांच्या लक्षांत राहाण्याइतके प्रभावी होते. माझ्या कलागुणानें नव्हे तर बाबुरावांच्या कलानैपुण्य दृष्टीमुळें प्रेक्षकांच्या स्मरणांत होते व आहे. त्यांनीं तें नृत्य ज्या पद्धतीनें चित्रित केले होते त्या पद्धतीचा प्रयत्न खूप लोकांनीं केला पण तो कुणालाच साधला नाहीं व अद्याप तो माझ्या पहाण्यांत नाहीं.

बाबुराव फार कमी बोलत व जे बोलत ते फार थोड्यांना समजे. दुसऱ्या करवींच सांगत. त्या वेळी त्यांच्या आसपास नेहमीं केशवराव दाते, औंधकर ही मंडळी सतत असत. त्यांच्या करवींच नेहमीं ते कांहीं सांगायचे असेल ते सांगत. विशेष म्हणजे कोणत्याही स्त्रीला ‘ अहो ’ ‘ जाहो ’ ने बोलवत. लहान असो अगर मोठी असो. नेहमी नवीन कलाकाराना तयार करण्यांत धडपडत असत. सावकारी पाशमध्यें चंद्रकांत, राजा परांजपे, दानवे, जोग, वसंत ठेंगडी या आताच्या नटश्रेष्ठांना प्रथम भूमिका बाबुरावांनी दिल्या. बाबुराव सतत उद्योगी असत. कोणत्याही वेळीं ते रिकामे दिसत नसत. माझा त्यांनी चित्रकले करिता “ मॉडेल ” म्हणून उपयोग केला. प्रख्यात सरस्वतीचं चित्र माझ्यावरनंच त्यांनी केलं आहे. ही गोष्ट मला अभिमानास्पद आहे.

बाबुरावांच्या जवळ व्यक्तीमत्त्व फार होते. त्यांचेकडे काम केले व त्यांच्या चित्राचे मी ‘ मॉडेल ’ च असल्याने सदोदीत त्यांचा सहवास लाभे. पण त्यांच्याशीं बोलण्याचे कधीच धाडस झाले नाही.

अगदी परवाचा त्यांच्या शेवटचा बोलपट " विश्वामित्र. " यांत सुद्धां मला त्यांनी महाराणीची भूमिका दिली. त्यावेळी सुद्धां ते पूर्वीच्याच उत्साहानें काम करीत असल्याचे पाहून मला आश्चर्य वाटले. ६०व्या वर्षीसुद्धां ते ऐन तरुण्यांतील तरुणाप्रमाणें काम करीत होते. शूटिंग संपवून घरी गेले कीं महात्मा गांधीचा पुतळा करण्यांत गुंतायचे. असा हा सदोदीत उद्योगी असणारा महान कलावंत आम्हां सर्वांना पोरके करून सोडून गेला !

## १०. श्रीमती अनसुयाबाई

[ बाबूरावांनीं रजतपटावर आणलेली पंहिली कुलीन नटी. ]

आतांच्या सिनेमा तारकांचें वैभव पाहिले, पगाराचे आकडे ऐकले, व त्यांच्या करितां चाललेली चढाओढ वृत्तपत्रांत वाचली कीं, १९२८ सालाची आठवण येते. कै. कलामहर्षि बाबुराव पेंटर डोळ्यांपुढे येतात. त्यांनींच आम्हां सिनेमा तारकांना रुपेरी पडदा दाखविला.

भारतांत सिनेमा कला सुरू झाली व कै. फाळके चित्रनिर्मिति करूं लागले, तेव्हां ते देखण्या मुलाला स्त्रावेष देऊन स्त्रीभूमिका वठवून घेत. पण ज्या वेळीं सिनेमा कला बाबुरावांनीं वाढविण्यास सुरुवात कोल्हापुरांत केला तेव्हां त्यांनीं प्रथम स्त्रियांच्या भूमिका स्त्रियांना दिल्या.

सिनेमा कंपनीची पूर्वतयारी म्हणून बाबुरावांनीं महाराष्ट्र सिनेमा नांवाचें थिएटर उघडलें. त्या ठिकाणीं इंग्लिश व फाळके यांचें चित्रपट दाखवले जात. त्या थिएटरमध्यें मी चोरून सिनेमा पहाण्यास जात असे. कारण त्या वेळीं स्त्रियांनीं नेहमीं सिनेमा पहाणं म्हणजे महापाप होत असे. काम केल्यानंतर तर विचारूंच नका ! आणि मी तर चांगल्या सुशिक्षित कुटुंबांतील ! माझे मेहुणे डॉक्टर होते त्यांचेकडे मीं शिक्षणासाठीं होते. माझ्या सात यत्ता पूर्ण झाल्या होत्या.

या महाराष्ट्र सिनेमांत " लिबर्टी ", " पेग ऑफ गॅरी " सारखे

चित्रपट पाहून माझी इच्छा सिनेमांत काम करण्याची झाली. पण घरांतील मंडळी व समाज— !

याच वेळीं बाबुरावांनीं " गुडनाईट " नांवाचे एक शॉर्ट रील ( १० फूट लांबीचे ) घेतले होतें. आणि सिनेमा संपला कीं तें दाखवत असत. त्यांत गजराबाई या नांवाच्या स्त्रीनें प्रथम भूमिका केली. भारतांत प्रथम पडद्यावर आलेली हीच पहिली स्त्री ! त्यानंतर मी व गुलाबबाई. सुशिक्षित पहिली स्त्री म्हणजे मीच ! सिनेमांत गेल्यामुळें समाज खवळला. आम्हांला घर दार सोडावें लागलें. आणि आम्ही महाराष्ट्र फिल्म कंपनींतच जाऊन राहिलों.

धंदा नवीन. कंपनी नुकतीच चालू झालेली. पैसे नाहींत तर पगार कुठला ! अशा वेळीं कंपनींतून फक्त जेवण मिळे ! बाबूराव पेंटर, बाबा गजबर, फत्तेलालमामा यांचीं फाटकी धोतरे नेसून आम्ही दिवस कंठीत होतों.

" सीता स्वयंवर " बाबूरावांनीं प्रथम चित्र काढण्याचें ठरविलें. त्यांत माझ्याकडे सीतेची भूमिका आली. पण या कलावंताला तो प्रथम न घेतां " सैरंध्री " घेण्याची इच्छा झाली व त्याची तयारी सुरू झाली, व त्याचबरोबर कॅमेरा करण्याचें कार्य जोरांत सुरू झालें.

बाबूरावांची महाराष्ट्र फिल्म कंपनी म्हणजे एक फार मोठें कुटुंब होतें. प्रत्येक जण पडेल तें काम करीत असे. आणि आतां—" मी हिरॉईन आहे, गाडी पाहिजे. माझ्या कुत्र्याला खुर्ची हवी "वगैरे ! मी व गुलाबबाई तर लेथ मशीनचें चक्र फिरवण्याचें काम करीत असूं, व त्यावर बाबुराव कॅमेऱ्याचे पार्ट बनवत. महाराष्ट्र फिल्म कंपनीचा स्टुडिओ ( पत्र्याचें शेड ) उभारण्याचें काम चालू केलें तेव्हां तर बाबुरावांपासून ते अंतु डोंबाऱ्यापर्यंत सर्वांनीं माती ओढण्याचें काम केलें, व महाराष्ट्राच्या ध्येयवादी परंपरेचा स्टुडिओ उभा केला. " सैरंध्री "च्या चित्रणास प्रारंभ झाला. मी त्यांत सुदेष्णाची भूमिका केली. हीच माझी पहिली भूमिका, व गुलाबबाई यांनीं सैरंध्रीची भूमिका केली होती. " सैरंध्री " पुण्यास लोकमान्य टिळकांच्या हस्तें सुरू झाला व आख्या भारतांत गाजला.

त्यानंतर मी " दामाजी ", " नेताजी पालकर ", " गज गौरी ", " मुरलीवाला ", " सावित्री ", " लंका " या गाजलेल्या चित्रपटांत प्रमुख भूमिका केल्या. बाबुरावांचें बोलणें कुणालाच समजत नसे. आणि बाबुराव विशेषतः बोलत नसतच. सदोदित उद्योगी असत. त्यांचा दरारा मात्र खूपच असे. त्यांच्या दराऱ्याचें उदाहरण सांगतें. शांताराम, दामले व फत्तेलालमामा या सर्वांनीं मिळून ' प्रभात ' कंपनी काढण्याचें ठरविलें. त्या वेळीं महाराष्ट्र कंपनींत ' लंका ' हा चित्रपट अर्धवट झाला होता, व या लोकांचे कंपनीचे प्रयत्न चालू होते. हें सर्व बाबुरावांना माहीत होतेच, पण प्रत्यक्ष सांगण्याचें त्यांनीं ठरवलें. पण रोज त्यांच्या ऑफिससमोर फत्तेलालमामा व शांताराम सांगण्याकरतां जायचे व परत मागे फिरायचे. असे ४–५ दिवस चालले होते. शेवटीं तिघे गेले व भीत भीत सांगितले. शांतारामबापू त्यांच्यासमोर कधीं खुर्चीवर बसल्याचें मीं तर पाहिलेंच नाहीं.

बाबुरावांचे वेगवेगळे मित्र होते. शिकारीचे वेगळे. म्हणजे कोल्हापुरांतील जहागिरदार मंडळी. प्रख्यात साहित्यिक ना. सी. फडके, आपटे वगैरे वेगळे. आणि या प्रत्येकांत ते रमत असत. बाबुराव प्रत्येक गोष्ट पूर्ण विचारानें करीत असत. चित्रपटांतील पात्रांची निवड तर ते अचुक करीत असत. " लंका " च्या वेळीं माझी निवड " शूर्पणखा " करितां केली. तेव्हां सर्व लोक बाबुरावांची चुकीची निवड असें बोलूं लागले. अर्थात् हे सर्व मागें. त्यांच्यासमोर बोलण्याची कुणाची छातीच नव्हती. तरी पण त्या वेळीं शं. वा. किर्लोस्कर यांनीं ही शंका बाबुरावांना बोलून दाखविली कीं " अनुसयासारख्या सुंदर स्त्रीला तुम्ही शूर्पणखा करणार. वास्तविक तिला सीता केली पाहिजे. " त्यावेळीं बाबुराव हंसून म्हणाले, " शंकरराव, मी केलेली निवड योग्य आहे. शूर्पणखा राक्षसीण आहे खरें. पण ती ज्या वेळीं रामासमोर येते त्याप्रसंगीं ती अतिसुंदर स्त्री म्हणून येते. सीतेपेक्षां ती मुळांत सुंदर दिसायला हवी."

कला नवीन असल्याकारणानें प्रथम प्रथम समाजाची सहानुभुति नव्हतीच ! पण नंतर नंतर बाबुरावांचें महत्त्व पटूं लागलें. त्यावेळीं त्यांना कोल्हापुरांतील थोरा मोठ्या लोकांचीं आमंत्रणें (जेवणाची) येत. पण बाबुराव एकटे कधींच जात नसत.

नेहमीं ते म्हणायचे "महाराष्ट्र फिल्म कंपनी एक माझें मोठें कुटुंब आहे." तेव्हां आमंत्रण देणाऱ्यास सर्वांना बोलावणें भाग पडे. त्यांत मग अगदीं कूलीसुद्धां येत असे.

बाबूराव आम्हां स्त्रियांची तर इतकी काळजी घेत कीं, उभ्या हयातींत त्यांनीं आपल्या मुलींची घेतली नसेल. एखाद्या पडण्याच्या अवघड दृष्याच्या वेळीं बाबुराव स्वतः त्या जागेंत खालीं जमिनी-वर अगोदर पडून पहात. नंतर आम्हांस ते करावयास लावत.

स्त्रियांचा मेकअप ते स्वतः करीत असत. बाबुरावांच्या अगदीं थोडे बोलण्याच्या स्वभावामुळें त्यांची फार हानी झाली. कोणतीही अडचण ते बोलून दाखवीत नसत. त्या कारणानें त्यांना काय होतें, काय हवें हें कळत नसे. पण ते सदोदित झगडत राहिले.

## ११ श्री. वसंत पेंटर

[ श्री. आनंदराव मिस्त्रींचे चिरंजीव. चित्रकार, प्रभात कंपनीचे आर्ट डायरेक्टर, दिग्दर्शक, आणि निर्माते. ]

बालपणापासून बाबुरावांच्या प्रत्येक बारीक सारीक हालचालीचा परिणाम माझ्या मनावर खोलवर होत असे. माझे वडील श्री. आनंदराव पेंटर हे माझ्या वयाच्या तिसऱ्या वर्षीं वारले. त्यानंतर परिस्थितीशी टक्कर घेतघेत माझ्या डोळ्यांपुढें आदर्श फक्त बाबुराव पेंटरच उरले. बाबुरावांच्याप्रमाणें निष्णात चित्रकार बनायचं ही माझी महत्वाकांक्षा होऊन बसली. चित्रकला आत्मसात् केल्यानेच प्रत्येक क्षेत्रांत प्रभुत्व येते ही माझी ठाम समजूत झाली, व या दिशेने मी प्रयत्न सुरू केले.

पण माझ्या बालवयांत निव्वळ पेन्सीलने चित्र रेखाटायचा मला कंटाळा आला, व एक दिवस भीत भीतच मी बाबूरावांचे जवळ

रंगपेटीची मागणी केली.

"चित्र रंगवायच्या आधीं निर्दोष ऑउटलाईन यायला हवी ती तुला येते काय ?" असा बाबुरावांनीं उलट मला प्रश्न केला. मला नकारार्थी उत्तर द्यावं लागलं. बाबुरावांनी लागलीच एक पेन्सील मला दिली व सांगितलं पेन्सीलवर ताबा मिळव, रंगाचा आभास पेन्सीलच्या सहाय्यानं आणायला लागलास कीं तूं न मागता मी रंगपेटी देतों. त्यांचे ते उद्गार चित्रकलेच्या शास्त्रांत अगदी मोलाचे आहेत. ते मोजकंच पण अत्यंत मार्मिक बोलत असत. त्यांच्या शब्दाला एक वेगळीच धार होती.

त्यांच्या घरीं घरकामासाठीं एक पोऱ्या होता. तो नेहमीं कामांत चूर असायचा. एक दिवस झाडलोट करीत असतांनाच बाबूराव त्याला म्हणाले, "केरसुणीबरोबरच कधीं कधीं ब्रश हातीं घेत जा." त्यांच्या शब्दाचा परिणाम अत्यंत खोलवर झाला. त्या पोऱ्यानं कुंचल्याची आराधना सुरू केली. बाबुरावांचं मार्गदर्शन त्याला लाभलं. पुढें तो फार मोठा चित्रकार झाला.

बाबुराव कलेशीं अत्यंत प्रामाणिक होते. जन्मभर कलेच्या आराधनेशिवाय दुसरं कांहींही त्यांनीं केलं नाहीं. त्यांच्या कलेतून वास्तव जीवनाचा अविष्कार सतत त्यांनीं केला. जीवनाची फसवणूक करणारी कला त्यांना आवडत नव्हती. आपल्या कलेंतून वास्तव जीवनाची धग जावणली पाहिजे असं सतत त्यांचं सांगणं असे. चित्रीकरणाच्या वेळीं तर वातावरण निर्मिती करण्यांत त्यांचा हातखंडा होता. छायाप्रकाश योजना तर पुरेपूर वास्तव पाहिजे असा त्यांचा कटाक्ष असे.

एका सकाळीं बाबुराव व मी फिरायला चाललों होतों. वाटेंत एके ठिकाणीं एका चित्रपटाचं शूटिंग चाललं होतं. १०–१५ फुटांचा घेर असलेल्या एका मोठ्या कृत्रिम झाडाखालीं ऋषीकुमारांची पाठशाळा भरल्याचं दृश्य मांडण्यांत आलं होतं...पण झाडाच्या तळांतली पाठशाळा कृत्रीम प्रकाशस्रोत टाकून अगदीं कडकडीत केली होती. बाबूरावाचं लक्ष तिकडे जातांच त्यांच्या-

तली वास्तवप्रियता जागी झाली. त्यांनीं कॅमेरामन व डायरेक्टर दोघांना बोलावून विचारलं,

" प्राचीन ऋषी झाडाखालीं शाळा कां भरवित होते ? "

डायरेक्टर घुटमळत सांगूं लागले, " सावलीसाठीं ! पण फोटोग्राफीच्या सोयीसाठीं..."

बाबुराव त्याचं बोलणं अपुरं ऐकूनच म्हणाले, " वास्तवतेचा आभास निर्माण व्हावा इतपत कलेंत कृत्रीमता आली तर चालते, पण निव्वळ तंत्राच्या सोयीसाठीं वातावरणाची व दृश्याची नासाडी करूं नका. "

बाबुरावांचा स्पष्टवक्तेपणा इतरांना झोंबत असे, पण त्यांना निरुत्तर करण्याचं सामर्थ्य त्यांच्या अंगीं नव्हतं.

बाबुरावांचा चित्रपटांतल्या गाण्यांवर व संवादातिरेकावर फार मोठा रोष होता. वास्तव जीवनाशीं अगदीं विसंगत या गोष्टी आहेत असं त्यांना वाटत असे. निव्वळ वातावरणाला पूरक असे पार्श्वसंगीत देऊन काढण्यांत आलेला " थीफ " हा चित्रपट त्यांना फार आवडला. ते आग्रहानं सांगत असत, " जिथें बोललंच पाहिजे तिथें संवाद असूं द्यात. चित्रपटांत चित्रमय हालचालीला वाचा फुटायला हवी... गाण्यासाठीं चित्रपट स्वतंत्र काढा. जग वास्तवतेकडे सारखं सरकत असतांना आपण घेडगुजरी चित्रपटनिर्मिति करणं यांत आपल्या देशाचा घात आहे. संपत्तीचा अपव्यय व स्वतःची फसवणूक आहे. "

बाबूरावांच्या मौलीक कल्पना प्रत्यक्षांत उतरावयासाठीं हवं असणारे आर्थिक स्वास्थ्य व परिस्थिती त्यांना कधीही लाभली नाहीं. प्रतिकूल परिस्थिती बरोबर झुंजत त्यांचं आयुष्य संपलं. पण या सर्व जीवनाच्या वाटचालींत त्यांनीं कर्तृत्वाचे डोंगर रचून ठेवले आहेत. महाराष्ट्र फिल्म कंपनीची निर्मिती, " सावकारी पाश "-सारखा वास्तवपूर्ण ध्येयवादी चित्रपट, शांताराम, फत्तेलाल यांसारखी उज्वल शिष्यपरंपरा, त्यांच्या अनेक चित्र व शिल्पकृती, व रत्नासारखी सद्‌गुणी मुलं—या साऱ्यांच्याकडे पाहिलं कीं बाबुरावांची

स्मृती अक्षय राहील.

आपल्या हयातींत बाबुरावांनीं कर्मयोग्याचं आयुष्य काढलं. सतत प्रयत्न, स्थितप्रज्ञाची वृत्ती, विशाल अंतःकरण, असामान्य प्रतिभा, या गुणांच्या जोरावर हा महान कलावंत कलापूरांत भव्य वृक्षाप्रमाणें शोभत होता. मृत्यूच्या आघातानं बाबुराव गेले...पण जातांना त्यांनीं त्यांच्या मुलांप्रमाणेंच रसिक जनता पोरकी केली !

## १२. श्री. दिलीप जामदार

[ लेखक, वक्ते, चित्रकार. अलीकडच्या चित्रपटांतील बाबुरावांचे मदतनीस व शिष्य.]

पुण्यांतल्या एका निरुंद रस्त्यांतून कै. बाबुरावांनीं गाडी वळवली व हातांतल्या घड्याळाकडे पहात ते म्हणाले, " लवकर पोहचलं पाहिजे म्हणून हा शॉर्ट कट काढला ! " त्यांचं बोलणं संपायच्या आंतच पोलीसाची शीट ऐकूं आली. बाबुरावांनीं गाडीचा ब्रेक दाबला, गाडी थांबतांच काय घडलं म्हणून ते पाहूं लागले. पोलीस बोटांभोवती शीट फिरवीत गाडीजवळ येऊं लागला. बाबुरावांच्या लक्षांत आलं कीं, आपण " वन वे ट्रॅफीक "चा नियम मोडला. या साऱ्या घडामोडींत बराच वेळ मोडणार असं मला वाटलं. श्री. बाबुराव हे पुण्याच्या चित्रकार संमेलनाचे अध्यक्ष होते, व अध्यक्षीय भाषण करायसाठीं ते निघाले होते. वेळेंत पोहोंचण्याची शक्यता दुरावत चालली होती. बघ्यांची गर्दी गाडीभोवती जमूं लागली होती. मी गाडींतून उतरलो व पोलीसाला बाजूला बोलावून बाबुरावांचं नांव सांगितलं. त्याच्या मुद्रेवर अनुकूल फरक दिसूं लागला. बाबुरावांच्याकडे तो निरखून पाहूं लागला...बाबुरावांचं व्यक्तिमत्व प्रभावी होतं. त्यांची पांढरी शुभ्र दाढी, भेदक नजर व रेखीव अवयव यामुळें पहाणाऱ्याच्या मनांत चटकन् त्यांच्याविषयीं आदरभाव निर्माण होत असे. पार्श्वभूमीला त्यांच्या कर्तृत्वाची वलयं शोभून दिसत असत. अगदी अपरिचित अशा व्यक्तीलासुद्धां त्यांना पहातांच त्यांच्याविषयीं दबदबा वाटत असे. पोलीसावर त्याचा

आसर पडला असावा. कारण त्यानं बाबूरावांना थोडं बाजूला बोलवायला मला सांगितलं. त्याच्या सांगण्याप्रमाणें बाबुराव गाडी-खालीं उतरून बाजूला आले. पोलीसानं वाकून त्यांना नमस्कार केला व तो म्हणाला, "साहेब, थोडी तकलीफ झाली आपल्याला. आपण जा. पण ओळख ठेवा गरिबाची!"

पोलीस कलामहर्षी बाबुरावांचा रसिक चहाता निघाला! त्याच्या अंतःकरणावर उमटलेला बाबुरावांच्या व्यक्तिमत्वाचा ठसा मला फार मोलाचा वाटतो.

अशा अनेक घटना सांगता येतील.

... चित्रपटाच्या निर्मितींत आबा गुंतले होते. चित्रीकरणाच्या अगदीं घाईत आबांनीं लेखक मजकूराच्या परवानगीशिवाय कथेंत मामुली फरक केला. लेखकांच्या कानांवर ही बातमी पोह्चतांच ते तावा तावानें आबांचेकडे आले. आबांना बोलण्याची संधि न देतांच जो त्यांनीं आपल्या जिभेचा पट्टा सोडला तो एक तासभर. तोंडाला येईल तें लेखक बोलत होते. या भांडणाची अवस्था कुठवर जाणार हे समजेना... पण शेवटीं लेखकच दमले व ते रुमालानं घाम पुसूं लागले. आबांनीं स्थीर नजरेनं एकदां लेखकाकडे पाहिलं व आपल्या धीम्या आवाजांत चहा आणायला सांगितलं...माझ्याकडे वळून त्यांनीं आपल्या हातांतला मासिकाचा अंक फेंकला व चष्म्याच्या कांचा पुसत पुसत ते म्हणाले, "यांतली...लघुकथा वाचा, चांगली लिहलिय, वांचून संपली माझी."

—लेखकाच्या चेहऱ्यावरचे भाव मी जन्मांत विसरणार नाहीं!

...आबांची कलाकृती पहात असतांना रसिक प्रेक्षक ज्या एका विशाल सौंदर्याच्या साक्षात्कारानं दिपून जातो त्याच भारावलेल्या मनःस्थितींत आबा निसर्ग सौंदर्यापुढं उभे रहात.

त्या दिवशीं अशीच एक घटना घडली. काम संपल्यावर गच्चींत मोकळ्या वाऱ्यावर बसायसाठीं त्यांनी खुर्च्या गच्चींत टाकायला सांगितल्या. आम्ही गच्चींत येऊन उभे राहिलो. त्यांच्या तिसऱ्या मजल्यावरच्या गच्चींतून शहराचा फार मोठा विस्तार दिसतो.

विशेषतः रंकाळ्याच्या कांठाला उभी असणारी नारळीची झाडं, शालीनी राजवाड्याची इमारत, आणि रंकाळा तलावातलं पाणी हें दृश्य सूर्यास्ताच्या दीप्तीनं झळाळूं लागलं की चित्रकारचं मन दिग्मूढ होतं. त्यांतच पावसाची एखादी सर येऊन गेली आणि मावळत्या किरणांचा पिसारा मेघखंडावर पसरला की हीं शोभा पहाताना वेळेचं भान रहात नाहीं. त्या दिवशी तर आकाशांत रंगाची लयलूट झाली होती. आबा स्तिमीत होऊन पहात होते. आम्ही दोघंही एकमेकाशी बोलत नव्हतो. समोरच्या निसर्ग शोभेनं आम्हाला मंत्रमुग्ध करून सोडलं होतं.

सूर्यास्त होऊन बराच वेळ झाला.. आकाशावर काजळी पसरूं लागली. तसे आबा भानावर येऊन चटकन् म्हणाले, "आपण आंत बसूं या!"

"कां ?" मी अभावितपणें विचारलं.

आबानीं स्मित करीत मला सांगितलं, "मोठ्या माणसाच्या वैभवाचा काल संपला की त्याचा आपत्काल पहायची पाळी येऊ नये. निसर्गाचा एवढा मोठा ऐश्वर्याचा दिमाख पाहिल्यावर आताचा हा अधःपातासारखा काजळलेला देखावा पहाणं बरं नव्हे!"

अन् ते चटकन निघून आंत आले.

...आबांची एक मुलाखत लिहायचा प्रसंग माझ्यावर आला होता. त्यांना अनेक प्रश्न विचारतां विचारतां शेवटी मी एक मोठा चमत्कारिक प्रश्न त्यांना विचारला, "आबा, तुम्हांला कधी मरावसं वाटलं होतं काय ?" माझ्या या प्रश्नाची प्रतिक्रिया काय होते हे मी बारकाईनं पहात होतो. पण मुद्रेवर तसा कोणताही फरक होऊं न देतां हातांतला कुंचला खाली न ठेवतां ते बोलूं लागले.

"होय, मला एकदां मरण आलं तर बरं असं वाटूं लागलं होतं."

"कधीं ?" मी उत्सुकतेनें विचारलं. त्यांनीं सांगायला सुरवात केली, "मध्यंतरी मी अतिशय आजारी होतो. माझ्या डोळ्यांत बिघाड झाला. दृष्टी दगावली ही कल्पनाच मला सहवेना.

चित्रकाराची दृष्टी गेल्यावर जगायचं कशाला ? त्या क्षणीं मरणानं माझ्यावर झडप घालावी असं मला वाटत होतं…"

अगदी अलीकडच्या काळांत आबांची दृष्टी दिव्य दृष्टी झाली होती. अनेक वर्षांच्या अनुभवानं व अखंड तपस्येनं त्यांच्या दृष्टींत अमूर्त सौंदर्य कण साक्षात् सजीव करून ठेवायचं सामर्थ्य आलं होतं. त्यांच्या कुंचल्याच्या फटकाऱ्यांत, शिल्पाला आकार देणाऱ्या हातांत अभिजातपणा आला होता. कलेच्या आणि त्यांच्या वैयक्तिक संसाराच्या विकासाला त्यांची कासवीची दृष्टी अन् कर्तृत्वाचे हात अवश्यक होते.पण ते देवाला मंजूर नव्हतं. काळाच्या निघृण हातानं त्यांची दृष्टी कायमची झाकली !

## १३. श्री. शं. वा. किर्लोस्कर

[ विख्यात संपादक, चित्रकार, आणि बाबुरावांचे जिव्हाळ्याचे स्नेही .]

कवि बोरकरांची " तेथें कर माझे जुळती " ही एक अत्यंत सुंदर कविता आहे. दिव्यत्वाचा साक्षात्कार जेथें जेथें होतो तेथें आदरानें माणसाचें शिर आपोआप नमतें, हें कवीचे निवेदन, व त्याला आनुरूप अशीं कांहीं सुंदर उदाहरणें त्यांनीं या कवितेंत दिलीं आहेत.

अशा उदाहरणांतच उत्कृष्ट कलावंताचाहि निर्देश करण्यासारखा आहे असें मला वाटतें. नाहींपेक्षां कै. बाबुराव पेंटर यांच्याबद्दल त्यांच्या संनिध येणाऱ्या प्रत्येक व्यक्तिला इतका नितान्त आदर कां वाटावा, याचें दुसरें कोणतें कारण देतां येईल ? ते कोणी बडे सरकारी अधिकारी नव्हते, धनाढ्य गृहस्थ नव्हते, कां शिकून सवरून पदव्या मिळवलेले कोणी विद्वान नव्हते. एक दुबळा पतला दाढी-वाला मनुष्य, पण त्यांच्या कलेचा प्रभाव असा विलक्षण कीं त्यांना पहातांच कोणालाहि त्यांच्यापुढें नम्रच व्हावेसें वाटे !

इतर अनेक कलावंतहि आपल्यास पुष्कळ ठिकाणीं पहावयास मिळतात. तिथें असें कां वाटत नाहीं ? मला वाटतें याचें कारण हें

८२१२

असावें कीं बाबुरावांच्या अंगीं एवढी थोर कला वसत असली, तरी त्यांच्यांत अहंकार अथवा गर्व यांचा लवलेश नव्हता. श्रेष्ठ कला व अहंपणाचा अभाव या गोष्टी एकत्र सांपडणें दुर्मिळच नाहीं कां?

कै. बाबुरावांचा व माझा सुमारें २५--३० वर्षांचा स्नेहसंबंध. मलाहि चित्रें काढायची थोडी हौस, यामुळें मी त्यांच्याकडे आकर्षिला गेलो. कोल्हापूरला केव्हांहि गेलो तरी बाबुरावांच्या घराकडे पाय आपोआप वळत व त्यांच्या सहवासांत दहा पंधरा मिनिटें घालवायला मिळालीं म्हणजे मन अगदीं प्रफुल्लित होऊन जाई. तिथें बाबुराव एकादें पेंटिंग काढीत असले अथवा पुतळा करीत असले म्हणजे तें पहाण्यांतला आनंद तर मोठाच अवर्णनीय. एखाद्या नाजूक रंगातल्या सूक्ष्म छटा दाखवाव्या बाबुरावांनींच. त्यांचं चित्र म्हणजे दृश्य काव्यच !

तथापि बाबुराव नुसते चित्रकारच अथवा चित्रपटकारच नव्हते, तर या कलेबरोबर कांहीं तरी नवेनवें करीत रहावयाचे हीहि त्यांना विलक्षण हौस. माझाहि स्वभाव थोडा याच जातीचा. यामुळें आम्ही दोघे एकत्र जमलो म्हणजे नवनव्या कल्पना काढण्यांत दंग होऊन जायचे.

म्हणूनच आम्ही किर्लोस्करवाडीला एक "समाजमंदिर" नांवाचें नाट्यगृह बांधल्यावर त्याचे पडदे व विंगा प्रचलित पद्धतीपेक्षां अगदीं निराळ्या पद्धतीच्या करायचें ठरविलें व बाबुरावांकडे जातांच त्यांनीहि आमच्या कल्पनेप्रमाणें हें काम उत्साहानें करून दिलें. किर्लोस्करवाडीला कोणतीहि कंपनी आली तरी इथली नेपथ्यरचना पाहून खूष होऊन जात असे.

बाबुरावांनी कोल्हापुरास चित्रपटांचा जमाना सुरू केला. तथापि औद्योगिक क्षेत्रांतहि चित्रपटाचा फार मोठा उपयोग होऊं शकेल ही कल्पना त्याच्यापुढें मांडताच, त्यांनीं आमच्या वाडीला येऊन कारखान्याची एक फिल्म तयार करून दिली. हिंदुस्थानांत तयार झालेली ही पहिलीच औद्योगिक फिल्म असावी.

बाबुराव स्वतः तर उत्कृष्ट चित्रकार होतेच, पण या कलेचा

महाराष्ट्रांत प्रसार व्हावा याबद्दलहि त्यांस फार तळमळ असे. कोल्हापुरास स्थापन झालेल्या आर्ट सोसायटीचे ते प्रमुख नेते व आधार होते. या सोसायटीचा अनेक होतकरू चित्रकारांस फार मोठा लाभ झाला. याच सोसायटीच्या पुरस्कारानें औन्ध येथें एक चित्रकला संमेलनहि भरविण्यांत आलें होतें.

कलेच्या बाबतींतला कुठलाही उद्योग असो, बाबुरावांचे त्याला उत्साहानें सहकार्य मिळायचें हें ठरलेलें. त्याचें एकच उदाहरण सांगायचे तर 'दख्खनकी दौलत' या दक्षिणी कारखानदारांनीं कोल्हापुर येथें भरविलेल्या प्रदर्शनासाठीं त्यांनीं तयार करून दिलेल्या गांधींच्या प्रचंड पुतळ्याचा उल्लेख करायला हरकत नाहीं. असला पुतळा तयार करायचें काम सोपें नव्हतें. कारण त्या पुतळ्याचें नाकच बाबुरावांच्या छातीइतकें उंच, तेव्हां जवळ बसून हें काम करायचें व नाक डोळे प्रमाणबद्ध राखून प्रतिमेंत हुबेहूब साम्य आणायचें म्हणजे एक मोठीच अवघड कामगिरी. तिथल्या तिथें मिळेल त्या साधनसामुग्रीनें तो पुतळा तयार करायचा आणि अवघ्या पंधरा दिवसांत तें काम पुरें झालें पाहिजे ही आणखी अट. पण बाबुरावांनीं तें काम ठरलेल्या वेळेला पार पाडून कलाक्षेत्रांत एक विक्रम करून दाखवला. प्रदर्शन पहायला येणारा प्रत्येक जण हा पुतळा पाहून थक्क होई !

बाबुरावांच्या कलेला आणखी एका फार मोठ्या गुणाची जोड मिळाली होती. ते एक जन्मसिद्ध एंजिनीयरही होते. त्यामुळें कोल्हापुरांतील महात्माजींच्या स्मारकासाठीं मोठा पुतळा तयार करून देण्याचें काम त्यांनीं पत्करल्यावर त्याचे ओतकामहि स्वतःच करण्याचें त्यांनीं ठरविलें. एवढे मोठें ओतकाम आजवर इकडे कोणी केलेलें नव्हतें. आणि बाबुरावांना तरी त्या कामाचा विशेष अनुभव होता असेंहि नाहीं. पण अशा कामांत डगमगावयाचें तर ते बाबुराव कसले ? त्यांनीं स्वतःच्या घराच्या पिछाडीला मोठी भट्टी उभारली. तिच्यासाठीं स्वतःच्या कल्पकतेनें शोधून काढलेलीं विविध साधनें व उपकरणें तयार केली, पुतळ्याच्या ब्राँझसाठीं

कोणकोणत्या धातूंचे रसांत मिश्रण करायला हवें याबद्दलहि अनेक प्रयोग केले, व तें पुतळ्याचें काम शेवटास नेलें.

अशा श्रेष्ठ, सच्छील व स्नेहमय अन्तःकरण असलेल्या कलावंताला महाराष्ट्र मुकला हें आपलें दुर्दैव तर खरेंच; तथापि खरी कला अजरामर असल्यानें बाबुराव गेले तरी त्यांचे चित्रपट, चित्रें व पुतळे महाराष्ट्रीय कलावन्तांना चिरकाल स्फूर्ति देत रहातील, व त्यामुळें महाराष्ट्राच्या अन्तःकरणांत बाबुरावांना सतत एक आदराचें स्थान मिळत राहील अशी माझी खात्री आहे.

## १४. र. कृ. फडके, शिल्पकार.

[ महशूर शिल्पकार, टीकाकार,
आणि बाबूरावांचे आवडते कलावंत मित्र.]

बाबुराव पेंटर म्हटलं कीं कोल्हापूर, अन् कोल्हापूर म्हटलं कीं मराठी चित्रपटाचें माहेर, हें समीकरण बाबुरावांच्या असामान्य प्रसिद्धीचें एक बोलकें प्रतीकच नाहीं का ?

अशा सुविख्यात व्यक्तीच्या अष्टपैलू जीवनांतील महनीय गोष्टी बहुधा अतिपरिचितहि झालेल्या असतात. चित्रपटाच्या प्रचंड क्षेत्रांतील बाबूरावांच्या असंख्य आठवणी प्रकाशित करावयाच्या झाल्यास तोहि एक प्रचंड ग्रंथच होईल. चित्रपटसृष्टीच्या मोहवी वातावरणांत नेते या नात्यानें प्रदीर्घ काल वावरून बाबुराव निष्कलंक राहावेत हें सदरहू ग्रंथाचें भूषणावह सौभाग्यच होय असें मुक्तकंठानें म्हणावें लागेल !

बाबुरावांच्या मोठेपणाला जसे अशा तोलाचे पैलू होते त्याचप्रमाणें बाबुरावांची चित्रकलोपासना हा एक साक्षात् हिरा होता असें म्हटलें असतां चालेल. कलाविषयक अमोलिक शिक्षणाच्या अभावीं हा हिरा थोडासा झांकल्या माणिकासारखा राहिला. नाहीं तर बाबुरावांच्या उपजत कलासक्तीला चमकदार पैलू पडून तो हिरा अन्य गुणमंडित कोंदणांत देदिप्यमान दिसून येण्यास प्रत्यवाय नव्हता.

श्री. बाबुरावांची व माझी प्रथम भेट झाली त्या वेळीं ते माझ्यासारखेच संसारमुक्त झालेले होते. त्यांची वृत्ती परत संसाराकडे वळेल असं मला चुकूनहि वाटलं नव्हतं. आम्हीं उभय मित्र अखेर-पर्यंत विधुराश्रमीच राहूं असं मी खास समजत होतो. पण—एक सुदिन असा उगवला कीं त्यानें मला या महर्षींचा त्रिदंडी संन्यास गृहस्थाश्रमी झाल्याची खुषखबर हंसतखेळत दिली ! ती ऐकून मला सहाजिकच हर्षभरित विस्मय वाटला ! मी थट्टेनें बाबुरावांना म्हटलं—"शाबास आहे तुमची. मित्राला मातीच्या संसारांत ठेवून स्वतःची स्वारी मुकाट्यानें सुखाच्या संसाराकडे वळली अखेर." यावर बाबूराव स्मित हास्य करीत खास कोल्हापुरी शब्दलालित्यांत उद्गारले, "अरे पन ××× —व्हा कीं आमच्या-सारखे. नको कोण म्हणतं ?"

या द्वितीय संसार सुखांत बाबूराव चांगले रमले होते. नेटका प्रपंच करून कला परमार्थ साधण्याकडे त्यांचे चित्त सतत गुंतलें होतें. तीनचार वर्षांपूर्वी मी कोल्हापूरला गेल्यावेळीं आम्हां उभ-यतांची फार वर्षांनीं भरत भेट होण्याचा योग आला. तो परत येण्याऐवजीं अखेरचाच ठरावा हें महत् दुर्भाग्यच होय !

प्रदीर्घ सहवासामुळें सहाजिकच बाबूरावांच्या स्वभाव चित्रांतील छायाप्रकाश माझ्या पूर्ण परिचयाचा झाला होता, तरी पार्श्वभूमि-वजा त्याचें सखोल अंतरंग मी पुरतेंपणीं जाणलें होतें अशी अवास्तव प्रौढी मला मिरवतां येईल असें नाहीं. तथापि स्नेहसंबंधाच्या अपुलकीला रास्त ती प्रौढी वाटावी असं तें थोर असावं एवढं मात्र मी पारखलं होतें. अशा सन्मित्राच्या सान्निध्यांत घालविलेला प्रत्येक क्षण मी भाग्याचाच समजतो.

उत्साह, आत्मविश्वास, धडाडी इत्यादि बाबूरावांचें गुणमहात्म्य चढत्या वयाबरोबर उतरत गेल्याचें माझ्या तरी पहाण्यांत नाहीं. "Not failure but low aim is crime" हें तत्त्व जणुं काय त्यांच्या हाडींमाशीं खिळलेलेंच असावें. या दृष्टीनें हे बाबू केवळ रावच नसून त्यांना रावांतही राव असें म्हणावेंसें वाटतें.

याच्या उलट त्यांच्यांतील हट्ट, नादिष्टपणा, लहर, हौस वगैरे गुणधर्म कांहींसे छोट्या बाबूच्या तोंडीचें असें म्हणतां येईल. अथवा हें मोठेपणाचें दृश्यमणी समजणें वावगे होणार नाहीं. रावांत राव अन् बाबूंत बाबू अशा उलटसुलट गुणांचा हा एकजिनसीपणा लक्षांत घेतां बाबूराव हें नामाभिधान अन्वर्थकच ठरत नाहीं कां ?

उंबराच्या फुलासारखें बाबूरावाचे स्मित हास्य पोट धरून अन् पोट भरून हंसल्याचें मी पाहिले आहे; हा मितभाषगी मूक चित्रपट-निर्माता बोलपटासारखा तासन् तास बोलत राहिल्याचें माझ्या कानांना माहित आहे. अशा वेळीं बाबुरावांची ओळख खुद्द त्यांच्याच नेहमीच्या गंभीर वृत्तीला पटण्यासारखी नव्हती. त्यांच्या भव्य दाढीमिश्यांचा आसर आम्हां उभयतांच्या खासगी बैठकीवर होण्यासारखा नव्हता. चष्म्याच्या गवाक्षांतून दृष्टिक्षेप करणारें त्यांचे अर्धमीलित नेत्र हें सारें अभिनव दृश्य प्रसन्न चित्तानें अवलोकन करीत असल्याचें माझ्या डोळ्यांना दिसत होते.

बाबूरावांना अतिरिक्त अशीं कोणत्या विषयाची आवड असेल तर ती चित्रकलेची. निवांतपणें चित्रनिर्मितींत रममाण होण्याहून त्यांना प्रियतम असे अन्य कांही वाटले नसावे. त्यांच्या ह्या कलाभक्तीला वेडहि म्हटलं तर चालेल.

हे अव्वल दर्ज्याचे चित्रपटनिर्माते चित्रकाराच्या खास भूमिकेंत प्रविष्ट झाले अन् रंगाचित्रविलासांत ह्यांचें हें वेड रंगलें कीं, तोंडें रंगवून सिद्ध झालेल्या सिनेमा नटनटींनीं दिवसभर रखडत रहावें आणि अखेर संध्यासमयीं पाणिदार डोळ्यांतील पाण्यानें चेहरे पट्टीचा रंगविलास खरडीत बसावें !

बाबूरावांच्या रंगचित्र विलासाला पूर्णविराम कसा तो माहितच नसावा. त्यांच्या हातचा चित्रफलक कोणी जबरदस्तीनें हातावेगळां केला तर गोष्ट वेगळी; किंवा न जाणों एखादा चाणाक्ष चहाता चित्रावर आसक्त झाला तर सदरहू कलाकन्येचा गडकरी प्रणीत चिरवियोग ठरलेलाच ! तरी त्याची तिळमात्र खंत बाबूरावांना वाटूं नये याहून स्थितप्रज्ञ तो काय असावयाचा ?

चित्रपट संसाराचा अपार पसारा संभाळण्यांत अविश्रांत श्रम अन् अष्टौप्रहर खर्ची पडावयाचे; त्यांतल्या त्यांत रिकामा सांपडणारा क्षण भाग्याचा समजून तो चित्रकलोपासनेंत वेंचण्यास बाबूरावांची उत्कंठा सदैव तत्परच असावयाची. त्यांचा कलाकुशल कुंचला अथवा रेखाचित्र निष्णात पेन्सील अशा सुसंधीची मार्ग प्रतिक्षा करण्यांत अधीरच झालेली असावयाची. रेखाचित्रविषयक बाबूरावांची असामान्य तपस्या त्यांच्या विविध प्रकारच्या कला निर्मितीची माउलीच होय. तिला चित्रपट निर्मितीची सापत्न माता म्हणतां येईल. चित्रकला ही मूकचित्रपटासारख्या दृश्यकाव्याची कुलस्वामिनिच असून तिला बाबूरावांनीं आपलीशी करून घेतली होती. यामुळें बाबूराव हे मराठी चित्रपटाच्या प्रगतीचे युगप्रवर्तक होऊन त्यांनीं थोर कीर्ति संपादन केली. नामवंत चित्रपट निर्मातेहि निर्माण केले. जे आज बोलपट निर्मितींतहि यशस्वी झालेले आहेत.

बाबूरावांच्या हौसेचे कांहीं छंद जसे मनोरंजक तसेच ते महत्व दर्शकहि असल्यामुळें नमुन्याखातर सांगण्याजोगे आहेत. कामाचे अगामी वेळापत्रक करून ठेवण्याची फिकीर अन जिकीर बाबूरावांनीं केली नाहीं हें एकप्रकारें उचितच म्हटलें पाहिजे. कारण कोणतें काम त्यांची हौशी मर्जी केव्हां हातीं घेईल अन् कोणतें काम किती काल रखडत ठेवालि हें वेळापत्राला अगामी कसें ठावें होणार! महत्त्वाचें काम दूर लोटून हस्तीदंताची टीचभर कलाकृति डोळ्यांत तेल घालून कोरीत बसलेली ही नादिष्ट मूर्ति पहातां पहातां सूर्यनारायणहि चालता व्हावयाचा! अन् संपुष्टांत आलेल्या दीपोज्योतीला डोळ्यांतील तेल तें कसें काय चालणार! निकामी झालेली भिकार मोटार कार चालतीसवरती करण्यांत या चित्रकार यांत्रिकाचा हटवादी छंद एकदां कुदला कीं तो विजयी होईतों इतर कामकाजांना तोंड पुढें काढण्याची सोय ती कसची! चित्रपटाचा प्रचंड कारखाना एकीकडे आगीच्या खाईत पडला असतां तिकडे खुशाल दुर्लक्ष करून, अग्निनारायणाच्या कृपेनें त्याच्या तडाख्यांतून वचावलेला स्वनिर्मित क्यामेरा एकाग्र चित्तानें दुरुस्त करण्यांत

गढलेले हे स्थितप्रज्ञ चित्रपट निर्माते महर्षिच नव्हेत तर काय ?

बाबूरावांच्या मोठेपणांतील मोठ्यांत मोठा पैलू म्हणजे, बाबूरावांना कोणी मराठी चित्रपटाचे युगप्रवर्तक मानोत, कोणी कलामहर्षि म्हणोत, तर कोणी चित्रकार म्हणून नांवाजोत अथवा शिल्पकार समजोत, या विविध कलाक्षेत्रांतील स्वतःचे वाजवी स्थान बाबूराव पुरतेपणीं जाणून होते. सवंग स्तुतीच्या आहारीं न जातां अगर उलट प्रखर टीकेला अथवा खडतर अडचणींना न जुमानतां ज्यांनीं आपली जीवितयात्रा कलोपासनेंत संपविली ते थोर बहुगुणसंपन्न, अन् लोकप्रिय बाबूराव कोणाच्या स्मृतींतून नष्ट होतील ? अन् मरणोत्तर जिवंतपणा याहून वेगळा तो कोणता ?

## १५. ग. ना. जाधव, जी. डी. आर्ट.

[ सुप्रसिद्ध चित्रकार, बाबूरावांचे शिष्य. ]

शनिवारी ता. १६–१–५४ सकाळचीच वेळ. नेहमींप्रमाणें ऑफिसला येऊन कामाला सुरवात होती न होती इतक्यांत कुणाच्याहि ध्यानीमनी नसता आमच्या एका स्नेह्यानी एक दुःखदवार्ता सांगितली, आणि पांच मिनीटें काय बोलावें कुणालाच कांहीं कळेना. जे महाराष्ट्रांत आदर्श व्यक्ति ठरले, ज्यांच्यामुळें चित्रपट सृष्टीलाच नव्हे तर अनेक कलाना चालना मिळाली, ज्यांचे शिष्य सर्व महाराष्ट्रभर पसरले, अशी ती थोर व्यक्ति–म्हणजेच कलामहर्षी गुरुवर्य बाबुराव पेंटर–यांच्या मृत्यूची ती दुःखद वार्ता होती.

१९३६–३७ साल असेल. बाबुरावांच्या घरीं मी माझी चित्रें दाखवायला गेलो होतो. मी मनांतून अतिशय घाबरून गेलो होतो. एवढ्या मोठ्या व्यक्तीला आपण भेटायचें ते आपल्याशी बोलतील कां ? कलावंत लहरी असतात अशी तेव्हां माझी समज. पण मी जेव्हां गेलों आणि माझीं चित्रें त्यांना दाखवली तेव्हां ते फार खूष झाले. मी तेव्हां फार लहान होतो. यामुळें त्यांनीं माझे कौतुक केले. नंतर कुठें शिकता वगैरे चौकशी केली. तेव्हां मी गुरूवर्य बाबा गजबर व वडणगेकर यांच्याकडे

शिकत होतो. परंतु थोडे दिवस आपल्याकडे शिकायला मिळेल कां, असे मी भितभीतच विचारले मात्र, त्यांनीं लगेच माझा कांहीं क्लास नाहीं, पण बाकीचीं मुलें कांहीं प्रॅक्टीस करत बसतात तूंहि येत जा म्हणून त्यांनीं मला सांगितलें. तेव्हांचा माझा आनंद काय विचारावा. अशा थोर कलावंताच्या हाताखालीं चार धडे घेतां आले तो खरोखरच भाग्याचा क्षण अशी माझी कल्पना झाली. आणि त्याच आनंदांत मी घरीं आलों आणि घरीं सर्वांना



श्री. ग. ना. जाधव

ती बातमी सांगितली व मला लगेच चित्रकलेचे साहित्यही घरच्या लोकांनीं भरपूर दिलें. दुसऱ्या दिवसापासून मी माझ्या साहित्या-निशीं गुरु. बाबूराव पेंटर यांचें घरीं गेलों. माझ्या खऱ्या चित्र-कलेला सुरवात तिथेंच झाली. कारण त्यांच्या घरीं त्यांच्या स्वतःचे चित्रासाठीं म्हणून शामाबाई नांवाची प्रौढ बाई मॉडेल म्हणून होती. ती तीन ते पांच दोन तास येत असे. त्यावेळीं बाबू-

रावांचे राधाकृष्णाच्या चित्राचें ऑईलपेंट कॉंपोझिशन चालू होते. त्यासाठीं ते स्वत: पोझेस देऊन स्केचीस करत असत. त्यावेळीं मी, कै. जी. आर. मेस्त्री, श्री. श्रीकांत सुतार वगैरे आम्ही त्या मॉडलवरून स्केचीस करीत असूं. गुरुजींना दाखवत असूं किंवा ते स्वतःच खालीं येऊन पाहून जात असत. कांहीं दुरूस्त्या सुचवत असत. असे हे काम माझें वर्ष दोन वर्षें झालें. माझ्या आयुष्यांतली खरी प्रॅक्टीस एवढीच. पुढें मी जेव्हां भाई माधवराव बागलांच्या सांगण्यावरून किर्लोस्करवाडीस आलों, तेव्हां गुरुवर्य शं. वा. किर्लोस्करना बाबुराव पेंटरांच्या घरीं केलेलीं प्रॅक्टीस चित्रें दाखवली. तेव्हां शं. वा. किर्लोस्कर थोडावेळ माझ्याकडेच पहात राहिले. हा पोऱ्या तर एवढासा दिसतो. "ही चित्रें तुमचीच कां?" म्हणून त्यांनीं मला विचारले, आणि जेव्हां श. वा. कि. ना एक स्केच तिथला तिथें करून दाखवले तेव्हां त्यांची खात्री झाली. आणि लगेच शं. वा. कि.नी मला सर्व्हिसला येण्याबद्दल सांगितलें.

तेव्हां माझ्यापुढें एक मोठा पेंच निर्माण झाला होता. कारण कधीं आणि कुणालाहि कितीहि पैसे दिले तरी न मिळणारे शिष्यत्व मिळाले होते. आणि माझे प्रॅक्टीसहि बरे चालले होते. किर्लोस्कर मासिकाकडे सर्व्हिसला यायला नाराज होतो. पण भाई बागलांच्या आग्रहास्तव थोड्या दिवसाकरतां आलो. आज एक तप होऊन गेले.

मी सर्व्हिसला लागल्यापासून कधीं मी कोल्हापूरला घरीं म्हणून गेलो कीं नेहमी मीं बाबूरावांना भेटत असे. परंतु स्वारी कधीं रिकामी दिसायची नाहीं. त्यांचे वय साठाच्या पुढचे जरी असले तरी माझ्या तरी आठवणींत ते दुपारी कधीं झोपलेत आणि मग या असा प्रसंग आला नाहीं. नेहमी त्यांच्या हातीं ब्रश किंवा एखादे पुतळ्याचें काम असायचेच. मध्यंतरी मी असाच दिवाळी अंकासाठी चित्र तयार करून आणण्यासाठीं गेलो होतो तेव्हां त्यांचें पुतळ्याचें काम चालू होतें. भट्टी पेटली होती. त्यावेळीं छोट्याशा कारखान्याचेंच दृष्य दिसत होते. त्यांच्या घाईत माझीहि

दिवाळी अंकाची घाई सांगताच "अरे आतां इतक्या लवकर कसें होणार?" म्हणून मग मलाच त्यांनीं एका लहान फोटोवरून आऊट-लाईन करायला सांगितली. मी स्केल मारून आराखडा झटपट करून दिला. त्यांनीं पेंटींगला सुरवात केली. ते चित्र रंगविण्यांत अगदी तल्लीन होऊन गेले होते. मी पहाण्यांत गर्क झालों होतों. इतक्यांत खालून शाम धावतच आला नी म्हणाला, "आबा! आबा!! भट्टी फुटली! रस बाहेर यायला लागलाय!" रंगसाहित्य तसेंच टाकलें आणि आम्ही सर्वजण धावत खालीं आलों पहातों तों भट्टी फुटून रस बाहेर येत होता. रणरण पेटलेली भट्टी आणि रसाच्या ठिणग्या पाहून आम्हीसुद्धां घाबरून गेलो होतो. परंतु महर्षींच ते. तशाहि संकटांत कशाचीच तमा न बाळगतां स्वतः चिखल घेऊन भट्टीला पडलेली भोकें ते बुजवूं लागले. आणि मग सर्वांनींच हातभार लावून त्या भट्टीला आम्ही सर्वांनींच वांचवले. नाहींतर मोठा कठीण प्रसंग होता. अनेक स्नेह्यांनी म्हणावें, "हें तुम्ही कशाला भट्टीच्या नि रसाच्या मागे लागताय? कॉंट्रक्ट देऊन करून घ्यावें." पण ते म्हणत असत, "आम्हांला कां जमूं नये?" अशी कामें ते अति-शय चिकाटीनें करत असत. स्वतः करण्याची शिकण्याची प्रवृत्ती मोठी. आणि म्हणूनच कला महर्षी म्हणून त्यांना आज सबध महा-राष्ट्र ओळखतो आहे.

बाबुराव पेंटर मध्यंतरी भयंकर अशा आजारांतून उठले. तेव्हां ते ह्या आजारांतून वाचतील असें कुणालाच वाटलें नव्हतें. परंतु सुदैवानें त्यांच्या डोळ्यावर आणि बोलण्यांत थोडा दोष राहून तो आजार गेला. थोडें बरें वाटूं लागल्यानंतर मी असाच दिवाळी अंकांसाठीं चित्र आणायला गेलों होतों. परंतु त्यांच्या संग्रहीं तसलें चित्र नव्हतें आणि करून द्या म्हणणेसुद्धां योग्य वाटेना. परंतु उजवं कोपर गुडघ्यावर आणि डाव्या हातानें उजवा हात धरून कसेतरी चित्र त्यांनीं पुरे करून दिले. ते निरांजन घेतलेल्या बाईचें होतें. आजारपणांतसुद्धां त्यांनीं ब्रश सोडला नाहीं. इतके ते त्यांत रमून गेले होते.

बाबुरावांच्या पेंटिंगबद्दल थोडक्यांत एवढेच म्हणता येईल कीं पै. अबदुल करीम खासाहेबांनीं जसा गाण्यांत सुरेल गायक म्हणून बहुमान मिळविला तसाच बाबुरावांचा हात म्हणजे चित्रकलेंतील खांसाहेबच वाटत होते. मग ते पेन्सिलस्केच करूं देत अगर ऑईलपेंट करूं देत. त्यामधें इतका गोडवा असायचा कीं तसा गोडवा इतरांच्या चित्रांत क्वचितच दिसून येतो.

त्यांच्या चित्रपटांबद्दल बोलायचें झालें तर त्यांची निरीक्षण शक्ती अजब होती. त्यांना वेळ लागे. कारण त्यांना एखादा शॉट पसंत पडेपर्यंत करत रहातील. 'उषा' चित्रपटाचे शूटिंग चालू होते. अनेक वेळा बदलून एक एक शॉट पुरा होत होता. आणि जेव्हां ते चित्र बाहेर पडले तेव्हां त्यांच्या कलेची सर्वांनाच कल्पना आली. आणि मला वाटतें त्या सालचे उत्कृष्ट पिक्चर म्हणून उषा पिक्चर-लाच मान मिळाला होता. त्यानंतर 'सावकारी पाश' हेंही फार गाजले. आणि त्याहीनंतरचें 'प्रतिभा' हें चित्रहि कलापूर्ण होते. खरोखर बाबुरावांचीच त्यांत खरी 'प्रतिभा' दिसते. मला ठाऊक आहे कीं त्यांत दुर्गा खोटेना जी ड्रेपरी दिली आहे त्यांत साधेपणा कलात्मक नेसणं व पौराणिक काळ, सर्वांचा भास होत होता. जेव्हां कवीची बायको, मुलें राजवाड्यांत येतात तेव्हां कवीची बायको व मुलगा गोंधळून जातो. चालतांना सुद्धां कवीची बायको किती बिचकली, गोंधळली हें ज्यांनीं ज्यांनीं तो चित्रपट पाहिला असेल त्यांनाच ठाऊक ! असे उत्कृष्ट चित्रपट अलिकडे निघालेच नाहींत !

एके दिवशीं गणपतराव वडणेगकरांच्या घरांतून असेंच आम्ही बाहेर पडलो तेवढ्यांत एक शेणवाली बाई काखेंत मूल घेऊन कोणी शेणाची पाटी उचलून डोईवर देतय कां वाट पहात होती. तसल्या भिकार बाईला कोण मदत करणार ? शेवटीं हेच महर्षी पुढें होऊन त्यांनीं त्या बाईच्या डोकीवर ती बुट्टी ठेवली. तेव्हां त्यांच्याकडे लोक पहातच राहिले. त्यांचे हे गुणहि घेण्यासारखे नव्हेत कां ? त्यांचे हृदय मानवतावादी कलावंताचे होते ते या प्रसंगावरूनच समजले.

अलिकडेच म्हणजे चार सहा महिन्यापूर्वीच ते किर्लोस्करवाडीस भेट देऊन गेले. मी त्यांना सहज घरीं जेवायलाच या म्हटलें नी ते आलेहि होते. मनमोकळेपणाने आम्ही बोलत बसलो. मला पोर्ट्रेट करून दाखवतो म्हणाले होते. परंतु त्यांना घरीं यायल संध्याकाळ झाल्यामुळें ते कांहीं जमले नाही. असेच ते कॉटवर वाचत पडले होते. जेवणास थोडा अवकाश होता. त्यांना नकळत मी त्यांचे पंधरा एक मिनिटांत वॉटर कलर स्केच करून दाखवले. ते अतिखुश झाले व बराच वेळ पहात राहिले. [ हेंच तीन रंगी चित्र या आठ-वर्णीच्या मुखपृष्ठावर छापलें आहे. ] त्यानंतर जी त्यांची माझी भेट नाही. ती नाहीच !

कोणी म्हणत कोल्हापूर हे कलापूर आहे. हे कोणीहि कबूल करील पण त्याच कलापुरांत अनेक कलावंत विस्मृतींत बुडून जातात हेहि खरेच होय. बाबुराव पेंटर असताना आर्टस्कूल स्थापन होण्याच्या बातम्या ऐकूं येत होत्या. ज्यांच्या वास्तव्याने कोल्हापूरचे कलापूर हें नांव अमर झाले त्या पेंटर अबालाल रहिमान व कै. बाबूराव यांची स्मारके तर व्हावीतच, आर्ट गॅलरी प्रदर्शनेहि व्हावीच, पण आर्टस्कूलची जी गुरुवर्य बाबुरावांची इच्छा होती ती जर पुरी झाली तर त्यांच्या आत्म्याला शांति मिळेल.

## १६. श्री. शामराव लोहार, गारगोटी

सकाळपासून औदासिन्याची दाट छाया माझ्या मनावर पसरली होती. थोडासा विरंगुळा मिळावा म्हणून स्केचबुक घेऊन बाहेर पडलों. आणि अगदीं अनपेक्षितपणें मला ऐकायला मिळालं— ‘ बाबूराव पेंटर वारले ! ’ मी ऐकतांक्षणींच सुन्न होऊन गेलों, माझा त्या बातमीवर विश्वाससुद्धां बसेना. पण पत्राच मिळालं तेव्हां विश्वास ठेवल्यावांचून गत्यंतरच नव्हतं.

मी लागलीच कोल्हापुरास जावयास निघालों. पण मनांत काहूर माजलं होतं. ती- आबांच्या सहवासांत सात वर्षं राहण्याचं भाग्य माझ्या वाट्याला आलं होतं. त्यांच्या अनेक स्मृतींनीं माझ्या मनांत

गर्दी केली.

अगदीं अलीकडची आठवण—

घराशेजारींच एका छपराखालीं लहानशा जागेंत पुतळ्यांचं काम चालायचं. आम्हीं इथंच ओतकाम करीत असूं. त्यावेळीं कोळशावर रस करावा लागायचा. या कामांत आमचे खुप हाल व्हायचे. अंग भाजून निघत असे, म्हणून अंगाला किनतानाच्या पट्ट्या भिजवून बांधायच्या आणि एकानं पंपानं त्यावर पाणी मारायचं, तरीसुध्दां तोंडाचे पळके जायची पाळी यायची. आबांना आमचे हाल पाहवेनात, म्हणून लागलीच मुंबईहून साहित्य आणून दुसऱ्या जागेंत व्यवस्थित वर्कशॉप बनविला. आतां त्यांत चार माणसे १००० पौंडाचा रस सहजतेनें ओतूं शकतात. कोल्हापुरांत दुसरीकडे कोठें अशी व्यवस्था नाहीं...

म. गांधींच्या पुतळ्याचं काम ५ वर्षे चाललें होतें. त्याबद्दल वर्तमानपत्रांतून ओरडसुध्दां झाली. त्यावेळीं आबांना आम्हीं म्हणालों होतो कीं आपल्या अडचणी जाहीर करूंया. पण त्यांनीं नकार दिला. ते म्हणाले—" आपण पुतळा आधी तयार करूंया, मग वाटले तर त्याबद्दल लिहूं."

हें काम चालूं असतांना एक दिवस एक गृहस्थ आबांच्याकडे आले होते. ते म्हणाले, " कशाला हें काम घेतलंत ? तुमचं खुप नुकसान झालं आहे यांत ? " आबांनीं हंसत हंसत उत्तर दिलं, " इतके पैसे खर्च करून शिकायच म्हटलं तरी जमलं नसतं. मला यांत खुप शिकायला मिळालं आहे."

म. गांधींच्या पुतळ्याचं काम तर आबा अविश्रांतपणें पहाटेपासून रात्रीपर्यंत सारखे करीत रहायचे. आम्हीं म्हणत असूं— " आतां मेणाचं मॉडेल छान झालंय. ओतून टाकूंया." पण त्यांचं समाधान कधीं झालं नाहीं. ते सांगायचे—" तुमचं बाकीचं काम संपू दे. मी वाटेल त्यावेळीं मॉडेल तयार करून देईन." या कामासाठीं गांधीजींचे फोटोही खूप जमवले होते. पण एकाचवेळीं निरनिराळ्या बाजूंनीं घेतलेले फोटो मिळालेले नव्हते. म्हणून कोणीतरी

म्हटलं कीं गांधीजींच्या निकट सान्निध्यांत असणाऱ्या माणसाला मॉडेल दाखवावं, पण आबा तर गांधीजींशीं समरस होऊन गेले होते. ते म्हणाले, " माझ्याइतकं गांधींच्याजवळ कोणीच गेलं नसेल."

पुतळ्याचं काम अनेक वेळां बिघडायचं आणि नुकसानहि खूप व्हायचं, पण आबा कधीं हळहळले नाहींत किंवा आमच्यावर रागावले नाहींत. आम्हीं मात्र अनेक वेळां कंटाळून जात असूं, पण त्यांचा अदम्य उत्साह पाहिला कीं मान शरमेनं खाली जायची आणि नकळत भक्तिभावानें माझे हात जोडले जायचे.

आबा एकदां पुण्याला गेले होते. तेथें एका स्टूडिओच्या भागिदारांत भांडणें चाललीं होतीं. वास्तविक प्रत्येकानें खूप पैसा मिळविला होता, पण तरीहि त्यांची ओरड चालूंच होती. आबांना हें आवडलं नाहीं. ते चटकन् उद्‌गारले, " या लोकांना समाधान मिळायचं तरी केव्हां ? "

आबांनीं एका चित्रकाराच्या ऐतिहासिक चित्रावरून कल्पना घेऊन एक चित्र तयार केलें. ते चित्रकार आबांना म्हणाले, " माझ्या मूळच्या चित्राचा उल्लेख करा." पण आबांनीं त्यांना सांगितलें--" त्याला तुमचेंच नांव देऊं या म्हणजे झालं. " आपल्या चित्रावर आपलं नांव पाहिजेच असा आबांचा कधीं अट्टाहास नव्हता.

आबांच्याकडे एक हिऱ्याची आंगठी होती. पण त्यांना त्यांतला हिरा केव्हां पडून गेला माहीतही नव्हतं. मी एक दिवस त्यांना विचारलें, " आबा आंगठींतला हिरा काय झाला ? " ते म्हणाले, " अरे, सकाळीं तर होता. पडला होय ? तो आपला नव्हताच मग ! " त्यांनीं स्वतःच्या नुकसानीबद्दल कधींही फिकीर केली नाहीं. त्यांना मी एकदांच हळहळतांना पाहिले. प्रभाकर स्टुडिओ जळला त्या वेळीं त्यांना अतिशय दुःख झालें. ते म्हणाले,' कोल्हापुरांत एकच स्टुडिओ होता. लोकांना कांहीं काम पहायला तरी मिळे. पण आतां काय पहाणार ? त्यांत लोकांचंच नुकसान झालं आहे. लोक अगदीं मूर्ख आहेत !'

## १७. कु. स्नेहा, मुंबई

[ बाबुरावांना चित्रासाठीं "बैठक" देणाऱ्या एक पदवीधर विदुषी. ]

माझ्या एका चित्रकार मित्रानें मला निरोप सांगितला बाबुराव पेंटरांना तुम्हांला भेटायचं आहे. बाबुरावांच्या कन्या माझ्या विद्यार्थिनी असल्यानें मला वाटलं पालक या नात्यानें बाबुरावांना कांहीं सुचना द्यावयाच्या असतील. परंतु जेव्हां बाबुराव म्हणाले, "मला तुमचं पोर्ट्रेट काढायचं आहे" तेव्हां थक्क होऊन मी विचारलं, "माझं चित्र काढणार तुम्ही ?" सौंदर्याबद्दल भलत्याच कल्पना करून घेण्याची संधी मला न देतां बाबुरावांनीं लगेच सांगितलं, "आम्हांला वेगवेगळ्या क्षेत्रांतल्या स्त्रियाचं व्यक्तीत्व चित्रित करायची कितीहि हौस असली तरी मॉडेल म्हणून चित्रकारापुढें बसणं आपल्या स्त्रिया फार कमीपणाचं समजतात. म्हणून मिळतील तीं मॉडेल्स घेऊन चित्रकारांना काम करावं लागतं. तुम्हांला जर ही कल्पना पसंत असली तर ह्या रविवारीच आपण कामाला सुरवात करूं" बाबुरावांनीं आपला बेत बदलायला उगच जास्त अवधी द्यायला नको म्हणून मी घाईनें म्हटलं, "शनिवारी मी दुपारी रिकामी असतें तेव्हां शनिवारपासूनच मी यायला तयार आहे." बाबूरावांनीं म्हटलं, "ठीक आहे. मी वाट पाहीन तुमची. पण हें पहा तुम्ही नेहमीं जशा असता तशाच या. आणि लिपस्टीक वगैरेची रंगरंगोटी तर मुळींच करून येऊं नका. मला फार तिटकारा आहे ह्या कृत्रिम रंगसफेतीचा. आपली मूळ कातडी जशी नितळ आणि चमकदार असते तशीच चित्रांत आली पाहिजे" झालं ! मला बाबुराव कुंचल्याच्या साह्यानें तरी सुंदर करतील अशी आशा होती तीहि नष्ट झाली. नेहमींचाच 'अवतार' कायमचा चित्रित होऊन बसणार म्हणायचा.

जवळ जवळ तीन महिने सुट्टीच्या दिवशीं मी बाबुरावांच्याकडे जात होते. पहिल्यांदा मला तोंड बंद करून स्वस्थ बसणं अतिशय जड गेलं ! परंतु हलकें हलकें तें तसं बसणं म्हणजेच एक तऱ्हेची

विश्रांति (Relaxation) आहे हें माझ्या ध्यानांत यायला लागलं. बाबुराव अत्यंत रसाळ गप्पा मारूं शकतात ह्यावर माझा एरव्हीं कधींहि विश्वास बसला नसता. कोणत्याहि व्यक्तीबद्दल अजिबात कडवटपणा न धरतां कितीतरी मनोरंजक हकिकती ते सांगत सूक्ष्म निरीक्षणाची जेव्हां आवश्यकता असेल व मी अगदीं हालचाल करूं नये अशी त्यांची इच्छा असे तेव्हां हळूंहळूं त्यांचा आवाज मंदावे. आमच्या संभाषणाचा ओघही कुठेंच खटका न येतां स्वाभाविकरित्या थांबत असे. त्या शांततेतही चित्रकार व चित्रविषय यांत किती गाढ संवादित्व निर्माण होतं! मला तरी हा अनुभव आला. आम्हां दोघांच्या व्यक्तित्वानें रंगछटांचें अगदीं सूक्ष्म तरल असें स्वरूप घेतलें आहेसें मला वाटे. जेव्हां बाबूराव म्हणत, "झालं आजचं काम" तेव्हां मी एकदम भानावर येत असे.

मला आठवतंय एकादे वेळीं त्यांचे कुणी तरी शिष्य तेथें येत, व गांवांतल्या इतर चित्रसंस्थेबद्दल कसला तरी काथ्याकूट होई. बाबूरावांनीही त्यांत भाग घ्यावा अशी त्यांची अपेक्षा असे. चर्चा अगदीं ऐन रंगांत येई आणि बाबुराव एकदम म्हणत "गप्प बस रे. काय वचवच चालवली आहे." मी पाहिलं व्यक्तिगत हेवेदावे, मत्सर ह्यांची बाबुरावांना विलक्षण घृणा होती. अशा वेळीं ते आपल्या शिष्यांना म्हणत "ती संस्था करतेय ना कांहीं तरी, मग तुमचं काय जातंय त्यांत. त्यापेक्षां चार कुंचले फिरवा ना तुम्ही." गांवांतले एक खानदानी रसिक गृहस्थ नेहमीं बाबूरावांकडे बसलेले असत. त्या गृहस्थांनीं नुकतंच एका डच चित्रकाराचं "Lust for Life" हें चरित्र वाचलेलं होतं. ते गृहस्थ आले कीं बाबूराव म्हणत "हं सांगा त्यांतला एकादा प्रसंग" अन् मग एका थोर चित्रकाराची अद्भुत कहाणी ऐकतां ऐकतां बाबूरावांचा कुंचला काम करूं लागे.

माझ्या पुऱ्या झालेल्या चित्राकडे पहातांना नेहमीं माझ्या मनांत येतें कीं बाबुरावांना मी एका शब्दानेंही कधीं सांगितलं नसतां

कु. स्नेहा



जेव्हां " सिंहगड " गाजत होता तेव्हांचे बाबूराव.
लक्ष्मणराव किर्लोस्करांसमवेत

माझं चित्र काढतांना मी ज्या एका विशिष्ट परिस्थितींतून जात होतें त्यावेळचे माझे मनोविकार त्यांना माझ्या डोळ्यांत कसे व्यक्त करतां आले ? अपत्यवत् संगोपन केलेल्या संस्थेला सोडून जातांना मला होणाऱ्या वेदना व त्याच वेळीं भविष्याकडे आशावादीपणानें पाहण्याची माझी नेहमींची आशावादी मनोवृत्ती ह्यांचा सुंदर मिलाफ बाबुरावांनीं माझ्या डोळ्यांत केला आहे. बाबुरावांनीं मला वेगळंच सौंदर्य दिलं तें हें असं.

## १८. श्री. ना. धों. ताम्हणकर

[ मराठी वाचकांचे आवडते विनोदी लेखक. ]

गेल्या २०–२१ वर्षांत कै. बाबूराव पेंटर यांच्या भेटीचे सुयोग मला पुष्कळच लाभलेले आहेत. किर्लोस्कर मासिकांच्या कामानिमित्त मला बरेचदां कोल्हापुरास जावें लागे आणि अशा भेटींत श्री. बाबुराव यांना भेटणें हे एक काम असायचेच. कारण त्यांना शंकरराव किर्लोस्कर यांचा कांहीं निरोप पोचवावयाचा असावयाचा.

श्री. बाबूरावांच्याकडे केव्हांही गेलें तरी ते रिकामे बसलेले केव्हांही दिसावयाचे नाहींत. एकादे चित्र रेखीत किंवा कोरीत बसले असतांना त्यांचें बोलणें चालावयाचें. एकदोनदां मोटारचें एंजिन खोलून त्यांत कांहीं तरी ठोकाठोकी करीत असलेले बाबुराव मी पाहिले आहेत.

अधून मधून ते किर्लोस्करवाडीसही येत. ते शंकररावांच्याकडे म्हणून येत असले तरी श्री. अनंतराव फळणीकर यांच्या यंत्र शाळेंतच त्यांचा अधिक वेळ जाई. अनंतरावांचें आणि त्यांचे शंकररावांपेक्षांही अधिक रहस्य जमे असें मला वाटे. श्री. अनंतराव फळणीकर हे परीचित मंडळींत अत्यंत सलगीनें वागतात. त्यावेळीं त्यांची विनोद बुद्धीही जागृत होते. बाबूराव अकस्मिक आलेले पाहून एकदां अनंतरावांनीं म्हटले "अरे, दाढी केव्हां आली ?" त्यावर बाबूराव हंसत आपल्या जड व मंद आवाजांत उत्तरले, "कोल्हापुरला वारं फार सुटलं आणि आली उडत इकडं."

कारखान्याची सुटी झाल्यावर शंकरराव, अनंतराव, गणपतराव विजापुरे आदिकरून मंडळींची गप्पांची मैफल जमे. त्यांत अनंतराव आणि बाबूराव यांचे कांहीं तरी गमतीचे सवाल जबाब चालत. त्याचे आम्हांलाही हंसू येई. पण हंसण्याचा खरा कडेलोट होई तो गणपतराव विजापुऱ्यांचा. गणपतराव हंसण्यांत मोठे बहाद्दर आहेत. एकदां ते हंसूं लागले कीं घटका घटका त्यांना हंसे आवरतां येत नाहीं. एकदां तर बाबूरावांच्या एका उत्तरानें गणपतरावांच्या हंशाला इतका जोर चढला कीं त्यांच्या डोळ्यांतून पाणी टिबकूं लागले. बाबुरावांचे नुसतें दर्शनही गणपतरावांना हंसायला पुरेसें होई. बाबुरावांनीं " काय गणपतराव ! " येवढें म्हटलें कीं गणपतराव हंसूं लागायचेच. बाबुरावांच्या शब्दांपेक्षां गणपतरावांचें हंसणेंच माझ्या अधिक लक्षांत राहिलें आहे.

बाबूराव हे कलावंत खरे, पण त्यांना कामाची निकड कधीं लागायची नाहीं. किर्लोस्कर मासिकाच्या कव्हरसाठीं त्यांनीं चित्र द्यायचें कबुल केलें असलें आणि अमूक दिवशीं ते द्यायची त्यांना सूचना केलेली असली तरी बाबूरावांकडून तें येईल अशी शंकररावांना कधींही खात्री बाळगतां येत नसे. त्यासाठीं मला किंवा यांना एकदोन कोल्हापुरचे हेलपाटे घालावे लागत असत. चित्र आणायला म्हणून त्यांच्याकडे गेल्यावर त्यांनीं चित्राचें स्केचही केलेलें नसें. " अरेच्या चित्राचें विसरलें कीं " असें ते म्हणत आणि मग त्याच्या तयारीस लागत. कामाला सुरवात केल्यावर मात्र त्यांना चित्र पुरे करण्यास वेळ लागत नसे. एकदां तर दुपारीं सुरू केलेलें चित्र संध्याकाळपर्यंत पुरे करून त्यांनीं रात्रीच्या गाडीनें आपल्या माणसांबरोबर किर्लोस्करवाडीस पाठविलें. कारण दुसरें दिवशीं सकाळीं चित्र आमच्या हातीं यावयास पाहिजे होते.

बाबूराव हे कलावन्त असल्यानें सुंदर वस्तु व देखणी माणसें पाहाण्याचा त्यांना इव्यास असे. दुर्मुखलेल्या चर्येची माणसें पाहून त्यांना तिटकारा येई. एकदां एका समारंभाच्या वेळीं तिथें उपस्थित असलेल्या कांहीं व्यक्तींकडे बोट दाखवून बाबूराव म्हणाले,

" गणपतराव, आतां एक कायदा करायला पाहिजे बुवा. ज्यांना समारंभाला बोलवायचं त्यांच्याकडून प्रथम फोटो मागविले पाहिजेत. फोटो पाहिल्यावाचून निमंत्रण पत्रिका पाठवावयाची नाहीं. समारंभांवर असले छाप पडले कीं त्यांची सगळी कळा जाते."

बाबुरावांना केवळ गोरे आणि हंसरे चेहरेच पाहिजे असत असें नाहीं. आमच्या दृष्टीनें ओबडधोबड वाटणाऱ्या माणसांतही त्यांच्या कलादृष्टीला सौंदर्याचा शोध लागे. आमच्या प्रेसमधील एका काळ्यासावळ्या निबर माणसास पाहून ते एकदां म्हणाले " या माणसाचा चेहरा पुतळा करायला छान आहे. त्याचे अँगल्स उठावदार आहेत."

बाबुरावांची आणि माझी शेवटची भेट ४–५ महिन्यांपूर्वी मुंबईस झाली आणि त्यांच्या स्नेहबुद्धीचा प्रत्यय आला. गेल्या दिवाळीच्या सुमारास मी औषधोपचारासाठीं कांहीं दिवस मुंबईस राहिलों होतों. बाबूरावांचें 'विश्वामित्र' चित्रपटाचें काम त्यावेळीं संपत आलें होतें. त्यांना मी मुंबईस आल्याचें कळलें व श्री. शिवरामबापू वाशीकर यांना घेऊन ते माझ्या बिऱ्हाडी आले. " कसा काय झाला विश्वामित्र" असें मी त्यांना विचारले तेव्हां ते स्मितपूर्वक म्हणाले, " अहो मला तो उत्तम वाटतोय पण लोकांनीं त्याला उत्तम म्हटलं पाहिजे ना ? आणखी आठ दिवसांनीं ठरेल तो रद्दी की उत्तम ते." चित्रपटासंबंधींची लोकांची आजची अभिरुची बदलून कलापूर्ण चित्रपट पाहण्याची आवड लोकांत उत्पन्न करण्यासाठीं कांहीं चित्रपट खर्ची पडायलाच पाहिजेत असेंही ते म्हणाले.

## १९. श्री. गणपतराव वडणगेकर

[ कुशल चित्रकार, बाबूरावांचे शिष्य. ]

गुरुवर्य बाबुराव पेन्टर सरस्वतीचे चित्र रंगवीत होते. मी जवळच पहात बसलों होतो. सरस्वतीच्या चेहऱ्यावरील गोड भाव रंगविण्यांत ते दंग झाले होते. ब्रश हलुवार हातानें फिरत होता, व

तो तसा फिरत असतांना सुद्धां अतोनात काळजी घेतली जात होती. ब्रशाची हालचाल सावकाशपणें चालली होती. त्यांत कुठल्याही प्रकारची धांदल किंवा गडबड नव्हती. अव्यवस्थितपणाही नव्हता. प्रत्येक ब्रश समजून व काळजीपूर्वक ओढला जात होता. त्यांच्या त्या ब्रशाच्या हालचालींतसुद्धां विलक्षण आकर्षकता होती. एक प्रकारचा गोडवा होता, पहात रहावें असे वाटत होते.

सरस्वतीचा चेहरा सुंदर होत चालला, व तो उठावदारही दिसूं लागला. रंगांच्या अनेक सूक्ष्म व मोहक छटा त्या चेहऱ्यावर दिसूं लागल्या. प्रत्येक ब्रशाबरोबर सरस्वतीच्या चेहऱ्यावर नवीन नवीन भाव निर्माण होत आहेत असे वाटूं लागलें, चेहऱ्याचें सौंदर्य सारखें वाढत चाललें. आणि सौंदर्य जसजसें वाढूं लागलें तसा मीही तें चित्र पहाण्यांत दंग होऊन गेलों. गुरुवर्य बाबूराव तर त्या चित्रांत अगदीं तन्मय होऊन गेले होते कोण आलं कोण गेलं याची त्यांना दाद नव्हती. जवळपास कोण आहे, याची त्यांना जाणीव नव्हती. इतकेंच नव्हे तर स्वतःसंबंधींही त्यांना जाणीव असेल असें वाटत नव्हतें. ते स्वतःलाही पूर्ण विसरून गेले होते.

कांहीं वेळानें ते चित्रापुढून थोडे बाजूला झाले. जवळच्या बैठ्या टेबलावर असलेल्या सिगारेट केसमधून सिगारेट काढली. नेहमींप्रमाणेंच ती लायटरनें पेटविली, व तोंडाला लावली. पण हें करीत असतां त्यांचं चित्त तिकडे आहे असें मुळींच वाटत नव्हतें. एखाद्या मशीनप्रमाणें हातांकडून ही गोष्ट घडली होती, व मशीन प्रमाणें तोंड आपलं सिगारेट ओढण्याचं काम करीत होतें. त्यांचं चित्त यापैकीं कुठल्याही गोष्टीकडे नाहीं, हें त्यांच्या नजरेवरून दिसत होतं. त्यांचं लक्ष त्या सरस्वतीच्या चित्राकडे लागले होतें.

सरस्वतीच्या चित्राकडे ते सारखे पहात होते. त्या चित्राचें ठिकाणींच त्याचं सारं लक्ष केंद्रित झालें होतें. चित्राकडे पाहून जें मनांत येत होते त्याचा विचार चालू होता. सरस्वतीच्या चेहऱ्यावरील भाव, चेहऱ्याचा रंग, सौंदर्य, नाका तोंडाची ठेवण, दृष्टी, या संबंधींच्या विचारांचा संघर्ष त्यांच्या मनांत चालू असावा, असें

त्यांच्या चेहेऱ्याकडे पाहिलें कीं वाटल्याशिवाय रहात नव्हतें.

त्यांच्या मनानें कांहीं तरी निश्चित निर्णय घेतला, व ते पुन्हां पेंटिंग करणेस बसले. ब्रश घेऊन ते रंगविण्यास सुरवात करणार इतक्यांत त्यांना कसली तरी आठवण झाली, व ते इकडे तिकडे पाहूं लागले, जवळपास पाहिले. टेबलावर पाहिले. मांडीवर कुठें आहे कीं काय तें पाहिलें. परंतु इच्छित वस्तू त्यांना सांपडल्याचें दिसेना. मला रहावेना म्हणून मी त्यांना विचारलें.

तुम्हांला काय पाहिजे ?

ते म्हणाले–चष्मा कुठें ठेवला तो सांपडेचना !

मी म्हणालो–तो तर तुमच्या डोळ्यांलाच आहे !

त्यांचा हात सहाजिकच झटदिशीं डोळ्यांकडे गेला व अरे होय कीं, असें म्हणून ते थोडेसें हंसले व पुन्हां आपल्या कामाला लागले.

गुरुवर्य बाबूराव पेन्टर चित्र रंगविण्यांत इतके तन्मय होऊन गेले होते कीं, स्वत:च्या डोळ्यांला असलेला चष्माही त्यांना दिसत नव्हता.

कै. गुरुवर्य बाबूराव पेन्टर हे हातांत असलेल्या कुठल्याही कामांत असेच तन्मय होऊन जात. हा त्यांच्या ठिकाणीं खरोखरीच असामान्य असा गुण होता. या गुणामुळेंच त्यांनीं जें जें हातीं घेतलें तें तें यशस्वी करून दाखविलें. चित्रकला, सिनेमा, मशिनरी वगैरे निरनिराळ्या क्षेत्रांत त्यांनीं आपली जी चमक दाखविली, त्याला मुख्यत: हाच त्यांचा असामान्य गुण कारणीभूत आहे असें म्हणण्यास कांहीं हरकत नाहीं. त्यांच्या मोठेपणाला जे अनेक पैलू आहेत त्यांना कारणीभूत होणाऱ्या गुणांत हा गुणच आपणास महत्वाचा समजावा लागेल.

## २०. श्री. बाबा पाटील

१. परमेश्वरा त्यांना क्षमा कर : महात्मा गांधींच्या पुतळ्याला वेळ लागूं लागला तसतशी वर्तमानपत्रांतून अतिशय कडवट आणि विपर्यस्त टीका होऊं लागली. खरी परिस्थिती काय आहे याची

चौकशी करून एकतर्फी टीका टाळली तर ते टीकाकार कसले ? कांहीं वेळां तर अत्यंत जहरी टीका वर्तमानपत्रांनी छापली. खऱ्या परिस्थितीचें विषदीकरण हा स्वतंत्र लेखाचा विषय आहे. हे स्थळ योग्य नव्हे. असो.

खरी परिस्थिती प्रत्यक्ष डोळ्यांनी पाहांत असणाऱ्या आम्हां लोकांना, आपली बाजू न मांडता आबा स्वस्थ राहिलेले पाहून आचंबा वाटला, रागही आला. निष्कारण चाललेला तो शेणमारा अखेर आम्हा सर्व लोकांना असह्य झाला. आपली बाजू व्यवस्थित विषद करणारा एक लेख लिहून, तो वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध करावयाचा असं मी ठरविलं, आणि एक लेख लिहिला. प्रसिद्धीपूर्वी आबांना तो वाचून दाखवून, त्यांची संमति घ्यावी म्हणून मी गेलो.

रेडिओ जवळच्या खुर्चींत आबा बातम्या ऐकत बसले होते. हातांतले कागद सांवरीत मी तिथं जातांच, " काय तें ? " म्हणून आबांनी विचारलं

" वर्तमानपत्रांसाठीं लेख लिहिलाय मी " मी उत्तर दिलं.

" कसला लेख ? "

" वर्तमानपत्रांतून येणाऱ्या टीकेला तुम्ही उत्तर देत नाहीं. त्यामुळें खरी परिस्थिती पाहू न शकणाऱ्या वाचकांना आपली बाजू समजत नाहीं. आपल्या अडचणी कळत नाहींत. आणि मग निष्कारण गांवभर घाणेरडी टीका होते. तुम्ही मिंधे आहांत म्हणून टीकेला उत्तर देत नाहीं असं लोक समजतात " मी म्हणालो.

" समजेनात कां ! बिघडल काय त्यांत ? मला शिव्या देतांना प्रथम त्यांचंच तोंड घाण होतं. आपण उत्तर दिलं कीं परत ते आणखी त्यावर लिहिणार. पुनः आपण लिहिलं, कीं पुनः त्यांचं आहेच ! म्हणजे ही चिखलफेक संपायचीच नाहीं कधीं ! त्यापेक्षां एकानं कुणितरी स्वस्थ बसणंच चांगलं. शिवाय ज्यांना कांहीं उद्योग नाहीं त्यांची तीं कामं. त्यापेक्षां कितीतरी चांगलीं कामं मला करावयाची आहेत." आबा म्हणाले.

"पण लोकांना आपली बाजू कशी समजणार?" मी स्वतःचा हेतु पटविण्यासाठीं आग्रही स्वरांत म्हणालो.

"समजेल. एक दिवस आपली चूक त्यांना आपोआप समजेल."

मी जावयासाठीं उठलो. आबांच्या मनाचा मोठेपणा पाहून माझं अंतःकरण आदरानं काठोकाठ भरून आलं. पटलं कीं जे मनानं मोठे असतात, ते मित्रांवरच नव्हे तर वैऱ्यांवरहि प्रेम करतात.

हातापायांत खिळे ठोकून ठार मारला जात असलेल्या ख्रिस्ताचं शेवटचं वाक्य माझ्या मनोमंदिरांत घुमूं लागलं—

"परमेश्वरा, त्यांना क्षमा कर! कारण ते काय करताहेत तें त्यांना समजत नाहीं!!"

**२. चढाव खिशांतून न्यायला विसरूं नको!:** मराठी चित्रपट प्रेक्षकांना परिचित असलेले नट श्रीयुत चंद्रकांत मांडरे एकदां हिंदुस्थानी पद्धतीचा चढाव घालून आले होते. चढावांचा 'कर ऽ र, कर ऽ र' असा विशिष्ट आवाज कानीं पडतांच आबांचं तिकडं लक्ष गेलं.

"चढाव नवीन घेतलास वाटतं?" आबांनी मांडऱ्याना विचारलं.

"कालच एका मित्रानं तो पाठवून दिला. अशा तऱ्हेचे पुढली टोक वर उचललेले, शोभिवंत चढाव इकडे मिळतच नाहींत. आपल्याकडल्या चांभारांना करावयालाच जमत नाहीत." वगैरे वगैरे उत्तरादाखल चाललेलं तें वर्णन आबांनीं शांत मनानं अन् निर्विकार चेहऱ्यानं सर्व ऐकून घेतलं.

थोड्या वेळानं मांडरे घरीं जाण्यास निघाले, तेव्हां मिस्कीलपणें हंसत हंसत आबा त्यांना म्हणाले,

"रस्त्यांतून जातांना चढाव खिशांतून न्यायला विसरूं नको!"

**३. मी विश्वासघात करणार नाहीं.:** महाराष्ट्र फिल्म कंपनीचे चित्रपट यशस्वी होऊन कंपनीला खूप फायदा उरला. उभारणीपासून भांडवल पुरवून कंपनीच्या यशस्वीतेला उपयोगी पडलेल्या एक

भागीदार श्रीमती तानीबाई यांच्या वाट्याचे पैसे भागवून, त्यांचे मालकीहक्क तोडून टाकावेत, असा सल्ला एकानें आबांना दिला.

संतापानं लाल होऊन आबा त्याला म्हणाले, "तें कधीही शक्य नाहीं. ज्या वेळीं मला कुणीही पैशाचं साहाय्य दिलं नाही त्यावेळीं माझं घरदार इस्टेट कांहींही न पाहतां अगर फायदा होईल कीं तोटा याचा विचारही न करतां केवळ माझ्यावर विश्वास ठेवून बाईंनी हजारो रुपये माझ्या हवालीं केले. एका शब्दानंही कधी अविश्वास दाखविला नाहीं. त्यांचा पैशासाठी मी विश्वासघात करूं ? तें कधीही शक्य नाहीं. प्रसंगच पडला तर मीं माझी मालकी सोडेन, पण विश्वासघात करणार नाहीं."

आणि खरोखरच जेव्हां भांडणें विकोपाला गेली तेव्हां आपल्या वाट्याच्या चाळीस हजार रुपयांपैकीं एक पैही न घेतां त्यांनी भागीदारी सोडून दिली. एवढंच नव्हे तर कंपनी तोट्यांत आल्यावर कांहींएक संबंध नसतांनाही आपल्या वाटणीचे दहा हजार रुपये कर्ज भागविण्यासही त्यांनीं मागेंपुढें पाहिले नाहीं !

**४. वजनदार माणूस :** ती दुपारची वेळ होती. नित्यनेमानं आबा पेंटिंग स्टूडिओंत दुपारीं कामाला बसत. त्या दिवशींही ते पेंटिंग करीत होते, आणि शेजारीं उभा राहून मी त्यांना कांहीं तरी सांगत होतो. आम्हां दोघांचा खूप जोरांत वादविवाद चालला होता. नेहमींच्या संवयीप्रमाणें आबा माझं म्हणणं चूक कसं तें पटवून देत होते, आणि मी स्वतःचा मुद्दा सोडायला तयार नव्हतों.

इतक्यांत जिन्यावर कुणाची तरी पावलं खूप जोरजोरांत वाजली. इतकी कीं मोठमोठ्यांदा बोलणाऱ्या आमचं लक्षही तिकडं वेधलं ! कोण आलं ते पाहण्यासाठीं आम्ही दोघांनीं पण बोलणं थांबविलं आणि दाराकडं नजर वळविली. तळमजल्याच्या पायरीपासून खाड्खाड् पावलं वाजविणारी ती व्यक्ति अखेर दारांतून आंत आली.

अगदींच किरकोळ शरीरयष्टि असलेले, 'मुकं लेकरूं' चित्र-



१९५३ मध्यें चित्रपटाच्या शूटिंगच्या तयारींत बाबूराव.

पटाचे कथालेखक श्रीयुत दिलीप जामदार होते ते! जोरजोरांत हंसत आबा थट्टेत म्हणाले,

'हात्तिच्या! तुम्ही होय? जिना जोरजोरांत वाजला तेव्हां वाटलं कुणि वजनदार माणूस आला!'

आबांनी 'वजनदार' शब्दावर केलेला श्लेष ध्यानीं येतांच आम्ही तिघेंही खूप हंसलों.

**५. मार्ग-दर्शक होईल असं मझ्या जीवनांत काय आहे?**: दादासाहेब फाळक्यांनी भारतीय भूमींत नव्यानेच लाविलेल्या चित्रपटकलेच्या रोप्याचा जिवापाड कष्ट करून ज्यांनी जोपा केला, घामाचं पाणी गाळून ज्यांनी तो वाढविला, फुला–मोहराला आणला त्या सिनेमहर्षिचं चरित्र लिहिलेलं नसावं, ही कांहीं भूषणास्पद गोष्ट नव्हे, असं मला वाटलं.

चित्ररूपी प्रतिसृष्टि निर्माण करतांना त्या देवर्षि विश्वामित्राप्रमाणं या सिनेमहर्षिंना काय काय बरे वाईट अनुभव आले, धंदा नवीन, साधनांची दुर्लभता, आणि अनुभवाची न्यूनता वगैरे प्रतिकूलतेंतून त्यांनी कसा मार्ग काढला, केवळ कल्पकता व अमाप कष्ट यांच्या बळावर यशोमंदिर गाठतांना त्यांना किती त्रास सहन करावा लागला तें नव्या पिढीला समजल्यास खचित मार्गदर्शक होईल हें जाणून मी छोटेखानी कां असेना आबांचं एकादं चरित्र लिहायचं असं मनाशीं ठरवलं.

माझा मनोदय आबांना सांगून, पूर्वायुष्यांतील आठवणी आणि अनुभव सांगा अशी विनंति केली, तेव्हां ते गंभीर झाले. थोडावेळ थांबून ते मला म्हणाले,

"चरित्र लिहावं असं माझ्या आयुष्यांत काय आहे? संथ आयुष्य जगलेला सामान्य माणूस मी. लोकांना मार्गदर्शक होईल असं माझ्या जीवनांत काय आहे?"

"पुष्कळ आहे," मी म्हणालो.

मनांत आलं कीं, कस्तुरीच्या सुवासाची मातब्बरी मृगाला वाटत नाहीं, पण...

थोडावेळ विचार करून ते म्हणाले, " मला सहाय्य तर राहूदेच पण केला त्यापेक्षां कमी विरोध लोकांनीं केला असता, तर मी खूप कांहीं करून दाखविलं असतं आतांपर्यंत. तेव्हां तुम्हांला लिहायचंच असेल तर एक लेख लिहा. आणि त्यांत लिहा कीं लोकांनीं कलावंताला एक वेळ सहाय्य नाहीं दिलं तरी चालेल पण विरोध मात्र करूं नये. कधीही करूं नये." एक दीर्घ निःश्वास टाकून ते कामाला लागले.

**६. कलाकृती माझी म्हणून मी नांवाजणार नाहीं:**—आबांनी दिग्दर्शित केलेला 'विश्वामित्र' चित्रपट कोल्हापुरांत लागला तेव्हां त्यांनीं मला "तो पाहिला काय" म्हणून विचारलं. मी तो "पाहिला" असं सांगतांच, " कसा काय वाटला, " असा दुसरा प्रश्न लगेच त्यांनीं विचारला.

" त्यांतली कोणती बाजू चांगली आहे ? आपल्याला तर तो बिलकूल आवडला नाहीं." अगदीं स्वच्छ शब्दांत मी धाडकन उत्तर दिलं.

माझ्या स्पष्टोक्तीनें किंचित्‌ही न चमकतां आबा चटकन् म्हणाले, " मला तरी तो कुठं आवडलाय ? कलाकृति वाईट असली तरी ती माझी आहे येवढ्यासाठीं मी कधींही नांवाजणार नाहीं. त्यांत कांहींही नाहीं हें मलाही माहीत आहे. पण कोणत्या प्रतिकूल परिस्थितींत मी तो पुरा केला तें माझं मलाच माहीत. समाधानाची गोष्ट एवढीच कीं कसा कां होईना तो पुरा झाला आणि मी कामं अर्धवट टाकतों असं म्हणणाऱ्यांना नवा विषय मिळाला नाहीं !"

**७ माझ्या कष्टाचा पैसा वाया जाणार नाहीं:**—एके दिवशीं सकाळींच हातांतल्या आंगठींतला हिरा हरवल्याचं आबांच्या ध्यानीं आलं. ती गोष्ट घरीं सांगतांच साऱ्या घरांत एकच गोंधळ उडाला. प्रत्येकजण घरादाराचा कोनाकोपराही धुंडाळूं लागला. केराच्या टोपल्या आणि स्टुडिओतील मॉडेलिंग क्लेचीही कसून तपासणी झाली. धुंडाळली नाहीं अशी बैठकीच्या खोलीमधलीच काय पण अडगळीच्या खोलींतली जागा आणि मोटारगाडीही शिल्लक राहिली

नाहीं. पण हरभऱ्याएवढा हिरा, तो कुठला आलाय सांपडायला ?

बायका नाहींतरी जरा श्रद्धाळूच. माईसाहेबांनीं लगेच ज्योतिषीबोवांना प्रश्नकुंडली मांडायला लावली. हिरा थोड्या दिवसांनीं सांपडेल असं ज्योतिषीबुवांच्या कुंडलीनं उत्तर दिलं.

आबांच्यासह आम्ही सर्व लोक उपहासानं हंसलो. एवढासा खडा, कुठं पडला तेंही नक्की माहीत नाहीं. शिवाय सारं घर धुंडाळलेलं. इतकंच नव्हे तर ज्या ज्या ठिकाणीं आबा जाऊन आले होते तिथेंही कसून शोधाशोध केलेली. असं असतांना जो सांपडत नाहीं, तो म्हणे थोड्या दिवसांनीं सांपडणार ? कुणाचा विश्वास बसेल ?

हो, पण सांगायची गोष्ट राहूनच गेली ! ती म्हणजे, आम्ही सर्वजण जरी भांबावून, गोंधळून गेलों होतो, तरी आबा आपले शांत आणि प्रसन्नच ! जसं कांहीं कांहींच घडलं नाहीं. सत्तावीसशे रुपये किंमतीचा हिरा आणि फुटक्या बांगडीची काच जशी कांहीं एकाच मोलाची ! आबांची बेफिकिरी पाहून आम्हा सर्वांना धक्काच बसला आश्चर्याचा !

"हिरा हरवल्याबद्दल तुम्हांला कांहींच वाईट वाटत नाहीं ?" माईसाहेबांनीं तर असं विचारायलाही कमी केलं नाहीं.

"आतां वाईट वाटून काय करायचं ? हरवलेली वस्तु काय वाईट वाटून घेण्यामुळं परत मिळते ! हिऱ्यासारखी वस्तु इतके पैसे देऊन खरीदली हेंच मुळीं चुकलं. ज्या दिवशीं खरेदी केला त्या दिवशींच पैसे हरवले. शिवाय तो काय मी जाणूनबुजून टाकलाय ? हरवला तर हरवला !" माईंची समजूत काढण्यासाठीं आबा हंसत हंसत विनोदानं म्हणाले, "कष्टाच्या पैशांनी खरीदला होता तो. मला खात्री आहे, कीं माझ्या कष्टाचा पैसा कधीही वाया जाणार नाही."

आणि गंमत अशी कीं आबांची विनोदवाणी अन् ज्योतिषिबुवांची भविष्यवाणी आठच दिवसांनी अचानक खरी ठरली !

आमची शशिताई दारांत खेळत असतांना, कांहींतरी चमकल्याचा तिला भास झाला. उचलून पाहते तों हरवलेला हिरा !

मग काय विचारावं ! आनंद घरांत मावेना !

आबाही हंसत हंसत म्हणाले, " सांगत नव्हतो कीं माझ्या कष्टाचा पैसा कधींही वाया जाणार नाहीं ? "

दिडकीचं तेल जाळून हरवलेली पै शोधणाऱ्या लोकांना आबां-च्या बेफिकीर वृत्तीची किंमत कळणार नाहीं. हजारो रुपये चुटकी-सरसा मिळवेन अशी हिंमत ज्या माणसामध्यें असते असाच माणूस हजारो रुपयांचा तोटा हसत मुखानं स्वीकारूं शकतो.

शेकडो रुपये खर्चून व खूप श्रम घेऊन तयार केलेल्या पुतळ्या-ची ओतकामं फुकट गेली तरीही आनंदी राहणाऱ्या आबांच्या वृत्तीच्या मुळाशी हीच गोष्ट होती.

' स्वतःच्या कर्तृत्वाबद्दल अनंत आत्मविश्वास आणि दुर्दम्य आशावाद ' या एकाच वाक्यांत त्यांच्या जीवनाचं सार सांठवि-लेलं आहे !

## २१. श्री. वी. नांद्रेकर

[ गाजलेले नट. निर्माते. ]

कुटुंबांतील लहान थोर सर्व मंडळी एकत्र बसली असतां त्या-पैकीं कोणालाही केव्हांही लाजण्याचा, शरमण्याचा प्रसंग न येतां खेळीमेळीनें आणि मोकळेपणानें पहातां येईल अशी कलाकृति तयार करण्याचा आणि तसा कथाभाग निवडण्याचा बाबूराव नेहमीं प्रयत्न करीत. कथा व त्याची पटकथा ( स्क्रीन प्ले ) स्वतः तयार करीत. " लंका " या चित्राची एक गोष्ट आठवते. त्या वेळीं भालजी पेंढारकर नुकतेच महाराष्ट्र फिल्म कंपनींत बाबुरावांच्या-कडे आले होते. त्या पूर्वीं ते नाटक कंपनींत होते व एक दोन नाटकें त्यांनीं लिहिलीं होतीं. बाबुरावांनीं " लंकाची " पटकथा लिहिण्यास भालजींना सांगितलें. रोज नवीन कागदावर भालजी पटकथा लिहून आणीत पण बाबुरावांच्या पसंतीला ती कधीं उतरली नाहीं. फक्त बाबूराव बोलत, " भालजी, अद्याप तुम्ही नाटकंच लिहितां. अहो, मला सिनेमाकरतां कथा पाहिजे. " असे दोन

महिने चालले. शेवटीं भालजी चिडले व खर्च झालेल्या कागदाचे पैसे टेबलावर ठेऊन ऑफिस बाहेर पडले. बाबुराव नुसते हंसले. अशीच एक पटकथेबद्दलची गोष्ट म्हणजे कंपनींत त्यावेळीं लिहिण्याची आवड असलेले केशवराव धायबर यांची. त्यांना बाबुरावांनीं "बाजी प्रभू" या प्रसिद्ध ऐतिहासिक चित्रपटाची पटकथा लिहिण्यास सांगितली. केशवराव लिहूं लागले. पूर्वीच्या प्रकाराप्रमाणेंच हा पण दिनक्रम चालला. शेवटीं केशवरावांनीं लिहिलेले कागद तीन पोतीं भरतील इतके झाले. तरी बाबुरावांना पसंत पडेना. एके दिवशीं बाबूरावांनीं केशवरावांना बोलावले व म्हटलें, "आतां लिखाण थांबवा, व कागद पेन्सील घेऊन समोर बसा." आणि हां हां म्हणतां बाबुरावांनीं बाजी प्रभूची पटकथा सांगितली. ती सर्व त्यांच्या डोक्यांतच होती. त्यांच्या चित्रपटांपैकीं हा एक उत्कृष्ट चित्रपट होय. त्यांना काय पाहिजे ते त्यांच्या जवळ असे. पण दुसऱ्या करवीं करून पहात. पटकथा करण्यांत त्यांचा तर हातखंडा होता.

त्यांच्या सहवासांत चार वर्षें राहून कै. औंधकरांनीं मात्र त्यांची विद्या बरोबर उचलली होती. यामुळेंच औंधकर उत्कृष्ट पटकथा-लेखक होते. त्याचें श्रेय बाबूरावांना द्यावें लागेल. आताचे प्रख्यात सिनेमा लेखक श्री. ग. दी. माडगूळकर यांची पटकथा चांगली असते याला कारण बाबूरावच. "रामजोशी" त्यांनीं त्यांच्याकडून बसून लिहून घेतलें आहे, हे कित्येक जणांना ठाऊक असेलच !

चित्रपट तत्र सुधारण्याकरितां बाबूरावांनी अतोनात प्रयत्न केले. फाळके यांच्या चित्रांत सर्व कलाकार कॅमेऱ्याकडे पाहून अभिनय करीत, तर बाबूरावांनीं बाजूस पाहून अभिनय करण्याची पद्धत सुरू केली. त्यामुळें जास्त स्वाभाविकपणा निर्माण झाला. फोटोग्राफीला कोणते रंग कसे येतात व कपड्यांना रंग कसे असावेत वगैरे संशोधन बाबूरावांनीं प्रथम केलं. सेटिंगला पन्हाळ्याची तांबडी व पिवळी माती देण्याची प्रथा त्यांनींच सुरूं केली व अद्यापपावेतों तरी तीच आहे. कमी खर्चांत व हवा असलेला रंग !

आतां फोटोग्राफीचें तंत्र पूर्णपणें सुधारले आहे. त्याकाळीं कांहींच नव्हतें. फक्त फिल्म येई. ती पण जलद गतीची नव्हती. ( म्हणजे फास्ट इमल्शन नव्हतें, E टाईप असे.) आतां सुपर डबल एक्स्ट्रॉ आहे. त्या वेळीं इतर सर्व चित्रपटांत रात्रीच्या सीनला-सुद्धां आकाश पांढरे असे. तर बाबूरावांच्या चित्रांत आकाश नेहमीं काळे असे. बाबूराव रंगीत साधी काच कॅमेरापुढें धरून प्रयोग करीत व योग्य तो हेतु साधीत. एक दृष्य नाहींसें होऊन दुसरें निर्माण करणें ( मिक्स व फेड आऊट–इन ) हें तंत्र प्रथम बाबूरावांनीं " लंका " या चित्रपटापासून सुरू केलें. प्रत्येक गोष्टी-वर काटेकोरपणें ध्यान देणें आणि होईल तितका प्रयत्न करून परि-पूर्णतेचा शेवट गाठणें हे त्यांचें ध्येय होतें. निर्मितीची लय वाढविणें ही गोष्ट मात्र त्यांच्या आटोक्याबाहेरची होती. कारण बाबूराव एका गोष्टींत रंगले कीं तिथेंच तास न् तास रंगत. शिकारीचा नाद फारच. औटडोअर शूटिंगला गेले तर ते कित्येक वेळा शिकारींत रंगून जात. याची एक गोष्ट जातां जातां नमूद करावीशी वाटते कीं लंकाचें शूटिंग (औट डोअर) नेसरे या गांवीं होते. मी रोज मेकप करी. पण बाबूराव चित्रणाच्या ठिकाणीं शिकार करीत करीत हमखास वेळाने येत व दुसरी दृश्ये घेत तों सूर्यप्रकाश जाई व माझे काम घेण्यास वेळच राहत नसे. असे १५ दिवस चालले होते. रोज संध्याकाळीं मेकप उतरतांना बाबुराव बोलत " बाबा, उद्या तुझा प्रथम शॉट "

रंगभूमिवरील नाट्य प्रयोगाच्या तालमीप्रमाणें स्टूडिओंत चित्र-पटाच्या कृतीच्या चित्रणाला सुरुवात होण्यापूर्वीं कित्येक दिवस नटनटींकडून तालमी घेतल्या जात. त्यावेळीं त्यांच्याकडे असलेला नट संच सर्व प्रकारच्या भूमिका करण्यास सदोदीत तत्पर असे व प्रत्येकजण तालमीच्या वेळीं वेगवेगळ्या भूमिका करून पाहात असे. त्यामुळेंच प्रत्येकास अभिनयाचें पुरे पुरे ज्ञान मिळे. उदाहरणा-दाखल म्हणजे " सैरंध्री " मध्यें झुंझारराव " कीचक " झाले तर त्या नंतर त्यांनीं " मायाबाजार " मध्यें विनोदी नोकराची भूमिका

केली. अशी आणखी उदाहरणें देतां येतील.

त्याकाळीं शूटिंग सूर्यप्रकाशांत करावे लागे. त्यामुळें नेहमी औट डोअरच असे. सर्व पायीच जात. त्यावेळीं आणि आतां सुद्धां पन्हाळा व जोतिबा डोंगर ही स्थळें असत. कॅमेरा व इतर सामाना-करितां फक्त एक गाडी असे. असे २०-२५ मैल नेहमी रपेट ! आणि आतां चार पावले चालण्यास सुद्धां मोटर लागते ! बाहेर-गांवीं गेल्यानंतर एखाद्या धर्मशाळेंत अगर चावडींत पथारी टाकावी, सर्व दिवस कलेच्या नादांत कष्ट करावेत, असा दिनक्रम मजेंत जात असे. सर्वच लोक खेळीमेळीने वागत ! एकमेकांचे हेवेदावे चिंतणारे कोणीच नव्हते. त्याला कारण एकच व्यक्ति. बाबूराव !

## २२. श्री. पु. श्री. काळे

[ राजकमलचे आर्ट डायरेक्टर. ]

महान् कलावंत कै. बाबूराव पेन्टर ह्यांची तहतीस वर्षांपूर्वीची आठवण मी देणार आहे. महाराष्ट्र रंगभूमि त्यावेळीं ऐन बहारींत होती. आणि बाबूरावांनीं आपल्या कला नैपुण्यानें तिच्या वैभवांत अधिकच भर घातली होती. कै. केशवराव भोसले ह्यांनीं आपल्या ललितकलादर्श मंडळीची पार्श्वभूमि सजविण्यासाठीं जेव्हां कै. अनंत-राव मेस्त्री ह्यांची योजना केली त्यावेळीं बाबूराव मेस्त्रीहि मधून मधून ललितकलेंत येत असत. १९२१ सालीं गंधर्व मंडळीनें द्रौपदी नाटक जें रंगभूमिवर आणलें, त्यांतील सर्व देखावे बाबूरा-वांनींच रंगविले होते. त्यावेळीं मी पुण्यास ललितकलेंत ' शहा शिवाजी ' नाटकाचे देखावे रंगवित होतो. त्यामुळें द्रौपदी नाटकां-तील बाबूरावांचें काम पाहण्याची सुसंधी मला लाभली.

बाबूरावांचें तें काम पाहून डोळ्यांचें पारणें फिटल्यासारखें वाटलें. द्रौपदींतील सर्वच देखावे भव्य आणि परिणामकारक होते. पण विशेषतः त्यांतील एका पडद्याची माझी आठवण आजमितीसहि ताजी आहे. त्यांतील रंग संगति विशेष वाखाणण्यासारखी होती. ती नेत्रांना आल्हाददायक होती. एका रंगाचा विशिष्टपणा राखून

शेजारच्या रंगांना उठून देणारी ती रंगसंगति अत्यंत कलापूर्ण होती. रेखनांतील रेखीवपणा व सफाईमुळें, आणि छाया प्रकाशाच्या वास्तवपूर्ण कमी अधिक रंगछटांनीं त्या जड वस्तूंना दिलेला उठाव प्रेक्षकांच्या डोळ्यांत भरण्याजोगा होता. आणि यथार्थदर्शनाच्या ( Perspective ) नियमान्वयें रंगविल्या गेलेल्या त्या पडद्यावर जवळच्या आणि दूरच्या विभागांतील रंगांच्या गडद आणि फिक्या छटांनीं उत्पन्न केलेला आभास निसर्गाशीं स्पर्धा करीत असल्याची साक्ष ठायीं ठायीं पटवून देत होता.

असल्या उच्च दर्जाची कला पाहून अत्यंत समाधान वाटलें. आणि म्हणूनच महाराष्ट्र रंगभूमि ही अत्यंत भाग्यवान होती असें मी म्हणतों. त्यावेळीं पारशी, गुजराथी कंपन्याहि खूप भरभराटीस आलेल्या होत्या. त्यांची रंगभूमि सजविणारे कांहीं पेंटर्सहि अत्यंत नांवाजलेले. पण वास्तववादी देखावे कसे असावेत ह्याचे धडे मात्र आमच्या मेस्त्री बंधूंनींच दिले, हें अभिमानपूर्वक नमूद करणें भाग आहे.

त्या अबोल वृत्तीच्या कलावंताच्या तोंडून निघणारे मोजकेच बोल मार्मिक असत. सुविख्यात चित्रकार एस्. एल्. हळदणकराचे डोळे मध्यंतरी बिघडले होते. त्यांत सुधारणा होत असलेली ऐकून आम्ही आनंद व्यक्त करीत होतों. त्यावेळीं "चित्रकाराला डोळे, हात आणि–" थोडेसें थांबून "डोकें" असें जों मी म्हणत आहे, तोंच बाबूराव म्हणाले, "अहो, डोकं तर प्रथमच पाहिजे !"

कलावंतांत दिसून येणारी तन्मयता तर त्यांच्यात विशेषच होती. एकदां एखादें चित्र पुढें घेऊन ते बसले म्हणजे कित्येक महत्वाचीं कामें ते बाजूला सारीत. त्यांनीं स्थापन केलेल्या महाराष्ट्र फिल्म कंपनीस दुर्दैवानें आग लागली. सर्वत्र धुमाकूळ माजलेला. अशा गंभीर परिस्थितींतहि बाबूराव एका बाजूस शांत चित्तानें कॅमेऱ्याची पाहणी करीत बसलेले होते. प्रसंगावधान राखून आगीच्या डोंबांतून तो कॅमेरा पाण्याच्या पीपांत टाकून वांचविण्यांत आला होता. आणि त्याचीच जोपासना करण्यांत ते गर्क झाले होते. रोम शहर जळत

असलेले पाहून आपलें आवडतें वाद्य वाजवीत बसणाऱ्या नीरोपेक्षांहि बाबूरावांचें हें चित्र मला अधिक प्रभावी वाटतें !


## २३. श्री. बालगंधर्व

बाबूरावांसंबंधीं माझ्या आठवणी फारशा नाहींत. परंतु आहेत तेवढ्या सांगतों. श्री. मोरेश्वर कीर्तिकर— ज्यांना आम्ही मोरबा म्हणत असूं— त्यांनीं माझा बाबूरावांशीं प्रथम परिचय करून दिला. श्री. केशवराव भोसले, सुप्रसिद्ध गायक नट आणि ललित कलादर्शचे मालक, यांचा व माझा फार स्नेह. कधीं कधीं मी त्यांच्या कंपनींत त्यांच्याकडे जायचा. बाबूरावांचे आतेभाऊ श्री. आनंदराव पेंटर हे केशवरावांच्या कंपनींत पडदे रंगविण्याचें काम करीत. त्यांच्याबरोबर बाबूरावजीही असायचे. आनंदराव आणि बाबूराव यांच्या कामाविषयीं मोरबा माझ्याजवळ फार तारीफ करायचे. त्यांनीं माझी आणि बाबूरावांची पहिली ओळख करून दिली ती केशवरावांच्या कंपनींतच.

या ओळखीनंतर बाबूरावजींचा आणि माझा गप्पा मारण्या-इतका परिचय वाढला. मी मनानं श्रद्धाळू, देवादिकांच्या पूजेचा मला नाद, आणि पूजेच्या साहित्यांत कांहीं विशेष वस्तू असाव्या अशी हौस. ज्याला "उजवा शंख" म्हणतात तो फार शकुनाचा समजण्यांत येतो. पण तो तितकाच दुर्मिळ असतो. एकदां गप्पांच्या ओघांत ही गोष्ट सहज मी बाबूरावजींच्याजवळ बोललों. ती ऐकून ते आपल्या विशिष्ट पद्धतीनें हसले व म्हणाले, "अहो नारायणराव, ह्या असल्या भोळ्या समजुतींत कांहीं एक अर्थ नाहीं. शंखांत कसला आला आहे उजवा नि डावा ? सारे शंखच !" मला त्यांचं बोलणं फारसं आवडलं नाहीं. मी मनांत म्हटलं नास्तिक दिसते आहे स्वारी.

परंतु पुढें कांहीं दिवसांनीं भेट झाली तेव्हां बाबूरावजी मला म्हणाले, "उजवा शंख हवा होता ना नारायणराव तुम्हांला ? तुमच्यासाठीं घेऊन आलों आहे !" आणि त्यांनीं शंखच माझ्या

हातीं ठेवला. किती सुंदर होता तो शंख ! आणि मला लोकांकडून कळलीं होतीं तीं सारीं शुभ लक्षणं त्याच्या ठिकाणीं होतीं ! खरोखर माझा आनंद गगनांत मावेना. उजवा शंख मिळाला ! आतां माझं भाग्य उघडणार ! मीं बाबूरावांचे आभार मानले आणि म्हटलं, " आतां या उजव्या शंखाची मी रोज पूजा करीन." तें ऐकून बाबूराव मोठ्यांदा हंसूं लागले. मीं त्यांना हंसण्याचं कारण विचारलं तेव्हां बराच वेळ तें कांहीं केल्या सांगेनात. नुसते हंसतच राहिले.



श्री. बालगंधर्व

फोटो : भट. ( ऑल इंडिआ रेडिओच्या कृपेनें. )

कारण सांगा म्हणून मीं हट्टच धरला तेव्हां शेवटीं ते म्हणाले, " अहो नारायणराव, हा उजवा शंख मीं स्वतः हातांनीं तयार केला आहे. हस्तिदंताचा आहे. नीट बघा." त्यांनीं असं सांगितलं तरीदेखील तो खोटा शंख आहे असं मला पटेना. इतका हुबेहूब बाबूरावजींनीं तो तयार केला होता !

गंधर्व मंडळीच्या एखाद्या नाटकाचे पडदे बाबूरावजींच्याकडून तयार करून घ्यावे असं माझ्या मनांत फार दिवस होतं. तो योग "द्रौपदी"च्या वेळेस आला. बाबूरावांनीं त्या नाटकाची सगळी सीनसीनरी इतकी अप्रतिम केली कीं त्याचं वर्णन मला करतां येणार नाहीं. स्त्रीपुरुष पात्रांच्या वेषभूषेचीच नव्हे तर पादत्राणांचीदेखील 'स्केचेस' त्यांनीं करून दिलीं, व त्याबरहुकूम आम्ही केलेली सजावट प्रत्यक्ष नाटकांत पाहून प्रेक्षक किती संतुष्ट झाले त्याचंही वर्णन करावं तेवढं थोडं होईल. जमीन असेल तिथें पाण्याचा भास व्हावा, पाणी असेल तिथें जमिनीचा भास व्हावा, अशा प्रकारच्या चमत्कारांनीं भरलेली 'मयसभा' स्टेजवर उभी करण्याची बाबूरावजींची फार इच्छा होती. परंतु काकासाहेब खाडिलकरांनीं प्रवेश लिहिला होता तो पाण्याच्या "हौदा"वर! कांहीं केल्या त्यांत बदल करायला ते तयार होईनात. त्यामुळें मयसभेची कल्पना सोडून द्यावी लागली! बाबूरावांनीं मयसभा तयार केली असती तर जें अद्‌भुत दृश्य पाहायला मिळालं असतं त्याला प्रेक्षक मुकले! काकासाहेब आणि बाबूराव यांचा झालेला वाद मात्र माझ्या लक्षांत आहे. आम्ही त्यांना या कामाबद्दल बारा हजार रुपये दिले. पण त्यांचं एकंदर काम असं होतं कीं त्यावरून लाख रुपये ओवाळून टाकावे! मला वाटलं आम्ही किती थोडा मोबदला बाबूरावजींना दिला!

पुढें माझा व बाबूरावजींचा विशेष संबंध आला तो वसंतराव देसाई यांच्या 'अमृत सिद्धि' नाटकावरून चित्रपट तयार करतांना. त्या चित्रपटांत मी नायिकेची भूमिका करावी हें बाबूरावजींना पसंत नव्हतं. परंतु निर्मात्याचा तो हट्ट होता. बाबूरावजींनीं आपली नापसंति मला स्पष्ट सांगितलीही. परंतु त्यांनीं काम केलं तें अगदीं मनापासून. माझीं गाणीं तर त्यांनीं फारच सुरेख घेतलीं.

शांतारामबापूंनीं "रामजोशी" चित्रपट घेतला तेव्हां त्यांतील मोरोपंत या पात्राचं काम मीं करावं अशी बाबूरावांची फार इच्छा

होती. परंतु मी पडलों ठेंगणा. मुख्य नायक जयराम शिलेदार यांच्या जोडीला मी शोभेनसं वाटेना. त्यामुळें बाबूरावांच्या दिग्दर्शनाखालीं भूमिका करण्याचा माझा तो ' चान्स ' गेला !

बाबूरावांचं आणि माझं व्यवसायाचं क्षेत्र भिन्न भिन्न. त्यामुळें गेल्या कित्येक वर्षांत त्यांची माझी समक्ष गाठ फार क्वचित् पडली. परंतु ते केव्हांही भेटले कीं हंसतमुख असायचे. कधीं तोंड वाकडं नाहीं. कधीं रडवी भाषा नाहीं. कधीं संकटांचं अगर अडचणींचं गाऱ्हाणं नाहीं ! ते घटकाभर जरी भेटले तरी मनाला फार बरं वाटायचं. त्यांची आठवण माझ्या अंतःकरणात कोरली गेली आहे ती सदा हंसणाऱ्या, सदा उत्साहानं बोलणाऱ्या, सदोदित कांहीं तरी काम करण्यांत मग्न असणाऱ्या एका मोठ्या कलावंताचीच !

## २४. श्री. भगवान पंडित

[ " कलोपासक मंडळा " चे प्रमुख कार्यकर्ते. बाबूरावांचे स्नेही त्रिंबकराव पंडित यांचे चिरंजीव. ]

कै. बाबूराव पेंटर हे जन्मजात कलावंत असल्यामुळेंच लहरी किंवा अगदीं योग्यच शब्द वापरावयाचा झाला तर हट्टी असावेत ! सुमारे १९४२ सालीं त्यांच्या डोळ्यांत मोठा दोष उत्पन्न झाला. एकच वस्तु त्यांना दोन वस्तूंसारखी दिसूं लागली ! ते मुंबईस एका प्रसिद्ध डॉक्टरांना—डॉ. तिराडेकरांना भेटावयास निघाले. त्यांना भेटण्यापूर्वी पुण्यास बाबूराव पेंटरांचे आणि माझ्या तीर्थरूपांचे परमस्नेही डॉ. राहतेकर यांना भेटले. गंमत अशी कीं, डॉ. राहतेकरांनीं जे औषध घ्यावे असे सांगितलें तेंच नेमके औषध मुंबईच्या डॉक्टर साहेबांनीं दिल्यावर, डॉ. रहातेकरांनींच ते औषध दिलं तर मी घेईन असा त्यांनीं हट्ट धरला ! अर्थात् जोपर्यंत बाबूराव पेंटर पुण्यास होते तोपर्यंत डॉ. राहतेकरांनीं त्यांना औषध दिलं. बाबूराव कोल्हापुरास गेल्यावर त्यांच्या लहरीपणानं उसळी खाल्ली आणि बाबुरावांनीं औषध बंद केलं ! लहरीपणा हा बाबुरावांचा स्थायी भाव होता असं म्हटलं तर अतिशयोक्ति होणार

नाहीं, असं मला वाटतं !

एकदां बाबूराव पेन्टर पुण्यास आले होते आणि डॉ. राहतेकरां-कडे बोलत बसले होते ! बोलतां बोलतां हातांनीं ते एक शिवाजी महाराजांचा छोटासा पुतळा प्लॅस्टिसीननें बनवत होते ! " हें काय करताहात " म्हणून डॉ. राहतेकरांनीं त्यांना विचारले असतां "तुमचा पुतळा करूं कां!" असं ते म्हणाले आणि हातांतल्या प्लॅस्टि-सीनचा त्यांनीं गोळा बनविला ! डॉ. राहतेकरांनीं स्वतःचा पुतळा करण्याऐवजीं " आमच्या सद्गुरु माळीबुवांचा पुतळा तयार करा" असं सांगितलं ! समोरच श्री. सद्गुरु माळीबुवांचा फोटो होता त्यावरून बाबूरावांनीं पुतळा बनविण्यास सुरवात केली. साधारण रंगरूप येऊं लागल्यावर बाबूरावांनीं डॉ. राहतेकरांना विचारलं, " कसा काय होतोय ? " त्यावर डॉ. राहतेकरांनीं माळीबुवांच्या फोटोंतला बारकावा आणि वैशिष्ट्य दाखवून दिलं ! ते ऐकल्यावर बाबूराव म्हणाले, " डॉक्टर, आपण समक्षच श्री. माळीबुवांना भेटूं म्हणजे रंग, त्यांची विशिष्ट ठेवण वगैरे पाहून त्यांचं एक सुंदरसं तैल चित्रच काढून देईन तुम्हांला ! " झालं ! माझे वडिल आणि बाबूराव पेन्टर श्री. माळीबुवांकडे गेले ! त्यावेळीं त्यांच्याबरोबर छोटा मूव्ही कॅमेरा होता ! माझ्या वडलांच्या विनंतिवरून बाबूरावांनीं श्री. माळीबुवांची एक छोटी फिल्म घेतली. याच मुक्कामांत बाबूराव पेंटरांनीं डॉ. राहतेकर यांची पान खाण्याची आणि माझ्या वडलांच्या सकाळच्या दिन चर्येचीही फिल्म घेतली. या तीनही गोष्टींच्या फिल्मस् डॉ. राहतेकरांकडे अजून आहेत. तसंच बाबुरावांनीं स्वतः काढलेलीं श्री. माळीबुवांची दोन तैल चित्रें—एक डॉ. राहतेकरांकरतां आणि एक आमच्याकरतां— अशीं आहेत.

आपली कांहीं तरी आठवण आपल्या स्नेह्यांजवळ कायमची रहावी या सदिच्छेनें माझ्या वडलांना बाबूरावांनीं एक अर्धनारी नटेश्वरचें वॉटर कलरचें चित्र अगदीं थोड्या वेळांत काढून दिलेलें आहे. सदर चित्र ' रत्नाकर ' मासिकांत छापून आलें होतें ! मूळ चित्र अजून आमच्याकडे आहे !

डॉ. राहतेकरांना ‘ गीते ’ बद्दल अत्यंत आदर आणि श्रीकृष्णाची आतोनात भक्ति असल्यामुळें बाबूरावांनीं डॉ. राहतेकरांकरतां अप्रतिम असे “ राधाकृष्णा ’ चें एक चित्र काढून दिलें होतें ! पण बाबूराव पेंटरांचा आणि डॉ. राहतेकरांचा चित्राच्या बाबतींत विचित्र योगच होता ! “ रत्नाकर ” मासिकाला बाबूराव पेंटरांच्या एक चित्राची अत्यंत आवश्यकता होती. त्यावेळीं बाबूराव पेंटरांच्या जवळ एक चित्रही तयार नव्हतं ! बाबूरावांचा पुण्यांत त्यावेळीं मुक्काम आहे अशी कुणकुण ‘ रत्नाकरा ’ च्या चालकांना लागली ; त्यांनीं डॉ. राहतेकरांकडे बाबूरावांच्या मुलाखतीसाठीं धांव घेतली. डॉ. राहतेकर स्वतःला बाबूरावांनीं भेट म्हणून दिलेले चित्र ‘ रत्नाकरा ’ स छापण्यासाठीं देंण्यास तयार नव्हते ! बरीच भवति न भवति ’ झाली आणि शेवटीं बाबूरावांच्या सांगण्यावरून डॉ.राहतेकरांनीं तें चित्र ‘ रत्नाकरा ’स छापण्यास दिलें. तें त्यांनीं परत स्वीकारलें नाहीं !

डॉ. राहतेकरांची आपल्यावर इतराजी झाली म्हणून बाबूराव पेंटरांनीं डॉ. राहतेकरांना एक “ वटसावित्री ”चे चित्र काढून दिलें. हें चित्र थोडे दिवस डॉ. राहतेकरांकडे होतें. डॉ. राहतेकरांनीं केवळ बाबूरावांच्या आग्रहास्तव तें थोडें दिवस घरांत ठेवलें. त्यांच्या एका स्नेह्यानें तें राहतेकरांकडून नेलें. सध्यां तें चित्र कोल्हापूरास डॉ. शंकरराव काटे डेण्टिस्ट यांचेकडे आहे !

श्री. माळीबुवांचे बाबूराव पेंटरनीं काढलेले तैलाचित्र आमच्या घरीं असूनही माझ्या चुलतबंधूंनीं डॉ. राहतेकरांजवळ त्यांच्याकडे असलेले श्री. माळीबुवांचे चित्र मागितलें, आणि डॉ. राहतेकरांनीं तें त्यांना दिलेही ! ही गोष्ट घडल्यावर बाबूराव पेंटरना अतिशय वाईट वाटलें. “ डॉक्टर, कोणालाही हेवा वाटेल असं झकास चित्र मी तुम्हांला काढून देईन. ” असं बाबूराव त्यांना म्हणत असत ! डोळ्याच्या विकारामुळें ती गोष्ट पुढें घडली नाहीं ! याबद्दल शेवटपर्यंत बाबूरावांच्या मनाला चुरचूर लागून राहिली होती ! स्वतःवर डॉ. राहतेकर नाराज आहेत असं बाबूरावांना नेहमीं

वाटे ! पण डॉ. राहतेकरानीं कृतीनें त्यांना केव्हांही तसं दाखवलं किंवा भासवलं नाहीं !

बाबूराव पेंटर जेव्हां स्वतःच्या कामांत दंग असत तेव्हां त्यांची स्नेही मंडळी बाबूरावांची गाडी स्वतःच्या कामासाठीं बिनदिक्कत वापरीत असत ! मोटारचा सगळा खर्च मात्र बाबूरावांच्यावर पडे ! एकदां पेट्रोल वगैरेचें २ – ३ हजारांचं बिल द्यायचं राहिलं. ही गोष्ट बाबूरावांचे पट्टशिष्य श्री. व्ही. शांताराम यांना कळली. श्री. व्ही. शांतारामांनीं त्यांची गाठ घेतली. पेट्रोलचे बिल देऊन टाकलें आणि बाबूरावांना विनविलें कीं " तुम्ही लोकांना कशाला गाडी देत असता ? " यावर बाबूरावांनीं शांतपणें उत्तर दिलं, " वापरी-नात बिचारे ! " बाबूरावांचा स्वभाव श्री. व्ही. शांतारामांना पुरा माहीत होता म्हणून ते ती गाडी घेऊन पुण्यास आले आणि ' प्रभात ' स्टुडियोंत ती ठेवून दिली. गुरुवर्यांची गाडी, त्यांना जशी ती प्रिय तशीच शिष्यांनाही ती प्रियच ! ' प्रभात '-मध्यें वर्ष दीड वर्ष गाडी पडून होती. पण तिची साफसफाई रोज होत असे ! याच सुमारास नटवर्य दाते हे ' प्रभात स्टुडियो 'त कामाला होते ! गाडीची साफसफाई रोज होते पण ती कोणीच कशी वापरीत नाहींत याचं नटवर्य दाते यांना कोडं होतं ! एक दिवस नटवर्य केशवराव दात्यांनीं श्री. व्ही. शांताराम यांना त्या गाडीसंबंधीं हकीकत विचारली. ती श्री. व्ही. शांताराम यांनीं त्यांना सांगितल्यावर नटवर्य दात्यांनीं ती गोष्ट डॉ. राहतेकरांच्या कानावर घातली ! कारण डॉ. राहतेकरांना स्वतःची गाडी बदलायची होती ! नटवर्य दात्यांच्या मध्यस्तीनें श्री. व्ही. शांताराम आणि डॉ. राहते-करांचें बोलणें सुरू झालें ! बाबूराव पेंटरांची गाडी विकण्यासंबंधीं श्री. व्ही. शांतारामांनीं परवानगी मिळविली आणि डॉ. राहते-करांना ती विकली ! डॉ. राहतेकर श्री. व्ही. शांतारामाकडे हप्त्यानें पैसे पाठवीत आणि त्याच्या पावत्या बाबूराव पेंटरांकडून येत ! ही गाडी डॉ. राहतेकर अजूनही वापरीत आहेत ! आपल्या

गुरुवर्यांची गाडी म्हणून ‘प्रभात’ चे चालक मात्र त्या गाडींत कधींही बसले नाहींत.

## २५. श्री. सुधाकर एकबोटे

कलामहर्षि कै. बाबूराव पेंटर हे एकदां ‘प्रेमसंगम’ या मूक चित्रपटाचे शूटींग करीत होते. एका भव्य महालाचे दृश्य चित्रीत करावयाचें होतें. त्यासाठीं एका मोठ्या मोकळ्या पटांगणांत महालाचे सेटिंग आपल्या खास देखरेखीखालीं बाबूरावांनीं लावून घेतलें तोंच जोराचा वारा सुटला व महाल डगमगावयास लागला. ते पाहून त्या चित्रपटांत काम करणारे एक नट श्री. रामचंद्र वर्दे बाबुरावांना म्हणाले, “अहो तो महालाचा सेट हलतो आहे.” त्यावर बाबूराव तात्काळ उत्तरले, “तुम्ही तुमचें काम जर तन्मयतेनें आणि उत्कृष्टपणें केलेंत तर सेटिंगकडे प्रेक्षकांचें लक्ष सुद्धां जाणार नाहीं!”

२.७.४.०२
क्रा. दि. २८/१२/५८
८२९९

# * दुहेरी ढाल *

वय ५५ ला, स्वतःकरितां, रु. २,५०० व नंतर, पश्चात्, कुटुंबियांकरितां रु. २,५०० असे रु. ५,००० चे भरघोस दोन विमे घ्या. आपलें वय २५ असेल तर, जास्तींत जास्त ३० वर्षें मुदतीला, दोन्ही मिळून, नक्त वार्षिक हप्ता अवघा रु. १३२-१-० वेस्टर्न इंडियाचें खर्चाचें प्रमाण अत्यल्प, म्हणूनच हें शक्य होतें !

: आपली जन्मतारीख कळवा :

मुंबई शाखाधिकारी सर्व माहिती आनंदानें कळवितील.

**वेस्टर्न इंडिया हाऊस**

सर पी. एम. रोड, मुंबई १.

**वेस्टर्न इंडिया विमा कंपनी लि.,**

**सातारा.**

ऋषिप्रणीत

कल्प



च्यवनप्राश

अष्टवर्गयुक्त

शक्ति–स्मृतिवर्धक, शामक, पाचक, पौष्टिक



THE FIRST
INDIAN GENERAL INSURANCE COMPANY
TO ATTAIN CENTENARY

# Triton Insurance Co. Ltd.

(*Established in* 1850)

—:: *TRANSACTS* ::—

☆ FIRE ☆ MOTOR
☆ MARINE ☆ BURGLARY
☆ WORKMEN'S COMPENSATION

*Bombay Branch:*
**UNITED INDIA BUILDING,**
**Sir Pherozshah Mehta Road,**
**BOMBAY No. 1**

*Acting Branch Manager:*
Wasudeo D. Shembavnekar

*Telephone:* 26095 (Two Lines)

Representatives Everywhere.
Enquiries Solicited.

*Telegram:* "TRIDENT" Bombay

## आमच्याकडे मिळणारीं प्रो. फडके यांचीं

# निवडक पुस्तकें

| | | रु. आ. |
|---|---|---|
| १. शिकार | (कादंबरी) | ५–० |
| २. निरंजन | ,, | २–० |
| ३. हांक | ,, | २–० |
| ४. जादुगार | ,, | २–० |
| ५. कुलाब्याची दांडी | ,, | २–० |
| ६. अखेरचें बंड | ,, | ७–८ |
| ७. चाहूल | ,, | ५–० |
| ८. सुषमा | ,, | ५–० |
| ९. जेहलम | ,, | ६–० |
| १०. हंसू आणि आंसू | ,, | –० |
| ११. उद्धार | ,, | –८ |
| १२. इशारा | | –८ |

[आमचा संपूर्ण कॅटलॉग मागवा]

## अंजलि प्रकाशन लिमिटेड


REFBK-0008219